सहामाही " ३ " ०८
सालअखेर " ७ " १०८
किरकोळ अंकास..............................०४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस ..........०१

Per annum in arrears 7 "1Rs. 8 as
Six monthly............3 " 8 as
Single copy......................................4as

Advertisements
Below 10 lines... 2Rs
per line over10...4 as
Repetition per line3as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOLXXIV AKOLA MONDAY APRIL 7 1890 NO 13.

वर्ष २४ अकोला सोमवार तारीख ७ माहे एप्रील सन १८९० इ० अंक १३.

### पुण्यांतील वक्तृत्वो त्तेजक मंडळी.

सन १८९०.९१ सालचा भाषण समारंभ

पुण्यांतील वक्तृत्वोत्तेजक मंडळीचा चालूं सालचा भाषण समारंभ तारीख ३ माहे मे शनवार सन १८९० पासून सुरू होईल विषय व बक्षिसें खालीं लिहिल्याप्रमाणें ठेविलीं आहेत.

विषय.

१ ला. पार्लमेंट सभेपुढें ब्राडला साहेब यांणीं इकडील कौन्सिलाबद्दल कायद्याचा मसुदा वाचल्यानंतर हिंदुस्थानांतून आलेल्या डेलिगेटांनीं आपले विचार प्रदर्शित करावे अशी पार्लमेंटानें आपली इच्छा दर्शविली अशी कल्पना करून वक्त्यानें आपण हिंदुस्थानवासी जनांचे डेलिगेट आहों असें समजून कौन्सिलच्या सुधारणेबद्दल हिंदुस्थानांतील लोकांचे काय विचार आहेत व त्यांचें ह्मणणें पार्लमेंटानें कां कबूल करावें याविषयीं भाषण करावें.

२ रा. हल्लीं आम्हीं स्त्रियांस कोणत्या रीतीनें वागवितों, त्यांच्याशीं योग्य वागणूक होण्यास आपल्या वर्तनांत कांहीं फरक झाले. पाहिजेत किंवा कसे? हल्लींच्या वागणुकींत स्त्रियांवर सक्ती होत असल्यास ती कोणत्या बाबतींत होत आहे. ती कोणत्या उपायांनीं नाहींशी करतां येईल. ते उपाय सांगणें व स्त्रियांशीं योग्य वागणूक ठेवण्या विषयीं उपदेश करणें.

३रा. अभंग, माडगांवकृत गाथा अभंग ३४५८.

पवित्र ते कूळ पावन तो देश,॥
जेथें हरिचे दास घेती जन्म॥१॥
कर्मधर्म त्याचे जाला नारायण॥
त्याचेनी पावन तिन्ही लोक॥२॥
वर्ण अभिमानें कोण जाले पावन॥
ऐसे द्या सांगून मजपाशीं॥३॥
अत्यंजादि योनि तरल्या हरिभजनें॥
तयाची पुराणें भाट जालीं॥४॥
+ + + ×
याता यातीधर्म नाहीं विष्णुदासा
निर्णय हा ऐसा वेदशास्त्री ॥११॥
तुका ह्मणे तुह्मी विचारावे ग्रंथ॥
तारिले पतित नेणों किती ॥ १२ ॥

४ था.– अपत्या वेळचा

या चारी विषयांवर भाषण करणारानें कोणत्याही व्यक्तीस प्रत्यक्ष व परोक्ष रीतीनें अनुलक्षून बोलूं नये.

बक्षिसें व गुण

वरील चार विषयांतून इच्छेस येईल तो (एकच) विषय घ्यावा पहिल्या विषयांस ४० रुपयांचे एक व दुसरे रु २० चे कैलासवासी रावबहादुर गणाशास्त्री आपटे यांचे; व दुसरे विषयास रु० ४० चे एक व दुसरें रु० १५ चे तिसऱ्या विषयास मंडळीच्या फंडापैकी रु. १५ व कैलासवासी रावबहादुर विष्णु परशराम रानडे यांचे स्मारक फंडापैकीं रु. २५ एकूण रु ४० चे एक व दुसरे रु. २० चे श्री० कै० यशवंतराव गोपाळराव मैराळ यांचे नावचे आयत्या वेळचे विषयास बक्षीस रु० ४० चे एकच आहे. आयत्या वळचे विषय समारंभाचे पहिले दिवशी कळविण्यांत येतील बक्षीस मिळण्यास १०० गुणांतून निदान ५० गुण आले पाहिजेत.

पहिले विषयात पहिले बक्षीस मिळविणारानें जर करितां शेकडा ७० गुणापेक्षां जास्त मिळविले तर त्यास पहिले बक्षीस रु ४० चे आहे त्या ठिकाणीं रु. ५० चे बक्षीस मिळेल.

उमेदवारांच्या समजुती साठीं सूचना.

प्रत्येक भाषणास अर्धा तास दिला जाईल, परंतु अवश्य वाटल्यास ती वेळ कमी अथवा जास्त करण्याला अधिकार परिक्षकांस आहे भाषणांत विषयाची जुळणी त्यांचें प्रतिपादन, श्रोत्यांच्या मनांत उतरून देण्याची शैली या गुणांकडे विशेष लक्ष दिले जाईल. परिक्षक ज्यांची भाषणें पसंत करतील त्या उमेदवारांनीं त्यांनीं केलेल्या भाषणाचा लेखी मोषवारा चिटणीसास आणून दिला पाहिजे पहिल्या तीन विषयांवरील भाषण करणाराचे वय १८ वर्षांपेक्षां कमी नसावें. व चवथ्या विषयावर भाषण करणाऱ्या उमेदवाराचे वय २२ वर्ष पेक्षां कमी नसावें.

२ भाषण करण्यास येऊं इच्छिणाऱ्या उमेदवारानें एक रुपया आपल्या अर्जा सोबत पाठवावा. ज्याचा रुपया येणार नाहीं, त्याचा अर्ज घेतला जाणार नाहीं सेक्रेटरी ज्या दिवशीं व ज्या वेळेस उमेदवरानें घेतलेल्या विषयावर भाषण करण्यास सांगतील त्या दिवशीं व त्या वेळेस उमेदवारानीं हजर असून भाषण करण्यास उभे राहिले पाहिजे. असें उमेदवार जरी पास झाले नाहींत किंवा त्यांचीं भाषणें मंडळानीं समग्र ऐकून घेतल्या मुळें त्यास आपलें भाषण थांबवून जरी परत जावें लागलें, तरी त्याचा रुपया परत दिला जाईल. वरलिहिल्या प्रमाणें सेक्रेटरी सांगतील त्या वेळीं उमेदवार हजर नसतील किंवा हजर असून भाषण करण्यास येणार नाहींत, तर त्यांचा रुपया परत दिला जाणार नाहीं, व गैरहजर असलेल्या उमेदवारांचा मागाहून भाषण करण्याचा हक्क राहणार नाहीं.

अर्ज ता० २५ एप्रील सन १८९० चे आंत खाली सही करणाराचे नावें 'शुक्रवार कोतवाल चावडी नजीक नेटिव जनरल लायब्ररी" ह्या पत्यावर पाठवावे त्यात प्रत्येक उमेदवारानें आपले नांव, बापाचे नांव आडनांव, धंदा, पत्ता व गोत्राव नांव आणि त्यानें घेतलेला विषय अर्ती स्पष्ट लिहावीं. नाटपेडपत्र घेतले जाणार नाहीं; उमेदवारांनीं भाषण समारंभाचे अगोदर एक दिवस चिटणिसांस येऊन भेटावे व जे न भेटतील ते भाषण करण्यास येत नाहींत, असें समजून व्यवस्था करण्यांत येईल.

ता० ५।२।९० इ०

वामनराव विष्णु लेले
कृष्णराव बापूजी मांडे
पुण्यांतील व० मंडळीचे चिटणीस

## जाहिरात.

सर्व लोकास कळविण्यांत येते कीं आकोल्यास आठवड्यातून दोन बाजार भरावें असें कार दिवसा पासून घाटत होते त्याप्रमाणे बाजार ता. २ एप्रील सन १८९० इसवी रोजी बुधवार आहे त्या दिवसा पासून बाजार भरवीत जावा असा आकोलें म्युनसीपल कमेटीचा ठराव जाला आहे सदरहू बाजारा करितां जागा शहरचे पश्चिमेस सर्कोलीचे बाहेर तयार केली आहे करितां गावांतील व पेठेंतील सर्व दुकानदार लोकांनीं सदरहू तारखे पासून सदरहू जागीं बाजार भरविण्याची तजवीज करावी ह्यापासून सर्व लोकांचा फायदा आहे. तुर्त बाजारा करितां जागा थोडी तयार केली आहे. बाजार जसजसा भरभराटीस येईल तसतसी जागा ज्यास्त तयार करण्यांत येईल रविवारचें बाजारास जशा सोई जाल्या आहेत तशा करून देण्यात येतील ह्या बाजारांत दुकानदारांस बाजार बैठकी बद्दल तुर्त कर द्यावा लागणार नाहीं कळावें ता० २१।३।९० इ०

Krishnaji Malhar.
Secretary.
A. M. C.

## जाहिरात.

सर्वत्र लोकांस या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं भंगीपटीचा नवान लायसन्स घेण्याचें वर्ष ता० १ माहे एप्रील सन १८९० पासून सुरू होणार करितां ज्यांना आपापले पायखाने सुरू राहावेत व साफ केले जावेत अशी इच्छा असेल त्यांनीं ता० ५ एप्रील सन १८९० चे आंत पायखान्याचें लायसेन्स टौनहालांत येऊन घेऊन जावे. जे लोक सदरहू तारखेपावेतो लायसन्स घेणार नाहींत त्या लोकांचे पायखाने बंद केले जातील व ते साफ करण्याचे संबंधानें कमेटी जबाबदार राहणार नाहीं लायसन्स ता० १ एप्रील सन १८९० पासून सकाळचे साहावाजेपासून ११ वाजे पावेतो व दुपारी दोन वाजेपासून साहावाजे पावेतो मिळतील कळावें ता० २० मार्च सन १८९०

Krishnaji Malhar.
Secretary
A. M. C.

## पत्रव्यवहार.

ह्या सदरा खालील मजकूर पत्र कर्त्यांच्या मतास मिळूनच असेल असें समजूं नये.

जळगांव
ता० २७-३-९०

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस

वि. वि. खालील चार ओळीस येत्या अंकांत जागा द्याल अशी उमेद राखून तसदी देत आहे.

हवामान– उष्णता चांगली भासूं लागली आहे गांवांत तापाची साथ इतका जारीनें सुरू आहे कीं यानें एकही घर सोडिलें नाहीं अजमासें गांवांत ६-७ शें मनुष्यें आजारी आहेत या ज्वरमहाराजांनीं गांवांतील नेटिव वैद्यांचीच नव्हे तर डाक्तर साहेब यांचीही सेवा चालविली आहे वकील व रावसाहेब ७०स०ज० यांच्या प्रकृती बिघडल्यामुळें दोन दिवस कोर्ट बंद ठेवणें भाग पडलें होतें आज सुमारें एक महिना झाला श्री पंढरपूरचे चंद्रभागेच्या पुलाची वर्गणी जमा करण्यासाठीं हरिभक्तो परायण रा. रा. घमंडेबुवा येथें आले असून त्यांचाही (त्यांच्या मंडळीसह) ज्वरानें समाचार घेतलाच. या बुवांनीं येथें ४-५ व्याख्यानें व दोन कीर्तनें केलीं. व्याख्यानें गिरणीतील लोकांसाठीं पांढरपेसे लोकांत मुनिसिपल हॉलमध्यें विद्यार्थ्यांकरितां शाळेंत व फैजापूर दिली. याच्या व्याख्यानापूर्वी मंडळीनीं अशी कल्पना करावी कीं सर्व लोक बुवांचें ह्मणणें कबूल करतील असें वाटत नाहीं परंतु आह्मी तर २-३ ठिकाणीं प्रत्यक्ष अनुभव घेतला कीं बुवांचें व्याख्यान जाहलें कीं लोकांनीं आपला एकएक दिवसाचा फायदा देण्याचें उल्हासानें टाळी वाजवून कबूल केलें या गांवीं लोकांचा अजमास ३-४ शें रुपये जमा व्हावेसें होतें परंतु बुवांचें सौजन्य व मधुरतां वऱ्हदयद्रावक भाषणानें यांस येथें अजमासें ८०० रुपये झाले यांनीं येथील काम करून त्यांतच फुरसती प्रमाणें भुसावळेस जाऊन तेथें ही व्याख्यानें वगैरे देऊन मदत घेतली ह्मणून ऐकतों. यावरून बुवांचे अव्याहित श्रम व वरील गुणांस श्रीपंढरीनाथ यश देत आहेत परंतु सदरहू कामीं यांची व योजना करणाराची (राव बहादुर हेब्ळीकरांची) जितकी तारीफ करावी तितकी थोडी कारण रावबहादुरांस मनुष्याची खरी पारख आहे यांत शंका नाहीं.

वर्गणी वसूल करण्याचें कामीं बुवासाहेबांस येथील वकील लोकांनीं चांगल्या प्रकारें मदत केली त्यांत विशेषकरून रावसाहेब नाशीककर वकील व नारो धाकदेव वकील या उभयतांनीं विशेष मेहनत घेतली हें त्यांस मोठें भूषण आहे.

आपला
जळगांवकर.

### नोटीस.

ज्यानजी वल्लद धनु ठाकुर राहाणार अडगांव तालुके अकोट यांस खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं माझा लग्नाचा नवरा असून आज दाहावर्षांत मजला घरी घेऊन जात नाहींस व माझे पोटा पाण्याची कांहीं तजवीज करित नाहींस मी आज पर्यंतो तुझें नावावर कर्ज काढून खाल्लें. आता मजला कर्ज कोणी देत नाहींत तर तुजला ही नोटीस देऊन असें कळावितें कीं नोटीस पावल्या पासून आठ८ दिवसांत सदर्हू खावटीचे रुपये २०० देऊन मजला घेऊन जावें. असें केलें नाहींतर हांच तुझी सोडचिठी समजून मी दुसरा घरठाव करीन मग मजवर तुझा कोणचेही प्रकारचा हक्क नाहीं व रुपये खावटीचे बद्दल काम चालऊन या नोटीशीचे खर्चा सुद्धा सर्व नुकसान भरून घेईन म्हणून दिल्ही नोटीस सही ता० ४ माहे एप्रील सन १८९० इसवी.

(सही)

हातची बांगडी बजीमर्द ज्यानजी राहणार सागद ईची असें.

वऱ्हाडसमाचार.

मिती चैत्र वद्य २ शके १८१२

## वऱ्हाड वतनदार सभा

(मागील अंकावरून पुढें चालू)

रावसाहेब यांस असें कडक भाषण करण्यास प्रसंग असा झाला. जमेदार अगर वतनदार सभा या पैकीं कोणतें नाव सभेस द्यावें या संबंधानें सर्वानुमतें असा ठराव करण्यांत आला कीं सभेस वतनदार सभा असें नांव द्यावें. हा ठराव झाल्यावर कांहीं वेळानें दुसरा ठराव होण्याची वाटाघाट सुरूं असतां एका गृहस्थानें सभेस जमेदार सभाच नांव द्यावें असें म्हणून दाखविलें. हें ऐकून रावसाहेबांचा असा समज झाला कीं हे गृहस्थ केवळ कांहीं तरी अडथळा करण्याचा प्रयत्न करित आहेत म्हणुन त्यांनां फार राग येऊन त्यानीं कडक भाषण केलें. आपलें भाषण कडक झालें ही गोष्ट रावसाहेबांस ही मान्य आहे. कारण त्यानीं सभा विसर्जन झाल्यावर जातां जातां कांहीं गृहस्थां जवळ अशा संबंधाचे उद्गार काढले; व या बद्दल आपण राग मानूनये असें ही बोलून दाखविलें. आतां कित्येक जमेदार गृहस्थांचें म्हणणें असें कीं आम्हीं रावसाहेबांचा जो सल्ला घेण्याचा विचार केला व त्यांस आमचे पुढारी करण्याचें योजिलें तें केवळ हे सुज्ञ आहेत व लोक हिताची नेहमीं कळकळ बाळगणारे आहेत असें समजून आम्हीं यांच्या कडे गेलों आम्हीं पक्षकार व हे आमचे वकील ह्या नात्यानें गेलों नाहीं आपण साधारण गोष्टींत देखील आपल्या स्नेह्याशीं सल्ला मसलत करितों त्यांचा विचार घेतों व केव्हां केव्हां त्यांची मदत ही घेतों, मग अशा महत्कृत्यांत आम्हीं रावसाहेबा सारख्या पुरुषांचा सल्ला घेण्याचा जो विचार केला तो या धोरणानेंच केला. आम्हीं केवळ आडणी आहोंत किंवा मुर्ख आहोंत ह्या समजानें त्यांच्या कडे गेलों नाहीं. मग त्यांनीं आमची भरसमाजांत जी आम्ही "मुर्ख, कोल्या समजांचे," म्हणून निर्भत्सना केली ती आम्हांस सहन न होणें रास्तच आहे. आपण होऊन बोलविलेल्या गृहस्थाचा अपमान करणें (त्यांचें भाषण आपणांस रुचत नाहीं म्हणून) हें शिष्ट संप्रदायास अनुसरून होणार नाहीं असें समजून आम्हीं चूप बसलों इतकेंच नव्हे परंतु आमच्या मध्यें किंचित् ही अपमान सहन न करणारे गृहस्थ होते त्यांस ही मोठ्या कष्टाकष्टीनें थोपवून धरिलें. आमच्या ह्या प्रयत्नास यश आलें नसतें तर प्रसंग फार चमत्कारिक झाला असता व रावसाहेब म्हणतात त्या प्रमाणें आम्हीं खरोखरच मूर्ख ठरलों असतो. रावसाहेबांच्या भाषणाचा राग आला असतां ही जमेदार मंडळीनें गम खाल्ला ही आनंद मानण्या सारखी गोष्ट आहे. परंतु त्यांच्या संबंधानें सर्वांमध्यें जरी नव्हे तरी निदान पुष्कळश्या मंडळींत गैर समजामुळें अविश्वास उत्पन्न होणें फार दिलगिरीची गोष्ट आहे. असें कडक भाषण होण्यास त्यांना राग आला हें एकतर कारण खरेंच परंतु त्यांची प्रकृती अस्वस्थ होती हें एक त्यास पुष्टीकरण झालें. त्यांच्या आंगांत लखलखीत ताप होता. व हें त्यांच्या पायांतील इजार, पागोट्या वरून बांधलेली टापशी वगैरे शीकि पोशाखाच्या ऐटी वरून दिसून येत होतें. शिवाय त्यांच्या भाषणांत ही साधारण ताप कऱ्यांच्या बोलण्यांत असते, या प्रमाणें वेडेपणा दिसून आला. तो असा तुम्ही जमेदार लोक केवळ पेन्शनर आहांत वस्तुतः तुमचा कांहीं एक हक्क नाहीं असें बोलून गेलें. व लगेच असें ही बोललें कीं मला जर कोणी दहा रुपयांचें वतन देईल तर मी आज दहा हजार रुपये खर्च करण्यास तयार आहे ही दोन्हीं वाक्यें एकमेकांस विरोधी दिसतात नव्हे काय? आंगांत तापाचा आजार जोर नसता तर रावसाहेबां सारख्या वकीलीच्या धंद्यांत नावजलेल्या गृहस्थाच्या तोंडून अशी विरोधी वाक्यें निघण्याचा संभव नव्हता. पेन्शन जें मिळतें तें उगीच मिळत नाहीं. तें इमानानें चाकरी केल्याबद्दल मिळतें जमेदार मंडळीस जो हा बैठा मुशाहिरा मिळत आहे तो त्यांनीं जी पूर्वी इमानानें चाकरी बजाविली त्यांचे फळ आहे. उगीच कोणी कोणास देत नाहीं. रावसाहेब हे आज पुष्कळ वर्षे वकीली करीत आहेत व त्यांनीं पुष्कळ लोकांचीं कामें उत्तम रीतीनें बजाविली आहेत तथापि त्या पक्षकारांस जर त्यानीं विनंती केली कीं तुम्ही आम्हांस आम्हीं जी तुमची इमानेंइतबारें चाकरी बजाविली त्या बद्दल दरसाल कांहीं एक नेमणूक करून द्या तर ही गोष्ट फारच थोड्या पक्षकारांस पसंत पडेल. तेव्हां सरकार जमेदार मंडळींत जो मुशाहिरा देत आहे तो फुकट नसून केवळ त्यांनीं फारच महत्वाची कामें बजाविल्या मुळें त्यांस मिळत आहे. आमची जमेदार मंडळी मोंगलाईतील मुत्सदी मंडळींत मोडते. त्यांना दरबारांतील रितरिवाज वगैरे माहीत आहेत. सामदाम वगैरे युक्त्यांनीं ते परीपूर्ण आहेत. मोगलाई जाऊन सुमारें पसतीस वर्षे झालीं. ह्या पसतीस वर्षांत ह्या मंडळीस पूर्वी प्रमाणें दरबारांत जाऊन मुत्सदीपणा करण्याचा प्रसंग विशेषसा आला नसावा तथापि ज्या लोकांना असें प्रसंग आले आहेत ते अजुन हयात असल्या मुळें ह्या मंडळीच्या आंगीं अजून दरबारी कावा जागृत आहे. पण कोठें द्यावी कोठें न द्यावी आपलें कार्य कसें साधून घ्यावें ह्या गोष्टी ते अजुन विसरले नाहींत ह्मणूनच त्यांनीं रावसाहेब ह्यांस आपल्या सभेचे सेक्रेटरी नेमिलें मग रावसाहेब ह्मणतात त्या प्रमाणें हे मूर्ख आहेत ह्मणून ह्मणा अगर तें आपल्या ठिकाणीं आपणांस मोगलाईतील जुने मुत्सदी समजतात ह्मणून ह्मणा.

अकोटचे तहशिलदार मि० मुबारक अली यांची बदली मोर्शीस ए० अ० क० जागेवर झाली. ते परस्पर जाणार होते परंतु येथील अंजुमन यासीन सभेनें ते त्या सभेचें मेंबर असल्यावरून मंडळीच्या भेटी घेऊन जावें म्हणून निमंत्रण केलें- तें त्यानी उत्साहानीं मान्य करून ते येथें आलें. त्यास काल रोजी त्या सभे कडून सायंकाळी ७ वाजतां मि० हाजी शेक हैदरसाहेब यांचे घरीं पान सुपारी झाली. उन्हाळा असल्यानें बैठक बाहेर चांदण्यातच केली होती. चौक साधून खुर्च्या मांडल्या असून मे० साहेबाकरीतां उत्तमभिमुख दुशाल्यानें सुशोभित केलेली खर्ची मध्यभागीं मांडली होती. सभेचे निमंत्रणा वरून गावांतील शेट सावकार व सभ्य गृहस्त बरेच आलें होतें. इंग्रजी थाटाच्या समारंभास आमच्या म्हशालीनें यावी तसी शोभा आली नव्हती. प्रथमतः- सेक्रेटरी यांनीं थोडेसें उचित भाषण करून अध्यक्ष स्थान मे० मुबारक अली साहेब यांनीं स्वीकारावें असे सुचविलें यास रा. जयकृष्ण बागजी यानीं अनुमोदन दिलें. ती सूचना सर्वांनीं पास केली. नंतर मे० मुबारक साहेब सिंव्हासनावर विराजमान झाले. नंतर त्यांनीं त्यांच्या घराण्याच्या लायकीची तीन पिढ्याची माहिती उत्तम प्रकारें देऊन ते स्वतःच्या करतबगारीनें कसकसें वाढत गेले. हे हा सांगितलें हे वऱ्हडचे राहणार असल्या मुळें त्यास देशाभिमान कसा आहे हें त्यांनीं एक दोन उदाहरणांनीं व्यक्त करून दाखविलें नंतर सेक्रेटरी मि० आबा सखा यांचे थोडे चटकदार भाषण झालें. यानंतर अकोटचे हिंदुस्थानी स्कुलचे हेडमास्तर यांनीं लिहून आणलेला मजकूर वाचला, त्यांत ही हजरत साहेबांचे गुणानुवाद वर्णन करून येते वेळेस अकोट येथील निरनिराळ्या धंद्याच्या लोकांनीं यांचा कसा गौरव केला, हें दाखविलें नंतर मि० हशमत अली साहेब अव्वाची यांनीं थोडे त्यांच्या स्वतःच्या अनुभवा वरून यांच्या सुस्वभावाची माहिती देऊन खाली बसले. हा सर्वांची भाषणें झाल्या नंतर मे० सा० उठले त्यांनीं समयास उचित असें भाषण केलें. ते म्हणाले अकोल्यास कांहीं दिवस तरी वास व्हावा अशी माझी मनीषा फार आहे. अकोटच्या लोकांनीं मी तेथें फार दिवस असल्या कारणानें त्यांनीं आपले मजवर असलेले प्रेम दाखविल्या बद्दल मला जो आनंद झाला या ही पेक्षां ज्या ठिकाणीं अगदी अपरिचित असून तेथील लोकांनीं जो मला सन्मान दिला व प्रेम दाखविलें त्या मुळें होत आहे. मंडळीचे अभार मानन मे. मुबारक अली साहेब खालीं बसेल. नंतर हार तुरे अत्तर गुलाब होऊन मजलस विसर्जन झाली आम्ही मे. मुबारक अलि साहेब यांच्या बढती बदल मुबारकी देऊन हा लेख पुरा कारितों.

# The Berar Samachar

MONDAY APRIL 7, 1890.

## LORD CROSS BILL.

The Pioneer in one of its issues last week states that the trite which the Govt. of India would be thrown if the elective principle be once introduced in the appointment of members to the Legislative Councils of India is extremely great. The whole country excepting the organs of the official class are unanimously of opinion that there does not exist the slightest danger nor is there any possibility of its arising in future if elective principle is introduced in the measure It is a folly of no small degree to say that the Indians especially the educated amongst them have not yet become qualified to value the elective principle. This is ignoring history. In times long before the advent of the British the people were governed by Panchayats Caste disputes even to this day are settled by Caste-Panchayats. This system is especially observed amongst a class of people who do not deserve to be ranked amongst the educated or the rich: such as Dhobis, Bhangees and other low castes. In time immediately preceding the coming of the British Govt. system of settling all sorts of disputes by arbitration was a matter of necessity. The govt. of the country was not at all conducted on the lines of the English procedure. Excepting murders and such other heivous offences as require state interference nothing was absolutely done by govt. of the times in matters of civil administration. There were no civil courts to have recourse to in matters of ordinary litigation. This state of things yet exists in several of the native states in more or less degree There were no laws of procedure worth the name; if this was true as will be admitted on all hands as true statement of facts it follows as a matter of logical sequence to say that there were tribunals though not founded by the State which decided disputes between one citizen and another in respect of property, succession, inheritance and the like. These tribunals were neither founded by the State nor were they recognised as part and parcel of the administration, though it must be owned that their existence and the decisions they gave were given cognizance to by the State To say that people who are accustomed from time immemorial to choose their judges to decide civil disputes arising among them are not fit to choose men to represent them in Councils of Legislature is a folly of the highest type. The maxim "vox populi oox dei" echoes the same sentiments of government by Jury or by arbitration as is expressed in the Marathi phrase Panchamukhi Parmeshwar *i. e.* that which is said by 5 men is said by God.

The Pioneer and its Coteri cause extreme pain to the loyal subjects of Her Magesty in India by the use of harsh and unsympathetic language. Be it remembered that the people of India are determined to secure voice in the administration of their country by the use of all legal and loyal means they are aware of. It is the bounden duty of Government to take cognizance of this

[ नमुन्याची पुरवणी पहा आणि वर्गणीदार व्हा. ]

Subscription per Annum in Advance with Postage 9 As. only.
*Monthly Journal.*
Advertising charges For the first time per line in advance Re. 0—1—0.
For Advertisements translated for the first time per line 0—3—0
Contractentered into for long periods on advantageous terms.
All communications should be made with the Manager of Vyaparotejak Journal, Byculla, Bombay.

# व्यापारोत्तेजक

## VYAPAROTEJAK & ARYA PANCH.

—धर्मचर— आणि —सत्यंवद—

## आर्यपंच.

—साधूनां भद्रमेवास्ति ह्यसाधुष्वने कृते ।— —गोप्ता च धर्मसेतूनां शास्ता तत्परिपंथिनाम् ।

मासिक पत्र.
आगाऊ वर्गणीचे दर.
टपाल हंशीलसह ९ आणे.
फुटकळ अंकास ८॥
मागाहून दुप्पट वर्गणी.
जाहिरातीचे दर.
१६ ओळीस आगाऊ १ रु.
२० ,, ३ महिन्यांस.
२४ ,, ६ ,,
३२ ,, १२ ,,

सर्व प्रकारचा पत्रव्यवहार करणें तो " म्यानेजर व्यापारोत्तेजक " या नांवानें मुंबई, भायखळा, दात्रणीसमोर, या पत्त्यावर करावा.

पुस्तक २. मुंबई:-मंगळवार तारीख १ माहे एप्रिल सन १८९०. अंक ४ था. VOL. II. BOMBAY:—1ST APRIL 1890. No. 4

## जाहिराती.

मुंबई भायखळा — पुणें रविवार पेठ.

महत्वाची सोयीस्कर सूचना.

### जी. बी. नाईक आणि कंपनी

कमिशन एजंटस् आणि जनरल मरचंटस्
भायखळा, मुंबई.

सर्व व्यापारी, चिटणीस, व्यवस्थापक, डाक्तर, कंपन्या, ऑफिसर वगैरे लोकांस विनयपूर्वक कळविण्यांत येतें कीं, वरील नांवाची कंपनी सर्व प्रकारचा माल, पुणें व मुंबईहून बाहेरगांवीं खरेदी करून पाठविण्याचें काम अगर बाहेरगांवाहून माल आल्यास त्याची विक्री करण्याचें काम कसोशीनें, नियमित वेळीं माफक व नेमस्त कमिशन ( अडत ) घेऊन करीत जाईल.

कमिशनाचे दर, नियम आणि नेहमीं खातें ठेवणारांचे ठराव वगैरे पाहिजे असल्यास ठरावपत्रकाकरितां एक आणा पाठवा.

### डोळयाचें औषध.

पाटीलकृत.

दीर्घ व न्हस्व असे जे डोळयांचे रोग अलीकडे बरेच होतात त्यावर फक्त सातच दिवस उपयोग करून पहा, गुण दिसल्यास पुढें मागवा. या औषधाच्या योगानें तरुण मनुष्याप्रमाणें डोळयांस तेजी येऊन दृष्टि साफ होते. या औषधापासून कांहीं अपाय होण्याची भीति नाहीं. १४ दिवसांचे औषधाची किं. रु. १, ट. हा. व बंगी करणावळ निराळें पडेल. रोख दाम आल्यास किंवा व्ही. पी. नें मागवा.

पुणे—सोमवार पेठ गणपत सखाराम पाटील.

मुंबई—भायखळा, "व्यापारोत्तेजक कचेरी.

### वाक् संजीवनी गोळया.

क् क् क् काकानें म् म् म् मारिले अशी वाचा सुधारण्यास औषध ४० दिवस घ्यावें. किंमत २-४. व्ही. पे. नें किंमत आणि खर्च मिळून २ रु. १० आणे. औषध घेणाराचें वय कळवावें.

पुणें, सातारा, बडोदा वगैरे कडील लोकांस या गोळयांनीं गुण आल्याचीं पत्रें आहेत.

रामकृष्ण पांडुरंग माजी स्कूलमास्तर. बिळगी ता. सिदापूर जिल्हा उत्तर कानडा.

### तिजोरीच्या पेट्या.

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं, आम्ही उत्तम, सुरेख, मजबूत खजिन्याच्या पेट्या, ( तिजोऱ्या ) वगैरे लोखंडी काम तयार करीत असतों. ज्या आकाराच्या पाहिजे त्या आकाराच्या विक्रीस तयार आहेत. आणि ज्याप्रमाणें हुकूम येईल त्या नमुन्याच्या तयार करून दिल्या जातील. त्याचप्रमाणें कोणत्याही प्रकारच्या दुरुस्त होण्यासारख्या अशा नादुरुस्त झाल्या असतील अशा तिजोऱ्या नीट करून दिल्या जातील. विशेष माहितीकरितां क्याटलाग मागवा.

हरिचंद मंचाराम आणि सन्स.

तिजोऱ्यांच्या पेट्या करणार व व्यापारी, नं. ६६ अपालोस्ट्रीट किल्ला अथवा १३८ गुलालवाडी किका रस्ता.

HARICHAND MUNCHHARAM & SONS.
NEW IRON SAFE MAKER, DEALER, REPAIRER &c.
No. 66, APOLLO STRET, FORT & 138, GULALWADI, KIKA STREET OUTFORT, BOMBAY.

On application Specifications and Estimates given for the supply of every description of Iron Safes, Fancy Brass Works for Safes, Chests and Cupboards, &c. Repairs of old Iron Safes, till Lock quite unfit for further use made to owners satisfaction, &c.

Contracts entered into for the supply of varieties of Iron Safes and Chests withdrawers and partitions of every description.

ALL ORDERS FOR NEW SAFES AND REPAIRS OF ALL KINDS WILL BE MOST PUNCTUALLY ATTENDED TO.

### विक्रीस तयार.

| पुस्तकें. | किं. रु. |
| --- | --- |
| श्री संतलीलामृत अध्याय ३५ .... | २॥ |
| चिद्बोधरामायण ( बालकांड ) .... | ·॥· |
| श्री कुणकेश्वर माहात्म्य .... .... | ·॥· |
| माझा ओसाड पडलेला गांव .... | ·\|· |
| पुणेंशहरवर्णन भाग १ .... .... | ·॥\|= |
| " " भाग २ .... .... | ·॥· |
| फुलाचीं परडी .... .... .... | ·\|· |
| वाक्पुष्पांजलि .... .... .... | ८= |
| सुंदराबाई अथवा साध्वी स्त्री .... | ·\|= |
| कोष्टी बांधवास विनंती .... .... | ·\|= |
| समासादर्श .... .... .... | ·\|= |
| कामदृष्टि .... .... .... .... | ·\|· |
| तुर्क व रशियन लो. लढाईचा इ० | १ |
| प्र० भाषेंत मनोरंजक गोष्टी भाग ५ | ७। |
| चमत्कारिक नाटक.... .... .... | ॥= |
| कमलजा नाटक .... .... .... | ८= |
| संगीत रत्नप्रभा नाटक .... .... | [illegible] |
| " मंजुघोषा " .... .... | १ |
| " चंद्रकला " .... .... | १। |
| रमा नाटक .... .... .... | ·\|\|\| |
| मदनबाण आणि पुष्पावती कादंबरी.... | १ |
| क्रिमिनल प्रोसिजर कोड सटीक .... | ५ |
| दुष्काळाचा पोंवाडा.... .... .... | ८= |
| अनार्थ लोकांचा पोंवाडा .... .... | ८= |
| कारागिरांचा पोंवाडा .... .... | ८= |
| मित्रत्व .... .... .... .... | ८= |
| सामुद्रिक किंवा स्त्रीपुरुष शरीरलक्षण | .\|= |
| सद्रिपू प्रहसन उत्तम मनोरंजक .... | १ |
| योग्य शासनादर्श नाटक .... ... | .\|\|. |

वैद्यकीसंबंधी पुस्तकें.

| | |
| --- | --- |
| वैद्यराज अथवा रोगनिवारण.... .... | २। |
| कुटुंबवैद्यक भाग १ .... .... .... | \|= |
| " " भाग २ .... .... .... | \|= |
| रसरत्नमाला भाग १ .... .... .... | २॥ |
| सररत्नमाला भाग २ .... .... | २॥ |
| वैद्यनिरालंबन.... .... .... .... | ·॥· |
| पाकचंद्रिका .... .... .... .... | ·\|\|\| |
| ज्वरप्रकाश .... .... .... .... | ·\|\|\|· |
| गोवैद्यक .... .... .... .... | ८= |
| बऱ्हर्थ लघुवैद्यक .... .... .... | १ |
| औषधी बाड भाग १ .... .... | ४ |
| त्र्यंबकी दीपिका .... .... .... | ·\|· |

या किंमती शिवाय ट. ख. निराळा पडेल.

सूचनाः-या पुस्तका शिवाय सर्व प्रकारचीं शालोपयोगीं मराठी, गुजराथी व इंग्रजी क्रमिक पुस्तकें व प्राकृत संस्कृत ग्रंथ मिळतील. रोख पैसे पाठवून अगर व्ही. पे. पार्सलानें मागवावीं. म्यानेजर,

व्यापारोत्तेजक.

### प्रसिद्ध वैद्याचीं

रामबाण अनुभविक खात्रीचीं औषधें. अनुपान व सर्टीफिकिटांसह.

| | किं. रु. |
| --- | --- |
| उपदंशशामक गोळया १४ .... .... | ३ |
| गर्मीचे चट्टे, पर्मा, गांधीवर औषध .... | २ |
| स्त्रियांचे धुपणीवर औषध .... .... | १ |
| नेत्रजन्य, फुलें, साहरा वगैरे .... .... | १ |
| संग्रहणी, अतिसार, शुळ वगैरेवर. .... | १ |
| मलम, पूड, चट्टे भगंदर, व्रणावर. .... | २ |
| पटकी व जुलाब यांवर गोळया १६ .... | १ |
| विंचूचें विष ४० मनुष्यास पुरतें .... | .॥ |
| दंतरक्षक पूड सर्व दंत रोगावर ....... | \|= |
| गजकर्णावर खात्रीचे मलम .... | .\|– |
| मदनसंजीवनी गोळया २०.... .... | २॥ |
| मदनसंजीवनी तेल बाटली .... .... | ७। |
| खरूज, नायटे, आगपाईण वगैरेवर.... | .\|= |
| कफनाशक खात्रीच्या गोळया २५.... | १ |
| वीर्यस्तंभक व कामोत्तेजक गुटिका १६.... | १ |
| वज्रदंती मंजन .... .... .... | ·\|· |
| कर्णरोगहरक तेल बाटलीस किं रु..... | ·\|· |

वरील औषधें रोख पैसे आल्यास किंवा व्ही. पी. पार्सलनें मागविल्यास पाठवूं. ह्या शिवाय सर्व प्रकारचीं इंग्रजी औषधें मागविल्यास पाठविलीं जातील. म्यानेजर,

व्यापारोत्तेजक.

## स्वीट हास्य—विनोद:

एका गृहस्थास एकानें विचारलें कीं, आपले मुलाचा कोणता अभ्यास चालला आहे ? गृहस्थ ह्मणाला कीं, वकीलीचा. कारण कीं, तो लहानपणापासून खोटें बोलण्यात हुशार झाला आहे. खोटें बोलणार मोठे बुद्धिवान् असतात ह्मणून त्यास वकिलींचे अभ्यासास लाविलें आहे. आणि ती विद्या त्यास लवकर संपादन होण्याचा संभव आहे.

—एका वकीलाजवळ पुष्कळ धन होतें. जेव्हां अंतकाळ होण्याचे दिवस आले त्यावेळीं त्यानीं सर्व संपत्ति वेडे माणसांच्या नांवें धर्मादाय लिहून ठेविली. हें पाहून त्याचे मित्रानें विचारलें कीं, असें कां ? त्यानें उत्तर दिलें कीं, ही सर्व संपत्ति तशाच लोकांपासून प्राप्त झाली आहे.

—एक मद्यपी अतिशय मद्यप्राशन करून सडकेवर बेशुद्ध पडला. तेथें बरीच मंडळी जमा झाली. इतक्यांत एक कुत्रा येऊन त्या मद्यप्याच्या तोंडावर मुतला. तेव्हां तो किंचित शुद्धीवर येऊन बोलूं लागला कीं हे गृहस्थहो, मला तुह्मी जबरदस्तीनें पुन्हां कां दारू पाजता ?

## त्रोटक उद्गार.

थोडे दिवसांपूर्वीं मुंबई व पुणें येथील दुकानांतून द्रव्याचे कमताईमुळें कांहीं दिवस कित्येक सावकारांचीं दुकानें बंद पडल्यामुळें दिवाळें निघालीं असा गवगवा झाला होता, हें सर्वांस ठाऊक आहेच. पेढीचें दुकान ह्मणजे अब्रूचें दुकान आहे. यांत ह्मणजे पैशाची एकसारखी धार लागलेली असते असा अर्थ नाहीं. देव घेव सुरू असते. साखीवर सर्व व्यापार चालला असतो, त्यांत पैशाचे संबंधानें थोडासा कमीपणा दिसला कीं लागलीच दुकानांतील व्यवहारास व अब्रूस धक्का बसतो; आणि मग त्यास दिवाळें निघालें ह्मणतात. यांत कित्येक प्रसंगीं कांहींकांस लबाडीही करण्यास सांपडते. त्यास ओलें दिवाळें ह्मणतात. असे विश्वासघातकी लोक फार थोडे आढळतात. हल्लीं ज्यांचीं दिवाळीं निघाल्याविषयीं प्रसिद्धी झाली आहे ती पैशाच्या टंचाईमुळें निघालीं असल्याचें कळतें. अशा प्रसंगीं ज्या कित्येक सावकारांनीं दम धरिला त्यांची केवढी धन्य आहे बरें ! पुण्यांतील एका पिढीजाद दुकानदाराविषयीं सुद्धां हुल उठली होती, पण त्या दुकानदारांनीं आपली साक राखून सर्व व्यवहार पूर्ववत् चालू ठेविल्याचें ऐकून मोठा आनंद वाटतो. एकंदरींत दिवाळें काढण्यापासून एकाचीच नुकसान होत नाहीं, तर पुष्कळांचे नुकसान होत असतें. आणि हल्लीं चहूंकडे पैशाची टंचाईच आहे, तर असा वेळ कोणावरही येऊ नये ह्मणून सर्वांनीं व्यवहार चोख व मोठ्या दक्षतेने चालवावा.

पु. वै.

## तापाची सांत व तदुपशम—विचार.

सर्वत्र उत्पन्न झालेल्या तापामुळें लोक अगदीं हवालदील झाले आहेत, अशावेळीं सर्वोपयोगीं पडावें ह्मणून रा.रा. शंकर दाजी शास्त्री पदे वैद्य, आर्यभिषक्कर्ते यांनीं या संबंधाचा केलेला विचार, प्रसृत होण्याकरितां आमच्याकडे पाठविला आहे; व तो जरी विस्तृत असल्यामुळें आमच्या पत्राची जागा अडविणारा आहे, तथापि लोकोपयोगी व प्रस्तुत फार अवश्यक जाणून, होईल तितका संक्षेप करून, तो या खालीं देत आहों. तरी त्याकडे लक्ष्य देऊन, वाचक आपला उपयोग करून घेतील अशी आशा आहे.

"हल्लीं जो या हवेमुळें ताप येतो, त्याला कफवात प्रधान पित्तज्वर ह्मणणें सयुक्तिक दिसतें. परंतु हा 'इन्फल्युएंझा'* नांवाचा ताप असून, हा स्पर्शसंचारी असल्याबद्दल अर्धवट निकाल केल्याचें पाश्चिमात्य मतांवरून कळतें. परंतु तसा हा ताप नाहीं; किंवा निदान आमच्या हिंदुस्थानांतल्या तापाला तरी तसा ह्मणतां येणार नाहीं. साधारण त्याच्या जवळ जवळ हा येऊं शकेल; ह्मणून तो 'तो' व 'तसा' नव्हे. 'तसा' स्पर्शसंचारी हा ताप असता, तर इतकी हवा दोषी झाली असताही लोकांचें बळी चांगलेच घेतल्याशिवाय इतके दिवस कधींच राहिला नसता; हा एक वरवरचा विचार होय. परंतु शास्त्रीय दृष्टीनें पाहिलें असतां, हा स्पर्शसंचारी ह्मणण्यास तसें त्यांत कांहींच नाहीं. मुळीं हवाच दोषी असल्यामुळें, व त्या दोषी हवेला जसें अनुकूळ शरीरगृह मिळाले किंवा मिळेल, तसा त्यांत तिनें संचार केला व करील; याचा अनुभव पाहण्याकरितां प्रत्येकानें आपापली,— सदर ताप उत्पन्न होण्यापूर्वींची प्रकृति, त्यानंतर आहारविहारादि घडलेल्या गोष्टी, व ही सांत सुरू होण्याला जीं कारणें वर दिली आहेत तीं, यांचा मेळ घालून पाहावा; ह्मणजे तेव्हांच कळून येईल.

जोंपर्यंत ही अशी दूषित हवा आहे, तोंपर्यंत तर सर्वांनींच जपलें पाहिजे; पण त्यांतही हरएक कफविकृति रोग्यानीं, हृद्रोग्यांनीं, आणि पडशाचा आजार ज्यांना विशेश कष्टदायक होतो अशांनीं फारच जपलें पाहिजे. मोकळी हवा, परंतु ती शैत्य करणारी नसून, फक्त कोंडल्यासारखें होऊं नये ह्मणून स्वच्छ हवा घ्यावाची इतक्या पुरतीच बेताची घ्यावी. ह्यांतही ती पित्तप्रकृतीला कमीजास्त चालेल, परंतु शैत्य किंवा वर दर्शविल्या कफप्रकृतीला बेताची असावी. डोकें, गळा व पाठ—पोठ, यांना बेताची ऊष्णता व शीतता पोंचेल अशा तऱ्हेनें त्यास कपडे घालणें किंवा दुर करणें; शरीराचे हरएक स्नायू, संधि वगैऱ्यांना माफक श्रम द्यावेत; परंतु ते हालण्याचालण्याशिवाय सारखेच ठेऊं नयेत ह्मणजे नियमित व्यायामापासून जितकें स्नायूंनां सौख्य देतां येईल, तितक्या तऱ्हेनें, फिरून, बेताचें रगडून किंवा माफक चोळून अथवा त्या त्या तऱ्हेचे श्रम करून, लहान मुलांप्रमाणेंच त्यांची बरदास्त ठेवली पाहिजे. आणि असें न करितां, जर त्यांना कांहीं विकार झाला, तर त्यांवर उपाय करायाचे ते विशेश उष्ण किंवा थंड अथवा जास्त श्रमकारक असे करू नयेत. तर वायु, श्लेष्मा याचा नाश व्हावा, परंतु पित्त वाढूं नये; पिताचा नाश झाला तरी वायु— श्लेष्माचा जोर होऊं नये; अथवा दोहींचा नाश होण्यासारखे उपाय करावे. विशेश आंथरुणावर पडून राहणेंही या तापास बरें नाहीं. पण ती विश्रांती वर लिहिल्या प्रकारची— शक्तिमान, कुवत व सहनशीलता यांना अनुसरून माफक कमीजास्त असवी.

प्रकृतींत ज्याप्रमाणें वातादिदोष कमीजास्त असतील, त्याप्रमाणें या हवेंत उत्पन्न त्रिदोषांचा कमजास्त जोर होतो. यांत सर्व प्रकृतीवर—एकंदरींत सर्व लोकांवर—शक्तिहीनत्वाचा थोडाफार परिणाम घडतोच. आणि ज्या त्या गांवांतील मूळची हवा, मनुष्यांची प्रकृति व या रोगामुळें उत्पन्न दोष, यांच्या साम्यासाम्यानुरूप सर्वांवर व सर्वत्र, याचे परिणाम भोगणें भागच आहे. वर लिहिल्याप्रमाणें या हवेंत लोकांनीं जपणें तर भाग आहेच; परंतु शक्ति कायम राहण्याकरितां औषध घेतेवेळीं—केवळ शारीरिक दोष उत्पन्न होऊनच या हवेचा परिणाम भोगावा लागला नसेल तर शक्त्युत्पादक पौष्टिक किंवा दीपक औषधांचें मिश्रण चालू असलें पाहिजे. तसेंच माफक तालीम किंवा नमस्कार अथवा त्या सारखे प्रकार कीं ज्यामुळें शरीरांतील सर्व स्नायूंचें चलनवलन घडेल, असें व्यायाम करणें फार हितावह आहे. आणि ज्यांनां येत असेल, त्यांनीं प्राणायामेंकरून कुंभक—रेचक पद्धतीनें शक्त्यनुरूप प्राणवायूचाभिसरण करणेंही पथ्यावर पडणारें आहे. बिघडलेली हवा आंगवळणी पडण्यास—अशीच राहिल्यास—बिघडल्यापासून अदमासें फार तर दोन अडीच महिने लागतील. आणि मध्येंच अभ्रें वगैरे न आल्यामुळें सुधारल्यास उत्तमच! तथापि बिघडलेली हवा प्रत्येकाच्या पचनीं पडण्यास—प्रकृतिमानाप्रमाणें प्रत्येकास ८ पासून तीस दिवसापर्यंत साधारणपणें अवकाश लागेल, आणि तोंपर्यंत—प्रत्येक दिवशीं दोहोसांज किंवा एक वेळ घेतल्यास उत्तमच! किंबहुना निदान एक दिवसा आड तरी खालील प्रमाणें काढा ('चहा ह्मटला तरी चालेल.) करून घेणें—

अदमासें ३ तोळे तुळशी, अर्धा तोळा सुंठ व ५ तोळे खडीसाखर, १६ तोळे पाण्यांत उकळवून, तें पाणी गाळून, त्यांत—असल्यास गायीचें किंवा ह्मशींचें दूध ५ तोळे टाकून घेणें.

आणि या हवेचा परिणामच जर शरीरावर होऊं लागला तर सदर प्रमाणें काढा निमा किंवा चतुर्थांश उरवून दोहींसाज नव्या जिनसांचा करून घ्यावा. पडशानें डोकें विशेषच दुखूं लागल्यास शिंका येणारीं औषधें—जशीं नाकशिंकणी ( भूतकेश ) तपकीर इ.—ओढून शिंका आणाव्या; ह्मणजे प्रकृति साफ होईल. ज्यांच्या प्रकृतीला शिंका येण्यानें त्रास होत असल्याचा अनुभव असेल, त्यांनीं असें करूं नये. डोकें दुखत असल्यास, त्यावर आणखी येणें प्रमाणें उपचार करावा—दुधांत सुंठ व थोडासा कापूर, असें दाट उगाळून टाळूवर लेप करावा. आणि त्यावर कापसाची वडी बसवावी.

खोकला, ताप इत्यादिमुळे फार त्रास वाटूं लागल्यास—२ तोळे तुळशी व मंजुरा, १ तोळा गुळवेल, १ तोळा अडुळसा, १ तोळा सुंठ व ५ तोळे खडीसाखर, यांचा २० तोळे पाण्यांत काढा करून निमे अथवा चतुर्थांश पाणी उरल्यावर गाळून घेणें. कापुराचा थोडथोडा वास घेणें.

शैत्य, कफ किंवा उष्ण विशेष वाढेल असे पदार्थ खाऊं नयेत. सदरहू औषधांत प्रवाळ, सूतशेखर, लोह, मंडूर इत्यादि पौष्टिक, पित्तशामक अशा औषधांचा उपयोग केल्यासही उत्तम. परंतु नुसत्या याच औषधानें पैत्तिक प्रकृतीला किंवा तशा देशांत गुण येईल. तथापि त्यांस जोर येण्याकरितां वर लिहिलेले काढे

*'प्रतिश्यायी कफवात ज्वर' असायाचा अर्थ घेऊन आह्मीं लिहिलें आहे.

नोडीस असल्यास उत्तमच. आणि इतरत्र तर वर लिहिलेले किंवा वरच्या गुणासारखीं औषधें पाहिजेतच. जेथें वर दर्शविलेल्या पौष्टिक औषधांचाच उपयोग करण्यानें गुण दिसेल, तेथें विशेषत: प्रवाळ, सूतशेखर हीं उपयोगीं पडतात. काढ्यांत लिहिलेलीं प्रमाणें, मुलांना शक्ति व वयमानाप्रमाणें निमी किंवा त्याहून थोडी कमीं करावी. पुष्कळ लहान मुलांना पहिलाच काढा उपयोगांत आणावा. हवा स्वच्छ होण्याकरितां ऊद, चंदन, कापूर इत्यादिकांचा धूप श्रेयस्कर आहे. आणि पाण्यांत वाळा घालून, तें कढवून निवालेलें पिणें गुणावह आहे. निदान नुस्तें कढवून निवालेलें पाणी सर्वांनींच पिणें जरूर आहे. वाग्भटानें त्याचे असे गुण सांगितले आहेत.—

अनभिस्यंदि लघु च तोयं क्वथितशीतलम् ।

"कढवून थंड झालेलें पाणी, हलकें व कफाला न वाढविणारें असें आहे." यावरून उघडच आहे, कीं हल्लींच्या हवेंत कफाचा भाग विशेष आहे,—आणि तो, नुस्त्या पाण्यानें, शरीरांत सहाजिक उत्पन्न व्हावयाचा, तो अशा पाण्यानें उत्पन्न होत नाहीं— आणि पचनक्रियेस जोर राहतो. यांत मुख्यत: कफ व पित्ताचा नाश होऊन, पचनक्रिया व शक्ति कायम राखणारे किंवा वाढविणारे असें औषध विशेष गुणाकारी व योग्य आहे. आणि पथ्यानें वागणें हें तर त्याहूनही जरूरीचें आहे.

ज्या ठिकाणीं या तापाची सांत आली नाहीं, तेथें कांहीं अवकाशानें थोडीफार तरी आल्यावांचून राहणार नाहीं—व इचा संचार यद्यपि सर्वत्र झाला आहे, तथापि ज्या त्या ठिकाणच्या मूळच्या स्वच्छ किंवा वाईट हवेच्या मानःप्रमाणें आणि या दूषित हवेचा वेग जसा ज्या बाजूला वाहवला, त्या मानाप्रमाणें, मागेंपुढें किंवा थोडाफार परिणाम सर्वत्र झाला व होणार; करितां सर्वांनीं विचारपूर्वक वर्तन ठेऊन, आपापल्या प्रकृतीस जपावें ही सर्वांस विनयपूर्वक प्रेमाची सूचना आहे. आणि ही पुष्कळ दिवसांपूर्वींच, यथाशक्ति विचारानिशी करावयाची उत्कट इच्छा होती; परंतु नव्या नव्या अडचणीमुळें तसें करतां आलें नाहीं; या बद्दल—दिरंगाई झाली ह्मणून—वाईट वाटतें. असो. यथाशक्ति स्थल—कालानुरूप या संबंधी विचार करून वाचकांपुढें ठेवला आहे; आणि त्यांत न्यूनाधिक गुणदोष झाले असल्यास ते सुधारण्याचा त्यांस पूर्ण अधिकार आहे.

शंकर दाजी शास्त्री पदे, वैद्य,
आर्यभिषक्कर्ते.
मुंबई, नवानागपाडा, आर्यभिषक्'कचेरी.

## निवडक बातम्या.

पंचांग—रा० रा० जावजी दादाजी यांनीं आपलें सुंदर पंचांगाची एक प्रत आह्मांस पाठविली त्याचा आह्मी अभार पूर्वक स्वीकार करितों.

—ब्यांकनोटा—प्रतिदिवशी ब्यांक आफ इंग्लंडच्या ५०,००० नोटा तयार होतात.

—सयामच्या राजा जवळ एक स्त्रियांची पलटण आहे.

—अस्ट्रेलियातील जंगलांत कित्येक झाडांची उंची ५२५ फुट आहे.

—मिस्टर ब्राडला ज्या वेळी येथें आले होते त्या वेळीं एका कारागिरानें एक तांदुळाचा दाणा नजर केला. त्या बद्दल विलायतेतील बरेच पत्रकर्ते आणि पार्लमेंटातील सभासद पाहून चकीत झाले. त्या तांदुळावर "मिस्टर चार्लस ब्राडला मेंबर फार इंडियाका पाचवी इंडियन न्याशनल क्रांग्रेस जीसे शुभागमण करती है." शाबास कारागिर!

—मदुरा येथे पोलीस शिपायानें ५००० रुपयांची सरकारी रक्कम चोरली. तपासांत सांपडली.

—पुण्यास डयुक आफ कनाट नावाची लष्करी कालेज मुलाकरितां स्थापन होणार आहे.

—हिंदुस्थानांत हल्लीं जी लोकसंख्या आहे, तिची जातवारीनें गणना आहे ती येणेप्रमाणें-हिंदु १८,७९,३७,४६८; बौद्ध ५४,१८,८९५; मुसलमान ५,०१,२१,५९५; पार्शी ८५,३९७; ख्रिश्चन १८६३८९५; व ज्यू १२००९ आहेत.

— बंगाल इलाख्यांत एक १७ वर्षांची मुलगी सती गेली.

## मुंबईतील बाजारभाव.

### दरखंडीस.

| रु. पासून रु. | | रु.पासून रु. | |
|---|---|---|---|
| गहूं | २५–३६ | तांदुळ जिरे. | ३१–५० |
| आंबेमोहोर | ४० | डाळ तुरीची | २८–३५ |
| बाजरी | २०–२८ | ,, चण्याची | २८–३२ |
| उडीद | २५–२८ | ,, उडदाची | ३७–४१ |
| चवळी | ४०–४६ | चणे | २१–३० |

### दरमणास.

| | | | |
|---|---|---|---|
| अक्रोड | ३॥।–५। | आरारोट | २॥–३॥ |
| खजूर | १।–२ | घारळीं | ५–८ |
| मिरीं | ९–१३ | साबु तांदुळ | ३–४ |
| उद | १०–२५ | सुपारी | ३–८ |
| सुंठ | ४–८ | साखर | २॥–५ |
| अंजीर | ३–५ | काफी | १२–३५ |
| कोकम | १॥।–२॥ | खारीक | १॥–३ |
| खिसमीस | ४–८ | जरदाळू | ३–४॥ |
| गुलाल | २॥।–४ | बदाम | ५–८ |
| मनुका | २॥–४ | लवंगा | ११–१४ |

### दररतलास.

| | | | |
|---|---|---|---|
| वेलदोडे | १–२॥ | जायफळ | १–१॥। |
| जायपत्री | १॥।–२ | चहा | .।.–१। |

### दरसुतींभारास ( तोळ्यास )

कस्तुरी२०–३०सोनें१०० नं.२३८–॥
चांदी चिनाई१८-८–।,,९७,, २२८–
गांवठी १८। जर्मन सिलव्हर ८–८≡

### दरपेटीस.

आ. का. ग्रोस.॥।-॥ केरोसिन ३॥।=४।
कापूर२४ २६कलईचे पत्रे२२॥२२॥।=

### दरहंड्रेवटास.

पत्रे घरावर घालण्याचे ९–११॥
तांब्याचेपत्रे३९–५४॥।पितळ३७–५३
जस्ताचे पत्रे २०–२२ ग्याल्व्हानिइड ११-१३

### कापूस.

दर ७ हंड्रेवेटाचे खंडीस.

| | | |
|---|---|---|
| भडोच | .२०० पा. २०४ | उमरावती२०५पा.२०६ |
| अकोट | .१९५ पा.२०० | वेरावली १९५पा.२०० |
| धोलेरा | . १८५ पा. | धारवाडी १८०पा. १८५ |
| भावनगरी | . १९०पा. १९५ | कुमटाई १७० पा. |
| खानदेशी | .२०५पा.२०७ | इदापुरी१६०पा.१६५ |
| हिंगणघाट | २२५पा. २३० | आंथणी १८० पा. |

---

## पुणें.

| दरपल्लयास. रु. | दरपल्लयास. रु. |
|---|---|
| बाजरी ७॥ पा. १० | ज्वारी ७ पा. ८॥ |
| गहूं १० पा. १३ | साखर २८ पा. ३२ |
| तांदूळ १३ पा. १५ | तूप ८० पा. ९२ |
| दाळहर.१०॥पा.१२ | तेल ३०। पा. ३२ |
| दाळतु. ९ पा. ११ | गूळ १२ पा. १५ |

### सोनें, चांदी, तांबें व पितळ यांचा भाव.

| | |
|---|---|
| सोनेंशं.नं. १तो. २४। | चांदी१०० नं.१०७। |
| तांब्याचे पत्रे मण११। | पत्रे पितळेचे मण११ |
| जुनें तांबें मण. ९॥ | जुनें पितळ मण ७ |

**सूचना**—या पत्रांत जे साधारण व उंची जिनसांचे भाव दिले आहेत ते आज तारखेचे असून एथील खरेदीस लागूं आहेत, बाहेरून आलेले विक्रीचे मालास लागू नाहींत. व ते कोणत्या मापानें व वजनानें येथें विकले जातात तें समजण्यास एक आण्याचे टिकीट उत्तराकरितां पाठविल्यास ह्या पत्राचे म्यानेजरकडून खुलासा मिळेल.


## प्रवास—गृह—वैद्य

सर्वांस संग्रहा लायक असून, ह्यातील सर्व औषधें खात्रीची व पेटी उत्तम सोईस्कर वगैरे बद्दल विद्वान डाक्टर व वैद्यांचे पुष्कळ सर्टीफिकीटे मिळली आहेत.

पेटींतील औषधें—ताप, हिव, जंत, हगवण आमांश; अजीर्ण, पोटशूळ, जुलाब, खोकला, दमा, पटकी, खरूज, जखम, नेत्ररोग, गरमी, कर्णरोग, सर्व विषारांवर, नागाचे विषावर, धुपणी, प्रमेह, प्रवाळ, वसंत, सूतशेखर, रससिंदूर. वरील २१ रोगावरील औषधें अनुपानाचे पुस्तकासह न. १ पेटी किं. रु. ६ व न. २ पेटी किं. रु. ५. बंगीखर्च १–६ आणे. रोख दाम किंवा व्ही. पी. नें मागविल्यास पाठवू.

जी. वी. नाईक आणि कंपनी.



शुद्ध वनस्पतींचें पूर्ण सुखदायक.

## जंबीरतेल.

मानसिक श्रम फार करणारे, जज्ज, बारिस्टर, वकील, वर्तमानपत्रकर्ते, उंच प्रतीचे शिक्षणाध्यायी, ग्रंथकर्ते, रेलवेंतील कामदार, इत्यादिकांचा मेंदू (बुद्धिस्थान) तरतरीत ठेवणारें आणि झोंप आणणारें हेंच तेल आहे. हें नष्ट निद्रा आणि मस्तकांतील पित्तादिविकार यांजवर रामबाण आहे. यांत रसायनाचें किंवा कैफांचें मिश्रण नाहींच. आठवड्यांतून एकदां मस्तकास लावावें. १ औंसाची कुपी ४ महिने पुरेल. किंमत रु० १८४. व्हाल्युपेएबलनें ट० ख० ८६ आणे.






**विजेची लेखणी**—स्मरणशक्तीकरितां आणि हातास लिहितांना कापरे सुटतें त्यानीं हिचा व आंगठीचा उपयोग केल्यास फायदा करील. किं. रु० १॥ व्ही. पीने मागविल्यास पाठवूं.

जी. बी. नाइक कंपनी.






सर्व जातीचीं घड्याळें बाजाच्या पेटया वगैरे उत्तम प्रकारचे दुरुस्त करून वेळेवर ग्यारंटीसह रिपेर माफक आकारानें करून देऊं.

जी. वी. नाईक आणि कंपनी,



C. S. KALE & Co.
*MANUFACTURING, OPTICIANS AND JEWELLERS.*



खरे गारेचे चष्मे लांब व जवळचे दृष्टी करितां. कीमत रु. ३। पासून रु. ३० पर्यंत. फक्त वय किंवा डाक्टरचे नंबर कळवा. व्ही. पी. ने पाठवू. आम्ही सर्व प्रकारचे चष्में, दुर्बीणी, बाज्याच्या पेटया मौल्यवान काचांवरील डाग, घड्यांचे रिपेरी वगैरे काम माफक दरानें करून देऊं.

सी. एस. काळे आणि कंपनी.
चष्म्याचा कारखाना.
पायधोणी समोर—मुंबई.

अनुभवाने आणि परिक्षेनें खात्री झालेलीं औषधें.

भारी अजब वस्तु !!!

## मदन संजीवनी गोळया.

### सुवर्ण भस्माच्या(सोन्याच्या) मिश्रणानें बनविलेल्या.

ईश्वरनिर्मित इंद्रियाची शिथिलता, निर्बलता, नपुंसकत्वासारखीं क्षीणता, आणि स्वमावस्था, इत्यादि सर्व दोष ह्या उत्तम गोळ्यांनीं दुरुस्त होऊन कामी जनांस धातुपौष्टिक, कामोत्तेजक इत्यादि विषयोपभोगाचे सर्व गुण प्राप्त होतात. मग ते दोष कोणत्याही वयाच्या मनुष्यांस कितीही दिवसांचे आणि कशाही कारणानें प्राप्त झालेले असोत. ते सर्व अति त्वरेनें बिनचूक बरे होतात. व ह्या गोळ्यांनीं गर्मी ( उपदंश )पासून स्त्रियांच्या आणि पुरुषांच्या जननेंद्रियावरील चट्टे, व्रण आणि शरीराच्या कोणत्याही भागावरील गर्मीचे सर्व प्रकारचे विकार, मग ते कितीही जुनाट असले तरी अति सत्वर दुरुस्त होऊन रतिसुखास संपूर्ण आणि कायमची शक्ति प्राप्त होऊन प्रकृति निरोगी ठेविते. एका मनुष्यास २० पासून ५० गोळयांपर्यंत घ्याव्या लागतील. किंमत दर ८ गोळयांस १रुपयाप्रमाणें. व्ह्या. पे.नें २०० गोळयांपर्यंत टपालखर्च ८१०आणे. अनुपानपत्र औ. सोबत. पत्ता बालबोध लिहावा. गोळया घेणारांची प्रकृती कळवावी.

अद्भुत चमत्कार !!!

## मदन संजीवनी तेल.

### अगदीं खात्रीचें आहे.

ईश्वरनिर्मित इंद्रियांची शिथिलता, निर्बलता, नपुंसकत्वासारखी क्षीणता आणि स्वप्नअवस्था इत्यादि सर्व दोष ह्या चमत्कारिक तैलमर्दनानें दुरुस्त होऊन कामी पुरुषास धातुपौष्टिक, कामोद्दिपक इत्यादि विषयोपभोगाचे सर्व गुण प्राप्त होतात, मग ते कोणत्याही वयाच्या मनुष्यास कितीही दिवसाचे कशाही कारणानें प्राप्त झालेले असोत, ते सर्व ह्या तैलमर्दनाच्या बाह्योपचारानेंच पथ्य नसतां बरे होतात. ह्या गुप्त रोगाच्या शेंकडों मनुष्यांस आज पांच वर्षांपासून बराच गुण आल्या कारणानें आज हें औषध लोकोपयोगास ठेविलें आहे. किंमत अर्ध्या औंसाचे बाटलीस सव्वादोन रुपये. बंगी नाटपेड. व्ह्याल्युपेबलनें किंमत आणि खर्च मिळून दोन रुपये २८१० आ.

सूचनाः–वरील दोन औषधें प्रत्येक निरनिराळींच आहेत. तरी दोन्ही औषधें एकाच वेळीं उपयोगांत आणल्यास फारच बरें आहे.

### विद्वान डाक्तरांचीं सर्टीफिकीटें.

मदनसंजीवनी गोळया आणि तेल ह्यांतील पुष्कळ औषधें विद्वान पंडितांच्या वापरण्यांतीलच असून त्यांच्या जाहीरातीतल्या रोगांवर उतम गुणकारक आणि निर्धोक आहेत.

डाक्टर के. बी. बुलेल एम. डी.

ही औषधें यथा योग्य वापरलीं ह्मणजे अपकार न होतां सदर्हू विकारांवर फार गुणकारक आहेत. असे तपासाअंतीं समजले. जे० जे० प्रीबल.

अनलीटीकल व कनसल्टींग केमिष्ट, कैंम कंपनी ली. करिता.

ह्या औषधाचा फार्म उपयोगी सोईस्कर आहे.

डाक्टर के. आर. विकांजी. एम. डी

ह्या शिवाय ज्यांस वरील औषधा पासून गुण आले आहेत त्यांचे दाखले औषधा बरोबर पाठवू. खालील ठिकाणी विकत मिळतील.

पत्ता जी.बी.नाइक आणि कंपनी. मुंबई भायखळा दावणी समोर.

रामकृष्ण पांडुरंग माजी मास्तर बीळगी, तालुका सिदापूर जील्हा उत्तरकानडा.

कला कौशल्योत्तेजनाचा हेतु परिपूर्ण करण्या करितां.


## हौशी कारागीर

नांवाचें एकदम पुस्तक काढणार होतों, परंतु लोकाग्रहावरून आणि दूरवर विचार करून, हें, मासिकपुस्तक काढण्याचा निश्चय केला आहे.

यामुळें, या विषयाची सर्वत्र चर्चा होईल; नवीन नवीन गोष्टी बरचेवर प्रसिद्ध होतील; लोकांना अगदीं जरूरीचें असें उपयुक्त ज्ञान मिळेल; धंदेशिक्षणास मदत होईल, इत्याद्यनेक सद्धेतु पूर्ण होण्याची आशा आहे. जास्त काय सांगावें.–त्या पेक्षां आह्मीं कांहीं तरी करून दाखवावें आणि वाचकांनीं अनुभव पहावा, हें उत्तम! वर्षाची वर्गणी फक्त १ रूपया–टपालखर्च माफ, तूर्त फक्त पत्त्यासह सह्या पाठवा.

म्यानेजर–हौशी कारागीर.

भायखळा, मुंबई.



## विजेची आंगठी व पुतळी

१०,००० विकल्या.

रक्त हें मनुष्याचें जीवित्व आहे व विद्युल्लता रक्ताचें जीवन आहे.

जगत्प्रसिद्ध आहे कीं, सर्व इस्पितळांमध्यें विजेचा प्रयोग रोगावर करतात. ज्याच्या अंगांत शुद्ध रक्त नाहीं त्या मनुष्यास विजेचा प्रयोग केलेला पुष्कळांनीं पाहिला आहे. व त्यापासून पुष्कळ आजारी मनुष्यें औषधोपचाराशिवाय बरीं झालीं आहेत, याविषयीं हजारों डाक्टर साक्ष देतील.

रक्त खराब असल्यामुळें होणारे सर्व रोग ह्या लहानशा ब्याटरीपासून बरे होतात, संधिवायु, शिरागतवायु, उणका, हाडातील दुःख, कंबरेंतील दुःख, व्रण किंवा सूज, थोंबळ, पुरुषत्वभंग, अशक्तपणा, स्त्रियाचे रोग काळजाचें दर्द, ज्वर, अर्धशिसी, मूत्राशयांतील रोग, मस्तकशूळ, मूळव्याध, आणखा इतर होणारे रोग देखील निवारण केले जातात. अशी गुणाकारी, सर्व रोग शमन करणारी आंगावर सुशोभित दिसणारी ही सर्वांजवळ असावी हें योग्य आहे. ही ब्याटरी एकदां घेतली ह्मणजे आयुष्यभराची खटपट चुकली.

किंमत दर पितळी आंगठीस रु० १॥, पुतळीस रु० १।, चांदीचे आंगठीस रु० ३, स पुतळीरु० २ सोन्याचे आंगठीस रु. २० पुतळीस रु० २२. एक डझन घेणारास एक नग ज्यास्त मिळेल. एकपासून सहा नगपर्यंत ट. ह. सहा आणे. रोख दाम आल्यास किंवा व्ह्याल्यूपेबलनें मागविल्यास पाठवूं. आंगठीकरितां बोटाचें माप पाठवा.

जी. बी. नाइक आणि कंपनी.

जनरल एजंटस. भायखळा मुंबई.

अति नियमित ! सर्वांस संग्राह्य !

नामांकित डाक्टर, वैद्य, वर्तमानपत्रकर्ते व मासिकपुस्तककार, आणि इतर सद्गृहस्थ, या सर्वांचे उत्कृष्ट अभिप्राय आहेत.

## आर्यभिषक्.

( अत्युपयोगी वैद्यक विषयाचें मासिक पुस्तक. )

सन १८८९ च्या जूलैपासून हे प्रत्येक महिन्याचे पहिले तारखेस अगदीं नियमित निघतें. लोकोपयोगी, अर्थात् ज्याची वारंवार जरूर लागते, व ज्या साठीं पदोपदीं डाक्टर किंवा वैद्याकडे धांवून जावें लागतें; आणि त्यांची मदत, कोणत्याही कारणानें वेळींच न मिळाल्यास दुर्धर परिणामही होतात; ती अडचण दुर करणारीं उत्कृष्ट औषधें; रोगांचीं निदानें, व वनौषधींचें वर्णन, एकंदर माहिती, त्यांचे गुणदोष, त्यापासून रोगांवर कसे फायदे घडतत; इत्यादि सर्व माहिती व स्थलानुसार संस्कृत सर्वमान्य, उत्तम ग्रंथाची भाषांतरें वगैरे संग्रह यांत होत असतो. त्यामुळें हें किती उपयुक्त आहे, हें निराळें सांगण्यास नको. तसेंच आजपर्यंत लोकांस थोडा फार अनुभवही आला आहेच. याची वर्षाची वर्गणी २ रु. व टपालखर्च ६ आणे. लायबरीस (सरयारी अंमलयाराचा दाखला पाठविल्यास) टपालसह फक्त दीड रुपया. वर्गणी आगाऊ आली पाहिजे. कदाचित् माग.हून राहिल्यास दुप्पट पडेल. अंकव्ह्याल्युपेएबल्नें मागवावा, ह्मणजे त्रास नाहीं. उभयपक्षींही उत्तम ! फुटकळ अंक मिळणार नाहीं. फक्त नमुन्यास मात्र ४॥ आग्यास अंक देऊं. पत्रव्यवहार पोष्टपेड असून, उत्तरास कार्ड किंवा टिकीट असावें. पत्ता स्वच्छ बाळबोध लिहित जावा. मनिआर्डरीच्या कूपनावर, ती कशाकरितां व कोणीं पाठविली. वगैरे सर्व खुलासा करीत जावा.

शंकर दाजी शास्त्री पदे, वैद्य.

आर्यभिषक्कर्ते.

मुंबई, नवानागपाडा, घर न० १६० व १६१. ' आर्यभिषक् ' कचेरी.

विक्रीस तयार.

जुन्या हस्तलिखित बडातिल औषधींचा संग्रह.

## औषधी-बाड.

### भाग १ ला.–पूर्वार्ध व उत्तरार्ध.

याची सर्वत्र प्रसिद्धि झालेचि आहे. त्या पेक्षां ज्यास्त सांगण्याची गरज नाहीं; याची पृष्ठें अदमासें तीनशां जवळ जवळ आहेत व सुमारें चौदाशें औषधें सांगितलीं, आहेत. त्याशिवाय कठीण शब्दांचा कोश रसायनांचें शोधन, परिभाषा, परीक्षा, वगैरा प्रकरणें आहेत. किंमत ४ रुपये. व टपालखर्च ४ आणें. आगाऊ पैसे पाठवून किंवा व्ह्याल्युपेएबलनें मागवा.

शंकर दाजी शास्त्री पदे, वैद्य.

आर्यभिषक् कर्ते.

मुंबई, नवानागपाडा, नंबर १६० व १६१ ' आर्यभिषक ' कचेरी.

" गंगी आणि सूर्यराव किंवा गोमाजी कापसे याचें चरित्र, " व " साध्वी तारा योग्य मोबदला " ही दोनही पुस्तकें छापण्याचें काम जारीनें चालू आहे व भरावयाच्या सह्या थोड्याच राहिल्या आहेत. आगाऊ किंमत मागत नाहीं फक्त सह्या पाठविणारास पहिले पुस्तकास १२ आणें व दुसऱ्यास ५ आणे पडतील पेक्षां त्वरा करा.

पत्ता–भास्कर गोविंद रामणी गोवा. फोंडा. वाडी.

हास्यतरंग—इस किताबमें उमदा नसीहत और दिल्लगीसे भरे चुटकिले संग्रह किया गये हैं कि जिनके पढतेही दिल खुश लेटपेट हो जाता है. किंमत ८= आणे. ट. ह. ८॥-

म्यानेजर व्यापारोत्तेजक.

BOMBAY :—Printed for the Proprietor at the " Indian Printing Press."

पुरवणी!

## आगाऊ वर्गणीची मुदत सरत आली.

---

# सार्थ वाग्भट

किंवा

## वाग्भटकृत अष्टांगहृदय याचें

## मराठी भाषांतर.

सदर्हू भाषांतर बडोदें येथील दक्षिणा कमिटीच्या जाहिरातीवरून **डाक्टर गणेश कृष्ण गर्दे** यांनीं तयार करून सदर कमिटीकडे पाठविलें होतें व तें पसंत पडून त्याजबद्दल **श्री० गायकवाड सरकाराकडून** ग्रंथकर्त्यास २०००रुपयांचें बक्षीस मिळालें आहे ग्रंथ तयार होऊन सुमारें चार वर्षें झालीं परंतु त्यांस फुरसत नसल्यामुळें तो छापून प्रसिद्ध करण्याचें काम तसेंच राहिलें होतें. अशा उपयुक्त ग्रंथाची लवकर प्रसिद्धि करणें फार महत्वाचें दिसल्यावरून तें काम त्यांच्या मदतीनेंच आम्हीं पतकरलें आहे. ग्रंथ छापण्याचें काम हल्लीं आमच्या येथें फार झपाट्यानें चाललें असून येत्या जून जुलईच्या सुमारास तो तयार होऊन लोकांच्या हातीं पडेल अशी आमची उमेद आहे. सांचा डेमी अष्टपत्री, कागद उत्तम व टाईप नवीन असून स्पष्ट असे घातले आहेत. ग्रंथरचना अशी आहे कीं पहिल्यानें मूळश्लोक (वाक्यार्थ पुरा होईपर्यंत), त्याचेखालीं त्याचा सुबोध मराठी अर्थ व ठिकठिकाणीं स्पष्टीकरणार्थ व अधिक माहितीकरितां पुष्कळ टिपा दिल्या आहेत. ह्या तीन भागांकरितां ( मूळ, अर्थ व टिपा ) तीन तऱ्हेच्या टाइपांचा उपयोग केला आहे.

ग्रंथाच्या अखेरीस परिशिष्ट या सदराखालीं पुष्कळ अवशिष्ट टिपा व स्पष्टीकरणें दिलीं आहेत. विषय शास्त्रीय व मूळचा संस्कृतांतला असल्यामुळें भाषांतरांतही कांहीं ( रोगांचीं नांवें वगैरे ) दुर्बोध शब्द राहिल्यामुळें त्यांचा अर्थ वाचकांस समजण्याकरितां ग्रंथांतील एकंदर पारिभाषिक व कठिण शब्दांचा एक वर्णानुक्रमकोश अखेरीस जोडला आहे; शिवाय ग्रंथाची उपयुक्तता वाढविण्याकरितां व सर्व लोकांना ( वैद्य नसणारांनाही ) त्याचा क्रियेमध्यें सुलभ रीतीनें उपयोग व्हावा म्हणून एक रोगांचा व विकारांचा चिकित्साकोश वर्णानुक्रमानेंच केला आहे. प्रस्तावनेंतही आर्यवैद्यकाचा इतिहास वगैरे पुष्कळ उपयुक्त माहिती आहे. या सर्व कारणांमुळें ग्रंथ बराच मोठा झाला आहे. एकंदर पानें सुमारें १६०० होतील, व त्यांचीं दोन व्हाल्युमें बांधलीं जातील. त्याची आगाऊ किंमत १० रुपये ( टपाल हंशीला शिवाय ) ठेविली आहे. आजपर्यंत झालेल्या अशा मासल्याच्या ग्रंथांच्या ( डा० कुंटे यांचा सटीक वाग्भट वगैरे ) किंमतीच्या मानानें ही फारच थोडी आहे. समग्र पुस्तकाचें वजन किती भरेल याचा अंदाज करतां येत नाहीं सबब टपालखर्च किती पडेल हें आज ठरविलें नाहीं. तें मागाहून कळविण्यांत येईल.

आजपर्यंत संस्कृत वैद्यकाचीं म्हणून जितकीं मराठींत भाषांतरें झालीं आहेत तीं वैद्यजीवन, शार्ङ्गधर वगैरे किरकोळ अर्वाचीन ग्रंथांचींच आहेत; किंवा निघंटरत्नाकरासारखीं १८ धान्यांचीं कोडबोळीं आहेत ( कीं ज्यांत चरकादि महर्षि व अलीकडचे माणिकभट एका पंक्तींत बसविले आहेत व चूर्णांतील 'सैंधवाचा' घोडा असा अर्थही केला आहे ). परंतु आर्यवैद्योक्त समग्र अर्थाची प्रतिपादक व उपयुक्त माहितीनें परिप्लुत व सर्व हिंदुस्थानभर हजारों वर्षें नांवाजलेल्या अशा ह्या अष्टांगहृदय संहितेचा कोणत्याही प्राकृत भाषेंत तर्जुमा झालेला नव्हता. ही उणीव ह्या **सार्थ वाग्भटानें** फार चांगल्या प्रकारें भरून येत आहे यावरून आह्मी छापीत असलेला ग्रंथ किती उपयुक्त आहे हें आम्हीं सांगावें असें नाहीं. आमच्या जुन्या वैद्यकाचा खरा अभिमान बाळगिणाऱ्या व त्याचा जीर्णोद्धार व्हावा अशी सदिच्छा मनांत वागविणाऱ्या लोकांनीं या आम्हीं हातीं घेतलेल्या जड व खर्चाच्या कामास उदार आश्रय देऊन स्वल्प किंमतीस एक उत्तम ग्रंथ आपल्या संग्रहास जोडण्याची व आपापल्या शक्त्यनुसार या जीर्णोद्धाराच्या कामास साहाय्य केल्याचें सुश्रेय मिळविण्याची अमूल्य संधि दवडूं नये अशी सर्वांस सविनय प्रार्थना आहे.

∴ आगाऊ वर्गणी कांहीं नियमित संख्येइतक्याच वर्गणीदारांकडून तेवढी घेतली जाईल; तितकी संख्या भरली म्हणजे आगाऊ वर्गणीचा हा दर बंद होईल यासाठीं वर्गणी भरून नांवें नोंदण्याची त्वरा करावी.

**हरी नारायण गोखले,**

**म्यानेजर, "आर्यभूषण" छापखाना, पुणें.**

# विक्रीचीं पुस्तकें.

खालील पुस्तकें पुणें, आर्यभूषण छापखान्यांत विकत मिळतील.

## चार्लस ब्राडला एम. पी.

यांचें चरित्र.

किंमत चार आणे.

पुणें आर्यभूषण छापखान्यांत विकत मिळेल.

## विलायतचा प्रवास.

### भाग पहिला.

यांत निरनिराळ्या देशांचें, लोकांचे चालीरीतींचें व प्रेक्षणीय स्थलांचें वर्णन फार मार्मिकतेनें केलें आहे. पुस्तक जाड कागदावर छापलें असून बांधणी सुरेख व मजबूत आहे. किंमत ०।१२ आणे. ट० ह० २ आणे. आर्यभूषण छापखान्यांत मिळेल.

**देशीहुन्नर**—अथवा हिंदुस्थानांतील देशी कारागिरीचें वर्णन. रा. सा. बाळकृष्ण आत्माराम गुप्ते, क्युरेटर, गव्हर्मेंट सेंट्रल बुक डेपो, यांनीं केलेलें. किंमत रु० ३, ट० ह० ।०४.

**रा. रा. शंकर मोरो रानडे बी. ए. कृत**

**दौलतराव नाटक**—किं० ०।१०आणे. ट०ह०१आणा.

**प्रेमगुटिका नाटक**—किं०५आणे.ट०ह० १आणा.

**अधिकारदानविवेचना नाटक**—किं० ५ आणे. ट० ह० अर्धा आणा.

**डाक्तर व वैद्य प्रहसन**—किं०२॥ आणे. ट०ह० अर्धा आणा. पुणें आर्यभूषण छापखान्यांत मिळेल.

**चंडकौशिक नाटक**—किं० ६ आणे. ट० ह० १ आणा. पुणें आर्यभूषण छापखान्यांत मिळेल.

**अतिपीडचरित नाटक**—किं० १। रु. ट० ह० २ आणे. पुणें आर्यभूषण छापखान्यांत मिळेल.

**वीरोत्तंस नाटक**—किं० १२ आणे. ट० ह० १ आणा. पुणें आर्यभूषण छापखान्यांत मिळेल.

**अनुतापशमन नाटक**—किं० १२ आणे. ट० ह० १ आणा. पुणें आर्यभूषण छापखान्यांत मिळेल.

**पतिशिक्षा प्रहसन**—किं० ४ आणे ट० ह० अर्धा आणा. पुणें आर्यभूषण छापखान्यांत मिळेल.

**लटपटाध्याय प्रहसन**—किं० २ आणे. ट० ह० अर्धा आणा. पुणें आर्यभूषण छापखान्यांत मिळेल.

**व्याघ्रांबरी प्रहसन**—किं० ६ आणे. ट० ह० १ आणा. पुणें आर्यभूषण छापखान्यांत मिळेल.

**केसरींतील निवडक निबंध**—( भाग १ ) किं० १ रुपया. ट० ह० ३.

**केसरींतील निवडक निबंध**—( भाग २ ) किं० १ रुपया. ट० ह० ३.

**संगीत शाकुंतल**—किं० १२ आणे. ट० ह० १ आणा. पुणें आर्यभूषण छापखान्यांत मिळेल.

**संगीत सौभद्र**—किं० १२ आणे. ट०ह० १आणा

**रा. रा. गोविंद बल्लाळ देवलकृत**

**दुर्गा नाटक**—किं० ५ आणे. ट० ह० अर्धा आणा. पुणें आर्यभूषण छापखान्यांत मिळेल.

**रा. रा. गणेश बळवंत जोशी बी.ए. कृत**

**रतिसुंदरी नाटक**—किं०८ आणे. ट०ह०१आणा.

**वैद्यकृत संस्कृत इंग्लिश डिक्शनरी**—किं०रु.४. ट.ह. १०आणे. आर्यभूषण छापखान्यांत मिळेल.

**रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी एम. ए. कृत**

**मोहविलसित नाटक**-(Shakspear's Winter's tale ) किं० १० आणे. ट० ह० २ आणे.

**वल्लभानुनय**—( All's well that ends well ) किं० १२ आणे. ट० ह० २ आणे.

### हेमंतव्याख्यानें.

**स्थावरजंगमात्मक सृष्टीविषयीं माहिती.**—डा० काशिनाथ बामन काणे एल. एम. एन्ड.एस. यांणीं केलेलें व्याख्यान. किं० ०२. ट. हं. ०॥.

**आमचे कलाकौशल्यांत सुधारणा करण्यास कोणकोणते उपाय योजिले पाहिजेत?**—मि० केशव बामन पेठे यांनीं दिलेलें व्याख्यान. किं.२॥ आ. ट. ख. ०॥. पुणें आर्यभूषण छापखान्यांत मिळेल.

**प्रयागांतील राष्ट्रीय सभेची हकीकत.** सदाशिव वामन काणे एल. एम. अँन्ड एस. यांनीं दिलेलें व्याख्यान. किं. ०।८३. ट. हं. ०६.

**ब्राह्मण व ब्राह्मणीधर्म किंवा वेद व वैदिकधर्म**-प्रो० राजाराम रामकृष्ण भागवत. किं० ४ आ० ट०ह० ०॥. पुणें आर्यभूषण छापखान्यांत मिळेल.

**हिंदु लोकांत ऐक्याची वृद्धि होण्यास हरकती व त्या दूर होण्याचे उपाय.**—रा. रा. वा० आ०. मोडक यांचें व्याख्यान. किं. ०१ आणा. ट.ह.०॥. आणा. पुणें आर्यभूषण छापखान्यांत मिळेल.

**सामाजिक विषयासंबंधी तोडजोड.**—नामदार का. त्रिं. तेलंग यांचें व्याख्यान. किं. ०२०६. ट. ह. ०॥. पुणें आर्यभूषण छापखान्यांत मिळेल.

**धर्मौदार्य**—वे. शां. रा० बाळ यज्ञेश्वरशास्त्री गुरजर यांनीं दिलेलें व्याख्यान. किं. १। आ. ट. ह. ०॥.

**मोगल व मोगली धर्म**—प्रो० राजाराम रामकृष्ण भागवत. किंमत दीड आणा. ट० ह० अर्धा आणा. आर्यभूषण छापखान्यांत मिळेल.

**दारुपिंडें**—रावसाहेब बाळकृष्ण आत्माराम गुप्ते, क्युरेटर गव्हर्मेंट सेंट्रल बुकडेपो, मुंबई यांनीं केलेलें. किंमत १ आणा. ट० ह० अर्धा आणा.

## १६०० प्रती खपून गेल्या.

कै० विष्णु कृष्ण चिपळूणकरकृत

# निबंधमाला

**अथवा सातही वर्षांच्या निबंधमालेंतील सर्व निबंध.**

**पृष्ठसंख्या १३०४ !!**

## किंमत ३ रुपये; ट० ख० ९ आणे.

इतका स्वस्त ग्रंथ कधीं मिळाला नाहीं.

**पुणें आर्यभूषण छापखान्यांत मिळेल.**

" पुणें, आर्यभूषण छापखान्यांत " छापिलें.

fact disposed as it is to further progress and advancement of Indians. The reason why we seek this privilege is that the govt. ruling over us is civilized. They never meant nor do they mean to keep us in a state of servitude. The people that do not possess voice in the administration of their own affairs, are without doubt under bondage and servitude; and this we are sure our gracious Empress will not permit to exist long.

## INDIA AND ITS MANUFACTURES.

There are certain times in which men and even nations are not roused to actions even though they see good prospects before them. Whatever its causes may be and however justified it may be, this lethargic spirit, when of a long standing, has ruined many men and nations. Such is the case with our manufactures. It is almost a truism to say that when compared with other civilized countries, India is wanting in its manufactures. One may object to this statement by showing to us some provinces such as those of Dacca and Kashmir. By way of answer we say that we admit that there exist some manufactures in India but they are more of a local nature than of a general one of which we are speaking. The demand for Dacca muslin or Kashmir shawls exist in India only and that too among an exclusive class. It is not like the demand for works of culteries or tanneries or weaving manufactures. We therefore positively assert that general manufactures such as cultery tannery &c. are wanting in India.

Notwithstanding this state our people are indifferent to it. They admit that these manufactures will surely enrich our beloved country; but they admit only and do nothing more. Such is the inaction in which we are lying for the present. And this inaction being of a long standing has produced a drowsiness over us in which we are forgetting our duty to ourselves to our country and to our God. It is this inaction which has made us utterly helpless and we now shamelessly ask other countries for our necessaries—necessaries which we can produce at home in less cost If we want to cover our bodies with clothes we look to the looms of Manchester. If we want knives to cut our vegitables or sythes to cut our grass or corn we are required to apply to Bedford. If our houses are falling for want of iron beams we must ask the help of England. Imagine then how we have become victims to helplessness even in necessary matters. And if this state of India goes on for some years more we are at a loss to imagine what a deplorable state she will fall into. It is to remove this lethargy, that we are today, as we have done many times before, insisting on our readers. But to try to remove this spirit is nothing but to try to remove the causes of it. So we shall try to state the chief causes of it and the means of removing them partially if not wholly. But before doing so we have left one point out of consideration. That our drift of argument should not be mis understood and misconstrued we must state here we have made one assumption and with good reasons. We have above remarked that we are required to depend upon England or some other countries even for our necessaries. An utiliterian economist will perhaps argue that articles such as clothes, knives &c. though forming part of necessaries are produced comparitively at a less cost in England than in India and therefore it is advantageous for India to buy those things in England. But this statement is made by way of anticipation and with a prejudiced mind and without any long experience and experiment. So we differ with him and assume that India can compete with England or with any other manufacturing country in these matters provided that she is roused to them. With this assumption we can now go on to deal with the causes of our inactive spirit towards our manufactures.

## Mr. Elliott.

The District of Amraoti loses a very good officer in the person of its Deputy Commissioner Mr. Elliott. One good thing with him was that he helped as much as he could the Municipality of Amraoti. When the plant of localself government is only of recent growth it naturally requires great attention and if this is not paid the plant is likely to lose its life and die a premature death. Mr. Elliott gave full scope to the energies of the working members of the Amraoti Municipality. He interfered very little with the municipal admihistration the success of which is greatly due to the prominent members of the Amraoti Bar. The members were able to carry on with their duties simply because they were trusted and confided. It is a great virtue with Mr. Elliott that he always trusts his subordinates. The subordinate officials receive no small encouragement from confidence being placed in them. Mr. Elliott, again was very civil & polite with all who had occasion to see him for one thing or another either in their official or private capacity. To lose an officer of this kind is a matter of no small regret to the people of the the District of Amraoti and especially of the Amraoti City. At this distance, we can only wish him a successful and prosperous career in life sharing as we do the regret of the Towns men of Amraoti and the country folks of the District.

A public meeting of the Akola towns men was held in the native general Library on the last Thursday evening. And it was resolved that a telegram of condolence should be sent to Mr. A. O. Hume the secretary of the Indian National Congress for the loss of his wife In the same meeting it was resolved to send an invitation on behalf of the Public to messers R. N. Mudholker & M. V. Joshi B.A.L.L.B who are to proceed to England on the 25 th inst. on behalf of the National Congress for the public good. Accordingly the invitation has been sent to and accepted by them. And proper arrangements are being made to entertain them on the 13th inst. in the Library and the Native club.

## MR. C. BRADLAUGH, M. P. IN MANCHESTER.

Mr. C. Bradlaugh, M. P. gave a series of addresses at the St. James's Hall, Manchester, on the 9th ult. In the morning his subject was "The Indian National Congress."

Mr. Bradlaugh, who was received with applause, said he was not present to defend the National Congress movement, but to justify it; he came not to apologise but to plead for it. There were some who said it was nonsense to talk of a national movement in India, because there was no Indian nation. That, however, was a mere quibble with words. Lord Cross had made the statement that only 1 per cent of the Indian people had a knowledge of the English language. But 1 per cent of 209 millions of people meant a large aggregate number. undoubtedly western education was growing. The Congress of December was an instance of the fact. He then had the honour of addressing 6000 people from all parts of that vast empire and every one understood the language. for two and a half to three millions of people had learned the language and mode or thought different from their own. The movement was sneered at as one of educated people. But that was its justification. If it concerned the wild imaginings of the most ignorant portion of the population he could understand a sneer; but when we had induced so many to break through caste restrictions, to assimilate themselves to western modes of thought, was it not foolish to deny them the opportunity of having any kind of shpere in which to exercise their new abilities? The measure which Lord Cross had introduced in the House of Lords might be taken as the answer of the Government to his own measure. Lord Cross had himself described his measure has "unimportent." Surely that was its severest condemnation before hand. No measure should be unimportant when it concerned the welfare of 209 millions of people. As showing the importance of the Congress movement, Mr. Bradlaugh pointed out that at the first Congress in 1885 there were 72 delegates; at the Congress last December there were 2,000 (Applause) Lord North brook, Lord Dufferin, and Lord Ripon had spoken in the highest terms of these people Lord Northbrook, speaking the other night said he had known some of the leaders of the movement and was satisfied of their loyalty and thoroughly hearty position towards England, and he praised their ability and general moderation. Of course some wild things had been said, but was not that always the case in regard to a popular movement when people keenly felt their wrongs and sufferings? The objection had been urged that the Mahometans of India kept aloof from the movement. He believed however, that the movement would bring the Mahometans in line with the Hindoos and break down the present line of division What did the Congress ask for? It asked for Parliamentary inquiry. Sir John Gorst had said that this would peralyse government in India, But there were parliamentary inquires in the days of the great East India Company. They could not pretent that the present was a perfect government for many grievances and many cases of injustice and corruption had been proved. On one great question alone inquiry was wanted, and that was the misappropriation or complete malversation of the whole of the moueys raised by additional taxes as a famine insurance fund to purposes other than that. This was a question of the first importance, in view of the state of things in the Punjab, where so many were in such a condition of misery and starvation as to be a cause of danger to our Empire. The Congress asked that the Legislative Coucils of the Governor General and the Governors and Lieutenant Governors might be enlarged, so that at least half of these bodies might consist of none official members, and that that half might be elective. Instead of that they had the "unimportant" proposal of Lord Cross, that Councils were to be enlarged a little if the Viceroy and Governor thought fit, and the elective principle was not to be applied at all. What the Congress sought to do was not to shake the Empire, but to make it better and firmer. A man of the almost unexampled ability of Lord Dufferin was, it was well known, in favour of some form of election in reference to the additional Members of the Councils. Then the Congress asked that there might be some Standing Committee of the English Parliment to which matters of complaint might be refered by these legislative councils when they differ ed from their Governors. All that was entirely wanting in the bill of Lord Cross As to the proposed committee, surely it was better to have some body to appeal to than none at all. It was also sought that judicial and executive functions should be separated, and the extension of trial by jury was asked. This Indian question would come before us more and more. It ought not to be and could be neglected. He wanted to see our Government made strong. That could not be done by the presence in India of a few thousand troops but it could be done by the enlistment of many million hearts and brains of men willing to stand by and help us if only we would give them the chance. (Applause.)

Mr. Bradlaugh was warmly thanked for his address.

Akola 3-4-90

To

The Editor of the Berar Samachar
Akola

The traversing of heavy laden carts upon the road between the Temple Garden and the Married Men's quarters at this station was prohibited a short time ago but I observe that the old practice has again been resumed which is cutting up the passage most frightfully. If orders are not implicitly obeyed, the parties disobeying them should be severely punished. It is hoped the Municipality will kindly make some arrangements soon and remedy the evil brought to notice.

A very peculiar disease called influenza is prevalent just now from which many are suffering I am informed it is not dangerous if cured in time.

Observer.

To Amraoty City 5-4-90

The Editor of Berar Samachar

Dear Sir,

The Tahasili and the Small Cause Court are located in one compound. Both offices have been provided with privy rooms intended for the presiding officers. As for other minor officials no provision appears to have been made. Much less for the crowding litigants of the Small Cause Court and illiterate flocking villagers of the talug attending the Tahasildars Court. They freely sit for urinary purposes before the paling of the compound on the public road against rules of decency. Who is to blame for this? The poor people for the fear of having their cases decided exparte in their absence hesitate leaving court precincts and thus avail themselves of the opportunity of breaking the law of Govt. with impunity. The same course is followed by the people attending the Tahasili Court. It is strange that the officers did not pay their attention to this want being removed. If this short letter will attract the attention of Govt. and if Govt. sanction building urinaries and privy rooms attached to both the institution the pains of the writer will be amply rewarded.

A.B.C.

पोच :— पुसदकर मित्र पत्र पावले स्थल संकोचयाबद्दल पुढील खेपेस घेऊं.

## वऱ्हाड

उमरावती येथील स्माळकाज कोर्टचें काम हुर्ती मि० एदलजी संजाना ए० अ० क० यांचे कडे दिलें आहे. तें एक दिवस बडनेरा कोर्टचें व एक दिवस येथलें काम पहातील.

मि० यासीनखा अ० क० यांनीं एक महिन्याची रजा घेतली आहे.

मि. अर्देसर दिनसाजी चीनाय यांस उमरावती स्माळ काज कोर्टाचे जडज्ज नेमलें असें कळतें

मे. क्यापटन मारिस साहेब हे रजेवर जाणार; त्यांच्या जागीं वाशीमच्या डेपुटि कमिशनरच्या जागीं मे. डेव्हीस साहेब हे येथून जाणार असें म्हणतात.

## वर्तमानसार.

हिंदुस्थानांतील सैन्यांत कांहीं पलटणी केवळ भोजन भाऊ आहेत असें दिसून आल्यावरून त्या पलटणी मोडून हुषार लोकांच्या नवीन पलटणी भरण्याचा ठराव हिंदुस्थान सरकारानें केला आहे. ह्या ठरावाप्रमाणें मद्रासेतील १० व्या, १२ व्या आणि ३३ व्या पायदळ पलटणीस ह्या आठवड्यांत निरोप देण्यात आला. ही झाडणी सर्व इलाख्यावर फिरावयाची आहे. हिंदुस्थानीं घोडे स्वारांच्या ८ पलटणींपैकीं ४ पलटणी, बंगाल्यातील ४ पायदळ पलटणी, मद्रासेतील १० पायदळ वाटलियन्स व मुंबई इलाख्यातील कांहीं पलटणी इतक्यास ही झाडणी बाधणार असा अनमास आहे.

कत्तल— ज्या 'न्यासालांड' बद्दल पोर्तुगीज व इंग्रज सरकारचा वांदा आला आहे त्या ठिकाणा नजीक पोर्तुगीज सरकारच्या एका कष्टम आफिसराची व त्या बरोबरील ३०० लोकांची क्रूरतेनें कत्तल उडविण्यांत आली असें ता० २१ च्या लंडनच्या तारेवरून समजतें. पेटलेल्या आगीवर तेल आंतण्याप्रमाणेंच ही कत्तल पोर्तुगिजास होईल!

मुंबई सरकार आणि निजाम सरकार यांच्यांतील सरहद्दीच्या मर्यादा आंखण्याकरतां जें कमिशन बसलें आहे, त्या कमिशनानें कित्येक निजाम हद्दीतील गांवें इंग्रज सरकारच्या ताब्यांत देऊन सरहद्दीची रेघासारखी करावी व निजाम सरकारास दुसरीं मोबदला गांवें द्यावी अशी सूचना केली आहे, परंतु निजाम हद्दीतील गांवचे लोक आपण इंग्रजाच्या हद्दींत येण्यास नाखूष आहों असें ह्मणतात. ऐकतो कोण!

निजाम सरकारचे राज्यांत लवकरच खानेसुमारी सुरू होणार आहे.

चंदौसी येथें एक आर्य समाजिस्ट मूर्तीपूजेचा तिटकारा दाखवून एके दिवशीं तेथें असलेल्या मारुतीच्या देवळांत जाऊन मूर्तीवर सोटा उगारीत आहे, इतक्यांत त्याचे दोन्हो डोळे गेले व चार दिवसांत मरण पावला कां आर्य, प्रार्थना व ब्राह्मो समाजिस्टांनो! कसा आहे चमत्कार! ! आतां तरी विचार करा व नीट ताळ्यावर या. बहकूं नका.

न्या. सिं.

कै. जयाजीराव महाराज शिंदे यांनीं आपल्या अंतसमयीं व्हाईसराय साहेबांस खलिता लिहून पुढील व्यवस्थेच्या संबंधानें आपले विचार कळविले, त्यांत युवराजास शिकविण्याकरितां युरोपियन शिक्षक नेमूं नये असें स्पष्ट ह्मटलें असून व्हाईसराय साहेबांनीं आपले इच्छेप्रमाणें व्यवस्था करण्याकरितां हर प्रयत्न केला जाईल ह्मणून अभिवचन दिलें होतें. असें असतां युवराजास शिकविण्याकरितां हल्लीं एक युरोपियन शिक्षक नेमला व त्याबद्दल युवराजाच्या मातुश्रीस ही विचारलें नाहीं. यावरून माजी व्हाईसराय साहेबांनीं दिलेले अभिवचनाची किती किंमत समजावयाची हें सांगावयास नकोच महाराजांचे इच्छेप्रमाणें करण्याचें सरकारचें मनांत असतें तर लायक नेटीव शिक्षक कोणी मिळाला नसता असें नाहीं. परंतु आमच्या सरकारचें कारस्थान असें कांहीं चमत्कारीक आहे कीं, तेथें मति कुंठित होते व कांहीं इलाज चालत नाहीं.

जमूनदीवरील व्यापरास तेजी आणण्यासाठीं काश्मीर पासून जमू पर्यंतची रेलवे सुरू झाली. सरकार सरहद्दीच्या बाजूवर रेलवे करण्यासाठीं अतिशय झटत आहे त्याचें कारण एक तर बचाव व दुसरें कारण सलोखा. कदाचित हीच लाईन ज्यास्त फैलावली तर रशियाकडील व्यापारी इकडे अगर इकडील तिकडे जाऊं येऊं लागल्यानें हिंदुस्थानावर असलेला रशियाचा डोळा थिजविण्यास झाला तर हाच उपाय अधिक फायदेशीर होईल असा पुष्कळ लोकांचा तर्क आहे म्हणूनच अलीकडे इंग्रजसरकार जिकडे तिकडे आगगाडी फैलावून देवबव, येणेंजाणें करण्यासाठीं झटत आहे.

हिंदुस्थानांतील आमच्या आवडत्या महाराणी सरकारचें राज्य अबादाबाखालीं चाललें आहे तों पर्यंत सर्व ठीक आहे पण एकदांना कलास लागले ह्मणचे मग ते आवरतांना फार मुष्कीलीचें होणार आहे कोणते ही खातें हातीं घ्या त्यांत लबाड्या, विश्वासघात, मतलब हा असून एक आत व एक बाहेर याचा अढळ होतो. ईश्वर या राज्यास धोका न आणो ह्मणून इकडील प्रजा रात्रंदिवस सरकारच्या कानीं कपाळी ओरडत असतां राजमुत्सद्दी लोक मन मानेल तसा नियम करून प्रत्येकजण आपआपली कारकीर्द जेमतेम पुरी करीत आहे. हे विचार येण्यास सन १८९०।९१ सालचे बजेट कारण.

ईस्ट इंडिया असोशिएशनानें लार्ड हारिस ह्यांस एक मानपत्र दिलें आहे; त्यांमध्यें त्यानीं इकडे आल्यावर कोणकोणत्या गोष्टी कराव्या ह्याचे दिग्प्रदर्शन थोडक्यांत फार चांगलें केलें आहे. त्यांतल्या मुख्य गोष्टी ह्याः—

१ शेतकरी लोकांची प्रापंचिक स्थीति सुधारण्या कडे लक्ष्य द्यावें.

२. गरिबगुरिबांमध्यें विद्याभ्यासाचा प्रसार व्हावा; त्यांना कलाकौशल्यें नवीं शिकवावी अथवा ज्यांची जुनीं आहेत त्यांस उत्तेजन द्यावें, ह्मणजे कोणी कडूं तरी त्यांस तो सर्वतोपरी शेतकीवर अवलंबून रहावें लागूं नये असें करावें.

३. आगगाड्या आणि कालवे ह्यांची वृद्धी मोठ्या सावधगिरीनें करावी.

४. मूनिसिपाल कामें जागोजागच्या लोकांनीं करावीं, आणि लोकांस स्वदेशाच्या राज्यकारभारांत पडतां यावें, अशा योजना व्हाव्या.

५. एतद्देशीय लोकांशीं विशेष दळणवळण ठेऊन, युरोपियन आणि एतद्देशीय लोक ह्यांच्यामध्यें जो जतिमत्सर आहे, तो कमी करण्याचा प्रयत्न करावा.

६. एतद्देशीय सैन्यांची सुधारणा अशी करावी कीं, त्यांत एतद्देशीय लोकांस त्यांच्या योग्यते प्रमाणें मोठमोठ्या जागा मिळाव्या.

७. एतद्देशीय संस्थानें आहेत त्यांची सुधारणा व्हावी.

आणखीही दोन चार गोष्टी आहेत; पण त्या फारशा महत्वाच्या नाहींत आम्हांस असें वाटतें कीं, लार्ड हारिस यांनीं जर एवढ्या गोष्टी मनांत ठेवून आपला राज्य कारभार चालविला तर ते दुसरे लार्ड रिपन होतील. या मानपत्रास त्यांनीं जें उत्तर दिलें, त्यांत त्यांनीं स्पष्ट अभिवचन तर काहीं दिलें नाहीं; परंतु या सूचना बद्दल त्या मंडळीचे फार फार आभार मानले आहेत आणि माझें कर्तव्य करण्यास मला परमेश्वर साह्य करो, असें म्हटलें आहे. हें फार चतुराईचें उत्तर आहे आम्ही अशी आशा करितों कीं, लार्ड हारिस हे या गोष्टी नेहमी आपल्या डोळ्यासमोर विद्यमान ठेवून आपलें काम चालवितील. असें इ. ह्मटलें तें खरें आहे.

हल्लींचे कायदे कौन्सलमध्यें मु० मुनसिपाल कमेटीमधील नोकरलोकांच्या संबंधानें कायदा होऊ पहात आहे; त्याचा खर्डा सर रजंट वेस्ट यांनीं कौन्सलपुढें आणला आहे. यांत कमेटीचे लोकांस बऱ्याच अडचणीनें बांधून सोडलें आहे कोणताही मुनसिपाल नोकर एकदम काम सोडील अगर कामकरण्यांत हायगय करील तर त्याला ६ महिन्याची शिक्षा होण्या विषयीं शिफारस झाली आहे. हा कायदा कांहीं कालांत सर्वत्र चालू होईल असा रंग दिसतो करितां स्थानिक लोकांनीं अधीच शंकानिवृत्ति करून घ्यावी.

कोल्हापुरापासून चिपळोण बंदरापर्यंत रेलवे करण्याचें घाटत आहे. म० मि०

अतिशयजुनीं मांजराचीं प्रेतें—इजिप्त मधून सुमारें ख्रिस्तीशका पूर्वी २००० वर्षे मसाले वगैरे लावून पुरलेलीं १,८०,००० मांजरें नुकतीच लिव्हरपुलास पाठवून देण्यांत आलीं. यावरून इजिप्शियन लोकांत मांजर फार पवित्र मानिलें गेलें असल्यामुळें त्यांच्या पुरण्याची मनुष्या पेक्षांही जास्त काळजी घेत असत असें दिसतें.

न्हावी लोकांची सभा. मुंबई डोंगरीवर एका गृहस्थाचे येथें जुन्नरकर, वाईकर, पुणेंकर, आणि गंगथडीकर वगैरे न्हावी मंडळीचे पुढारी मंडळीची सभा झाली. या प्रसंगी जमलेल्या मंडळीनें बोडक्यांच्या डोया भादरू नये अशा विषयीं अनुमोदन दिलें. एकानें असें म्हटलें कीं शहरचे ठिकाणीं आम्हीं करूं ते होईल परंतु गांवखेड्यात आम्ही एकल्या घरीं असता तेथें जर तेथील कुळकर्ण्याचें घरीं विधवेचें केशवपन न केलें तर आम्हांवर जुलूम होईल. या बोलणाराचें समाधान केलें. सर्व न्हावी लोकांचीं ता० ७ एप्रील सोमवार रोजीं मैदानांत टोलेजंग सभा भरविण्याचा विचार झाला. दो० बं०

पोलिसाचा एक नवीन कायदा होत आहे त्यांत घरापासून ५० पावलांचे आंत जाळ करू नये, फटाकड्या, तोटे वगैरे दारू काम सोडूं नये, प्रेतें उघडीं नेऊं नयेत, घरचा कुटुंबीय इसम जरी स्पर्शजन्य रोगानें आजारी झाला तरी त्यास सार्वजनिक दवाखान्यांत ठेविलें पाहिजे इ. इ. बाबी घातल्या असून त्यांचा विचार चालला आहे. क० त०

येत्या सालचा हिंदुस्थानचा बजेट— हिंदुस्थानच्या जमाखर्चाचा अंदाज नेहमीच्या रीतीप्रमाणें मागच्या दोन वर्षचे आकडे ही दिले आहेत व ते पुढीलप्रमाणें आहेत.

१८८८-८९

कच्चा अदमास रु. जमा ८०,०१,०५,००० खर्च ८०,७०,८५,००० सुधारलेला अदमास जमा ८१५८५५००० खर्च ८१७८७२००० नक्की रकम जमा ८१६९६६७८० खर्च ८१६५९६६०० ह्मणजे १८८-८९ सालच्या बजेटांत ६९,८०,००० रुपये व सुधारलेल्या बजटांत २०,१०००० रुपये अनुक्रमे तोटा येईल असें ठरविलें असून वर्षाच्या अखेरीस तोट्याच्या ऐवजीं ३७०१८० रुपये शिलक राहिली असें झालें. त्याचप्रमाणें १८८९-९० सालचे आकडे पुढीलप्रमाणें आहेतः—

| | कच्चा अदमास | सुधारलेला अदमास |
|---|---|---|
| जमा | ८२९३५३००० | ८४६३६३००० |
| खर्च | ८२८२९०००० | ८१९०३१००० |

ह्मणजे १०६३००० शिलक राहील असा अदमास असून त्याच्या बदला आतां २,७३३२,००० शिलक राहील असें दिसत आहे. हा चालू व गेल्या या दोन वर्षांचा अदमास असून येत्या ह्मणजे १८९०-९१ सालचा अदमास पुढीलप्रमाणें आहे.

जमा रुपये ८४,९३,२१,०००
खर्च " ८४,६२,७२,०००

मुंबई ब्यांकचे सेक्रेटरी मि० फ्रेझर यांनी पेन्शन घेतलें.

मद्रास इलाख्यातील तुरतीकोरिन येथील विद्यार्थी व मास्तर हे या नव्या तापाच्या साथीनें आजारी झाले आहेत.

स्टेट सेक्रेटरीचें कौन्सिल बिल लार्ड सभेंत पास झालें.

सिमला येथील आगीनें गरिबांची झोपडीं वगैरे जळुन फार नासाडी झाली एकंदर दहा लाखांचें नुकसान झालें असें सांगतात.

चाळीसगावांपासून धुळ्यापर्यंत किंवा मनमाडपासून धुळ्यापर्यंत रेलवेचा एक फाटा करावा अशी धुळ्याच्या लोकांनीं मुंबई सरकारास पुन्हा विनंती केली आहे. हा भाग चांगला सुपीक असून दाट वस्तीचा असल्यामुळें या रेलवेपासून चांगला फायदा होईल असें अर्जदाराचें ह्मणणें आहे. ठा० अ०

---


## पाक.

सालंमिश्री पाक घेतला असतां धातुची मजबुती होऊन शक्ती वाढते दर दिवस २ तोळे प्रमाणें ४५ दिवस घ्या.

बदाम पाक घेतला असता, मस्तकांतील उष्णता दूर होते डोळ्यास थंडावा येतो धातु पुष्ट होते बळयेते दरदिवस २ तोळे प्रमाणें ३० दिवस घ्या.

गोखरूचा पाक घेतला असतां मूत्र मार्गात होणारी आग, तिडक, जुनापरमा, मेहरोग मूत्र पुष्कळ आणि गढूळ होते तो हे रोग दूर होऊन धातु शुद्ध होते बळ येते स्त्री संगाची इच्छा होते दर दिवस २ तोळे प्रमाणें ६० दिवस घ्या.

कोहळे फळाचा पाक घेतला असतां डोळ्यास येणारी अंधारी भोवळ पित्ताचे उपद्रव हे रोग दूर होऊन रक्त शुद्ध होते धातु पुष्ट होते बळयेतें दरादिवस २ तोळे प्रमाणें ४१ दिवस घ्या.

वर लिहीलेले पाक मागविण्याची रीत

| तोळे | किंमत रुपये | पोष्टेज |
|---|---|---|
| १६ | १ | ८९ |
| ३२ | २ | ०१३ |
| ४८ | ३ | ०१३ |
| ६४ | ४ | १०१ |
| ८० एकदोर | ५ | पोष्टेज माफ |

पत्ता गजानन बाळकृष्ण वैशंपायन पेठ सदाशिव पुणें.—


---

☞ हें पत्र अकोला येथें कै. वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सहामाही " ३ " ८
सालअखेर " ७ " १०८
किरकोळ अंकास......................८४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस ......०८

Per annum in arrears 7 " 1Rs. 8 as
Six monthly............3 " 8 as
Single copy...........................4as

# वऱ्हाडसमाचार.

Advertisements
Below 10 lines... 2Rs
per line over10...4 as
Repetition per line3as

THE BERAR SAMACHAR

VOLXXIV AKOLA MONDAY APRIL 14 1890 NO 14

वर्ष २४ अकोला सोमवार तारीख १४ माहे एप्रील सन १८९० इ० अंक १४

## पत्रव्यवहार.

ह्या सदरा खालील मजकूर पत्र कर्त्यांच्या मतास मिळूनच असेल असें समजूं नये.

पुसद वऱ्हाड तारीख६ एप्रील सन१८९०

हवामानः—उष्ण दिवसानुदिवस फार होऊं लागला आहे. नदीचे पाणी चांगलें आहे तरी नदीच्या कांठीं सकाळीं व सायंकाळीं लोक घाण करितात आणि त्या पासून उष्णतेनें त्याची दुर्गंधी उत्पन्न होते तरी गांवांतील पोलीस अधिकारी इकडे लक्ष्य देतील अशी आशा आहे. गांवांत तापाचा अजार फार आहे.

गेल्या महिन्याचे ३० वे तारखेस येथील तालुके लोकल बोर्डाची सभा भरली होती त्या वेळेस सभेकरितां नियम तयार होऊन ते जिल्हा बोर्डाचे पसंती करिता पाठविण्यांत आले.

येथील लायब्ररीची जनरल सभा गेल्या महिन्यांत भरली होती त्या वेळेस लायब्ररीची व्यवस्था जास्त नियमीत रहावी म्हणून येथील मराठी शाळेचे हेड मास्तर रा. गोविंद भास्कर ओक यांस सेक्रेटरी नेमून त्यांना पूर्वीचे सेक्रेटरी रा. वामन सखाराम देशपांडे यांनीं मदत करावी असें ठरलें. तेव्हां पासून हल्ली लायब्ररी दररोज नियमीत वेळीं उघडी असते आणि वर्गणीदारांस ही वर्तमानपत्र नियमीत वाचावयास मिळतात. लायब्ररीस इमारत फारच खराब आहे तेथें सायंकाळीं बसलें असतां आंगांतून घामाच्या धारा चालतात तरी ही उणीव दूर करण्याकरितां येथील पुढारी लोकांनीं मनावर घेतलें तर दुसरी लहानशीच पण टुमदार व हवाशीर इमारत होण्या सारखी आहे.

उन्हाळ्या मुळे येथील दिवाणी कोर्ट व तहसील कचेरी सकाळीं भरत असतात ह्या जिल्ह्यांतील शाळांस ता. १६ एप्रील पासून दुपारची सुटी मिळत असते पण ही व्यवस्था फक्त वासीम जिल्ह्या करितांच आहे ह्याचें कारण काय असेल ते कळत नाहीं. ह्या जिल्ह्यांत वऱ्हाडांतील इतर जिल्ह्यांपेक्षा उष्णता कमी आहे अशी गोष्ट मुळीच नाहीं उलट थोडी जास्तच आहे असें म्हटल्यास हरकत नाहीं. ज्यांना इकडील उन्हाळा किती कडक आहे हें माहीत आहे त्यांस दुपारी तीन वाजतां लहान लहान मुलें कित्येक अनवाणीच तापलेल्या फुफाट्यांतून हायहुय करीत चाललेली पाहून कळवळा आल्या खेरीज रहाणार नाहीं. अशा कोमल बालकांची विपत्ती दूर करण्यास एकच उपाय आहे तो हाकीं, जिल्ह्यांतील सर्व शाळा मास्तरानीं आपल्या स्कुल कमेटीच्या अभिप्राया सह आपल्या अधिकाऱ्यास विनयपूर्वक ही गोष्ट कळवावी आणि इतर जिल्ह्या प्रमाणच इकडे ही ता२० मार्च पासून सकाळी एकवेळ शाळा करण्यास परवानगी मागावी. अधिकारी ही इकडे पुर्ण लक्ष्य देतील ह्यांत संशय नाहीं. अशा पुष्कळ अडचणी असतात कीं कम धैर्यामुळें त्या हाताखालचे लोक त्या अधिकाऱ्यांच्या नजरेस आणण्यास भितात. परंतु ह्यांत त्यांवर जें एक कर्तव्य सोंपविलें असेंत तें तें करण्यास चुकतात हें उघड आहे.

येथील लोकल कमेटि रस्त्याची दुरस्ती ह्या दिवसांत करते ह्या मुळें रस्त्यावर अतिशय धुराळा होतो आणि अनवाणी चालणारे लोकांस दुपारी त्या पासून फारच त्रास होतो. आपण आपले डोक्यावर घेतलेलें काम केव्हां तरी आपणासच केलें पाहिजे मग तें वेळच्या वेळीच करून टाकिलें तर आपल्यास कोणांस बोलण्यास जागा रहाणार नाहीं. कमेटी आतां यां वर्षी तरी वक्तशीर काम करील ही आशा आहे. कळावे.

आपला
"मित्र"

---

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस.

साष्टांग नमस्कार वि. वि आपल्या या सुंदर पत्रीं आमच्या सत्पुरुषांचें चरित्र छापून प्रसिद्ध कराल अशी आशा आहे.

पातुरशेखबाबू ता. बाळापूर जिल्हे आकोले या ठिकाणीं सीदाजी माहाराज साधू होते व ते मानवी रूप असून केवळ इश्वर अवतार होते. व मूर्ती फार सुरेख असून चमत्कार ही पुष्कळ लोकांस येऊन कितीक लोकावर पूर्णकृपा ही जाली. व माहाराजांचा अवतार केवळ शंकरा प्रमाणें असून माहाराज सदोदीत नग्न दिगांबर राहत असत या माहाराजांच्या दर्शनास गांवांतील प्रत्येक स्त्रीपुरुष व मुलें जात असत परंतु कांहीं स्त्रीयांना अवलोकन करून माहाराजांचें मन डगमगलें नाहीं. व या प्रमाणें मुर्ती ईश्वरी अवतार असून नगरवासी जनास फार आनंद कारक व प्रत्यक्ष इश्वराचें दर्शन होत असे. चालत आलेला दिवस आज एकाएकी नाहीसा झाला असें पाहून गांवचे व परगांवचे लोकांस फार दुःख जाहलें. परंतु माहाराजांनीं हाकाल पर्यंत कोणास उपदेश दिला नाहीं. व क्रोधात आले म्हणजे पूर्ण कृपेचें फळ लागलीच प्राप्त होत असे. या प्रमाणें साधू माहाराजांची पूर्ण स्थिती अवलोकन करून मनांस फार अत्यानंद जाला. आजचार पाच दिवस जाले परंतु आमच्या नेत्रासमोर माहाराजांची साक्ष मुर्ती दिसत आहे. याच प्रमाणें सदोदीत माहाराजांनीं दासास असें सदर्शन दिलें तर भक्तास कधीही कमी पडणार नाहीं. माहाराजांची पहीली स्थिती मनांत आणली म्हणजे तिळतिळ काळिज तुटते कारण माहाराज बेपरवा पडलें त्यांना कोण्या गोष्टीची जरूर नव्हती म्हणून माहाराज रात्रंदिवस गावांत फिरत असा व अलीकडे भक्त मंडळीनी कांहीं माहाराजांची सेवा करण्यास आरंभ केला व त्या प्रमाणें भक्तावर पुर्ण कृपेचि वृद्धी होतगेली परंतु माहराजांची फलश्रुतीची एक निराळी तऱ्हा होती ती अशीकीं कित्येक साधू आनंदांत आले म्हणजे भक्तांचें कल्याण होत असे. परंतु यांचे कालमान निराळेंच आहे. व ही मुर्ती ज्यासी आनंदांत येऊन बोललें त्याचे कधींही कल्याण व्हावयाचें नाहीं व ज्यावर कोपायमान दृष्टी फिरली अगर कांहीं ताडन जालें. म्हणजे फार कृपा होऊन संकटांतुन मुक्त होत असें असा माहाराजाचा प्रकार चालून दिवसेंदिवस वृद्धी होत गेला व अलीकडे दर वर्षास सप्ताह होऊन अन्नदान नदिान दोनहजार पात्र होत असे. व पालखी ही निघत असे. व नीरंतर दिपदर्शन जालें म्हणजे माहाराजांच्या दर्शनाचा बेबअसे. तो आज एकदम नाहीसा झाला यावरून आमचे काय विसरलें असा रोज भास होत आहे. व माहाराजांचा दर्शनास केवळ ब्राम्हण लोकच जात असत असें नाहींतर अविंध सोडून सर्व जातीचे लोक येत होते. व येत्या कार्तीक मासी पातुरशेखबाबू येथें. कांहीं कामा संबंधी मे. हेअरसाहेब आले होतें. व त्या दिवसीं चारपांच वाजतांना कांहीं जमेदार व सभ्य मंडळीस बरोबर घेऊन गावांत आलें, व गांवसफाई पाहूं लागलें, व तीतक्यांत सायंकाळेच वेळेस स्त्रीपुरुष मुलेबाळे यांचे थवेच्या थवे चालले असें साहेबानीं पाहिल्या बरोबर मनांत चकित झालें. व पाटील कुळकर्णी यांस विचारूं लागले कीं हा प्रकार काय आहे. असें विचारल्यावर त्या मंडळीनी असें सांगितलें कीं आज हरीदीनी आहे म्हणून सिद्ध पुरुषांच्या दर्शनीस जात आहे. व गांव पाहाण्याचे. वगैरे टाकून "हमकू सिद्धपुरुष कांहा हम बतलादो" असें म्हणून त्यांच्या दर्शनास गेले. व त्या ठिकाणी जाऊन पाहतात तों भजन चाललें आहे. व कोणी शेरण्या वाटीत आहे हें पाहून साहेबांस फार आनंद जाला. व सांगितलें कीं "ऐसी सुरत अम्हने अबितलक देखी नहीं तो आज देखी तगदीर अच्छा सबनेका है" असें सांगून चालते जाले. व दुसरे दिवशी साहेबास गांवकरी लोकांनीं विचारलें कीं माहाराजाच्या समाधीस हीच जागा असावी असें सुचविले व साहेबाना मोठ्या आनंदानें तीच जागा दिल्या बद्दल लेखी हुकूम दिला. या प्रमाणें साहेबानें हीमेहेरबानी केली. व माहाराजांचा अंतकाल समीप आला तेव्हां सर्वांस असें सुचविलें कीं आज पासून दाहा दिवसानीं हे जग सोडून स्वर्गास जाणार असें सांगितलें. व लागलेच दुसरे दिवसी सप्ताहास प्रारंभ केला व तो आटोपल्या नंतर समाप्तीचे दिवशी माहाराजांची एकवेळ सरगस्त काढावी असें मंडळीनीं मनांत आणिलें. परंतु इकडे साधू माहाराजांस चमत्पतांना सुरू झाल्या असें पाहून तशीच पालखी मारवळ व नागेवर आली, ते वेळी दोनप्रहर रात्र वाजेली व माहाराजांस नमस्कार करून सर्व आपआपले. घरीं गेलें व दुसरे दिवशीं चैत्र शुद्ध १० दशमी रोज सोमवारी माध्यान काळीं माहाराजानीं प्राणोत्क्रमण केलें असें समजल्या वरून पुन्हा सर्व मंडळी जमून समाधीस प्रारंभ केला व आंत सिंव्हासन ही उत्तम प्रकारचें केलें. व माहाराजांचे सरगस्तीचे सिंव्हासन उत्तम बांधून साधूस मंडात स्नान घालून वस्त्र अलंकार उत्तम प्रकारचें सर्व नवीन आणून माहाराजांस अर्पण केलें व हार तुरे घालून मुर्ती शोभायमान दिसूं लागली इकडे सर्व गावांत लोकांनीं आपआपले हद्दींत सर्वांनी सडासिंपून त्यावर रांगोळ्या काढून उदबत्त्या ही लावून दिल्या. व ज्याचे दारावरून स्वारी चालली त्यानी आरती ओवाळून साखर फुटाणे पेडे बरफी फलें गुलाल यांचा वर्षाव केला व कोठे कोठे हवया बारूद ही उडण्यांस आरंभ केला. व माहाराजांच्या बरोबर कमीत कमी ९००० हजार स्त्रीपुरूषांचा समावेश होता. या प्रमाणें स्वारीचा थाट पाहून सर्वांस आनंद जाला व माहाराजांच्या तसबीरा ही काढविल्या या प्रमाणें सर्व यथासांग करून साधूस समाधी दिली व सर्व लोक आपआपले घरी गेले व सर्वेश बांधवांस विनंती करण्यात येते कीं हे साधू केवळ आमचेंच हित करतात असें नाहीं तर जे कोणी संकट समयीं सिदाजी माहाराज यांचे स्मरण ध्यान करील तो संकटा पासून मुक्त होईल यात संशय नाहीं. कारण ज्या प्रमाणें अलीकडे तुकाराम माहाराज येहळेगांवकर, व रावसाहेब सेवाळकर व उमरखेडचे गोचर स्वामी व अलीकडे यशवंतमाहाराज हे जे सर्व सिद्ध पुरुष होऊन गेले. तशीच ही मुर्ती होती. आणखी या ठिकाणीं थोडे दिवस पुर्वी दोन साधु होऊन गेले एक शेखबाबू व एक नाना साधु हे वाचकास ऐकून व वाचून माहीत आहेच विशेष कळविण्यास आनंद हाच वाटतो कीं पुर्वी ज्या प्रमाणें प्रत्यक्ष अवतारी अनुसूयेचे सत्व हरण्याचे निमीतानें तिचें पोटीं जन्म घेतले त्याच प्रमाणें या पातुर रुपी अनुसूयेचे उदरी तीन मुर्ती उत्पन्न झाल्या हे त्या भुमीचें नशीब समजणें भाग आहे. ही थोड्या कविता अल्पमतीनें केल्या आहत यांतील गुणदोष मनांत न आणतां वाचक चांगले ग्राह्य करतील अशी आशा आहे कळावें लोभ असावा हे विनंती. ता०५ एप्रील सन १८९० इसवी

पद

(चाल लावणी)

॥प्रभातकाळीं विणा करतळि घेऊन या सिदाजी॥ नृत्य करिहासे नगजापती ॥ धृ ॥
सुरजन किन्नर गगनि येउनीं तटस्थत पाहती॥ १ ॥ डुमडुम डुमडुम डमरु वाजती भैरव भिमाकृती॥ नृत्य करिहासे नगजा

पती॥ नंदी नंदीत मृदंग भृंगीटाळ जलनधरि करी॥ मुखें धमिशंकुकर्ण सत्वरी॥ सुरलोकांतरी नाना वाद्यें अनुपमती वाजती॥ नृत्य करिहासे नगजापति ॥ २॥ संगी घेउनि सकळ मंडळी सिद्ध किर्तनी पातला नाचे संतोषुनी॥ माधवदास नित्य हृदब्जीं ध्यातो सुमुखाप्रती॥ नृत्य करिहासे नगजापती॥३॥

[ शार्दुल विक्रीडीत. )

सतरासे अकरा विरोधी समिजा चैत्रांत शुक्लांतरी ॥ आरंभी नभी शीघ्र पूर्ण करित्या जो चंद्रमा मंदिरी ॥ तो मी हृत्त जनू चरित्र रचना दावीन साधू जना ॥ त्याना याचिन सेवका वर दया ठेवा करी वंदना ॥ १ ॥ ॥

आपला

एक भक्त

वऱ्हाडसमाचार.

मित्ती चैत्र वद्य १० शके १८१२

## मि. जोशी व मि. मुधोळकर यांस अकोलेकर मंडळी कडून पानसुपारी.

मी. जोशी व मि. मुधोळकर हे राष्ट्रीय सभेच्या कामा करितां तारिख २० एप्रील इ. रोजीं विलायतेस जाण्या करितां निघणार आहेत त्यांचा आदर करून त्यांच्या सन्मानार्थ सर्व लोकांच्या वतीनें पानसुपारी करावी असा ता. ३ एप्रील रोजी लायब्ररींत भरलेल्या जाहिर सभेंत ठराव झाल्यावरून हा समारंभ काल रोजीं सकाळीं आकोला नेटीव जनरल लायब्ररींत मोठ्या थाटामाटानें करण्यांत आला. समारंभास येण्या करितां जी विनंती पत्रें वाटलीं त्यावर रावसाहेब देवराव विनायक मिस्तर सोराबजी मंचरजी, व मिस्टर अहमदखान जुमानी ह्यांच्या सह्या होत्या. या सह्यां वरून हिंदुपार्शी व मुसलमान ह्या तिघांची कशी जूट दिसूनयेत आहे हें सांगण्याची जरूरी नाहीं. केळीचे खांब असे लाविले होते, फडकणारीं निशाणें आमक्या ठिकाणीं बांधली होती किंवा खुर्च्यांच्या रांगा अमुक दिशेस तोंडें करून मांडल्या होत्या वगैरे व्यवस्थेचें वर्णन करण्याची जरूरी दिसत नाहीं. कारण ह्या व्यवस्थे संबंधींचे टाप टीपीत, अशा प्रकारची टापटिप ठेवण्याचे अलिकडेस बरेंच प्रसंग आल्या मुळें आपल्या येथील मंडळी इतकी तरबेद झाली आहे कीं ज्या ज्या प्रसंगास जशी जशी व्यवस्था पाहिजे तशी तशी व्यवस्था फार श्रम न करितां थोड्या खर्चांत व काळांत सहज करूं शकतें इतकेंच नव्हेतर मागील समारंभा पेक्षां पुढल्या समारंभांत एखादी नवी टूम काढल्या शिवाय ह्या मंडळीस चैन पडत नाहीं. कालच्या समारभांत ज्या तसबीरा लाविल्या होत्या त्या ह्या नव्या टुमीचाच भाग होय. कांहीं तसबीरा देवादिकांच्या होत्या कांहीं श्रीशिवाजी छत्रपती, श्रीमंत सवाई माधवराव पेशवे, नाना फडणवीस, व झांशीच्या प्रसिद्ध लक्ष्मीबाई अशा ऐतीहासीक गोष्टींचे स्मरण देणाऱ्या पुरुषांच्या अगर स्त्रियांच्या होत्या. ज्या ठिकाणीं "राज्ञी चिरायु होवे" अशी सोनेरी अक्षरें इंग्रजीत काढून त्यांचा तक्ता लाविला होता तेथें एकाबाजूस राणी साहेबांच्या मुलीची व दुसऱ्या बाजूस त्यांच्या पतीची तसबीर होती. गांवांतील शेट सावकार, उद्यमी व्यापारी वकील व इतर शिष्ट गृहस्थांचा जमाव इतका मोठा जमला होता कीं सर्वांला सोईवार बसण्यास अडचण झाली. पंख्याची व्यवस्था नसती तर फार गुदमरा झाला असता. मि. जोशी व मि. मुधोळकर येतांच कांहीं मुलांनीं हार्मोनियमच्या सुरावर प्रसंगास उचित अशी सुरस पद्यें ह्मटली. नंतर अध्यक्षस्थानीं मि. जुमानी ह्यांची योजना झाल्यावर मि. भागवत मि. रानडेकर मि. देसाई वगैरे मंडळीची भाषणें झाली. मि. भागवत ह्यांनीं सुरवात करण्या पुर्वीं दोन गोष्टी संबंधानें फार दिलगिरी दाखविली एक गोष्ट ही कीं प्रत्येक समारभांत पुढारी असणारे रावसाहेब देवराव विनायक यांनां आपल्या पत्नीच्या अकाली मृत्यु मुळें समारंभास येतां आलें नाहीं. मि. ह्यूम साहेबांवर थोडे दिवसां पूर्वीं जो प्रसंग आला तोच प्रसंग परमेश्वराने आमच्या रावसाहेबांवर हो आणिला ह्यावरून त्याचें मनांत आमच्या पुढारी मंडळीस पक्की कसोटीस लावून पहावयाचें आहे असें दिसतें. दिलगिरीची दुसरी गोष्ट ही कीं कांहीं कारणामुळें ज्या एका गृहस्थास आजच्या प्रसंगीं भाषण करणे अवश्य होतें तें त्यास करण्यास सवड नसल्या मुळें करतां आलें नाहीं. राष्ट्रीय सभेच्या तर्फे आमचे जोशी व मुधोळकर हे विलायतेस जाऊन लार्ड क्रास साहेबांनीं आणलेल्या बिलांत जी उणीव आहे ती काढून टाकण्या करितां प्रयत्न करणार हा एक फायदातर खराच परंतु ह्यांच्या जाण्या मुळें दुसरा एक फायदा आहे तो असा कीं तुम्हीं विद्वान् कुच कामाचे तुमचे हातून कांहीं एक होत नाहीं असें म्हणणाऱ्यानीं वरील प्रश्न केला असतां खालीं पहावें लागत असें तें आतां तितकें पहावें लागणार नाहीं. तिसरा एक फायदा असा होण्या सारखा आहे कीं हे तिकडून आल्यावर आपला अनुभव लोकांना देतील व त्या मुळें ह्याचें अनुकरण इतर करतील असा संभव आहे. मि. रानडेकर ह्यांनीं जोशी व मुधोळकर ह्यांच्या संबंधानें स्तुतीपर भाषणांत एक गोष्ट चांगली स्पष्ट करून दाखविली व ती सर्वांनीं ध्यानांत ठेवली पाहिजे. ती ही कीं आपण सर्व आपल्या आर्य मातेचे ऋणी आहोत व ज्याप्रमाणें जोशी व मुधोळकर आपल्या विद्वत्तेप्रमाणें व ऐपतीप्रमाणें ऋणमुक्त होण्याची खटपट करीत आहेत त्याचप्रमाणें प्रत्येक व्यक्तीनें आपआपल्या शक्ती प्रमाणें करणें जरूर आहे. मि. देसाई ह्यांनीं साधारणपणें पोटाकरतां घर सोडून जातांना आप्त इष्टमित्र वगैरे मंडळीचा वियोग होतो म्हणून मनाची स्थिती काय होतें ह्याचें वर्णन करतांना एकुलते चिरंजीव मोरोपंत व खटलेवाइकापैकीं रंगनाथपंत ह्याचा व ह्याच्या आप्तवर्गाच्या मनाची स्थिति काय होईल ह्याचे हुबेहुब चित्र मंडळीच्या डोळ्या समोर उभें केलें. ह्यांच्या जाण्यापासून सामाजिक व्यवस्थेंत कसा फायदा होईल हे मि. देशपांडे ह्यांनीं थोडक्यांत सांगितलें. प्रत्येक वक्त्यानें ह्यांचा प्रवास ह्यांना सुखकर होवो व हे सुरक्षित आपलीं कामें बजावून परत येवोत असें ईश्वरापाशीं मागणें मागून आपलें भाषण संपविलें.

नंतर जोशी व मुधोळकर ह्यांनीं आपला एवढा मोठा मंडळीनें गौरव केला ह्याबद्दल मंडळींचे आभार मानून आह्मी हातीं घेतलेलें काम आमचे कर्तव्यकर्म आहे असें समजून बजावण्याचा प्रयत्न करूं यश येवो अगर न येवो व होतां होईल तितका प्रवासांत आह्मी आमचा धर्म पाळू असें बोलून दाखविलें. अध्यक्षाचें भाषण झाल्यावर मुलांनीं पुन्हा सुस्वर गायन केले व शेवटीं शेवटीं नॅशनल आनथम ह्मटलें व त्यावेळी सर्व मंडळी उभी राहिली होती. सरतेशेवटीं पानसुपारी अत्तर गुलाब होऊन सभा विसर्जन झाली.

The Berar Samachar

MONDAY APRIL 14, 1890.

## THE DECCAN COLLEGE.

The students of the above named institution have peticioned the governor of Bombay for a reduction in the rate of fees. The reasons stated by them in support of their petition appear to us to be just and sound. The number of students this year has fallen very much below the average. There are only 103 students in all classes in the College. This is really pitiable. If the institution is to be maintained at all, the rate of fees must never be prohibitive. The class of students that attend the College consists mostly the middle class people. These people are not able to give such high fees as Rs. 120 per year in addition to the expenses of board lodging books and other minor sundries. There are four divisions of the Presidency of Bombay. They are Maharastra, Gujrath Canara, and Sind. There ought to be as many as four Colleges at least teaching the full course in Arts. While there are only 3 Colleges in the moffusil. Two of them viz one at Ahmedabad and the other in sind taught until very recently only as far P. E. There is only one College for the Central and Southern divisions. These Provinces are pretty large and the education there has made good progress: and as the result of this there are many people who wish to continue their studies provided the studies are made within the reach of ordinary people. Rich folks such as the Jahagirdars and persons having as large incomes do not care to educate their sons beyond the three Rs. But besides the rich there is a very large community of middle men whose avocations do not give them enough and to spare but who at the same time cannot do without giving their sons education of one profession or another. Some provision is necessary for the education of this class and it is best done by keeping such rates of fees in institutions as the Deccan College, as will place them within the reach of all. Rs. 120 a year is very heavy. Rs. 60 is just enough.

We are interested in this institution as young men from this province mostly attend it. The people who educate their sons in the local High Schools and are desirous of sending them to receive collegiate education are mostly of the middle class. These people certainly cannot afford to spend as much as Rs. 40 a month for the education of one of their sons. The income of these people various from Rs 30 to Rs 100 or 150 at the most. Can they educate their sons if fees are made prohibitive. If they dont educate their sons they will be reduced to a condition of misery and the result of misery would be utter destruction of the middle class community. Better it is that people should be educated free of cost than that they should be reduced to misery and consequent destruction.

## THE UNCOVENANTED SERVICE.

The most important question that has been before the public of late is the question of the uncovenanted service. The British Parliament has appointed a Committee to enquire into the grievances of the service. Witnesses who will go to England to give evidence before the Committee of inquiry will be paid their expenses from the Indian Treasury. We have no objection to an inquiry being made. But we certainly do not like that the interests of the Indian Ryot should not be consulted before granting any concession to the members of the uncovenated service. It is so very easy to say that the members of the service should be satisfied if that satisfaction can be obtained by an annual grant of 3 laks of rupees. No good has resulted from the large employment of Europeans in India except that it has deprived many Indians from earning their bread by honourable means. The employment of Europeans has deprived natives of India already in the service from rising to the top of the same, Are not natives fit to fill posts of Educational Inspectors and still there are many Europeans in India who are made Educational Inspectors. Look in to any department of service you like and there are hundreds of European officers whose posts would have been satisfactorily filled up by natives of India. The sons of the soil have been turned beggars and foreigners are brought here to feed upon them. Except for purposes of seeming British administration and preserving its character as such, employment of Europeans in any scale howsoever small is highly detrimental to the interests of the natives. Whatever may have been the engagements with the present members of the uncovenanted service, let those engagements be adhered to strictly and if there exists any grievance in this respect let it be redressed by all means. But we are not prepared to have in future any permanent establishment such as the uncovenanted service if the interests of this service are such as conflict with those of the sons of the soil. The recommendations of the Civil service commission in this matter must not be passed over in silence and no distinction whatever, based on race differences should be any longer tolerated. It is the bounden duty of all governments to preserve itself from all dangers and any measures affecting this security is welcome to us; for it is our interests that government should be secure but besides and beyond this, measures which even indirectly exclude natives from having a share in their own affairs, does not become the civilized Rulers of England and India.

No. 524- G. The following promotions and appointments are made in the Berar Commission:—

Ardesir Dinshaji Chenoy, Extra Assistant Commissioner of the 4th class, to be an Extra Assistant Commissioner of the 3rd class.

Mr. S. H. King, Extra Assistant Commissioner of the 3rd class, to be an Extra Assistant Commissioner of the 4th class, but to remain seconded during his employment as Treasury Officer at Quetta.

Gunpat Babji Sahasrabudhe, Extra Assistant Commissioner of the 5th class, to be an Extra Assistant Commissioner of the 4th class, but to remain seconded employed in the Resident's Offices.

Ambadas Santu, Extra Assistant Commissioner of the 5th class, to be an Extra Assistant Commissioner of the 4th class.

Govind Raz Mudeliar, Tehsildars of the 1st grade, to be an Extra Assistant Commissioner of the 5th class, with effect from the 21st December, 1889.

The substantive promotions of Ganpat Babji Sahasrabudhe and Ambadas Santu and the substantive appointment of Govind Raz Mudeliar, are provisional, under the operation Article 109 of the Civil Service Regulations.

No. 526 G. Captain D. W. Purdon, Madras Staff Corps, Wing Officer, 6th Infantry, Hyderabad Contingent is appointed to be an Assistant Commissioner of the 3rd class in the Hyderabad Assigned Districts, with effect from the date of assuming charge, *vice* Captain C. J. B. H. Dressner, resigned.

No. 537. G. Major A. M. Muir, Bengal Staff Corps, officiating Political Assistant of the 1st class, and Second Assistant to the Resident at Hyderabad, and Assistant Secretary for Berar, is granted privilege leave for three months for with effect from the 15th April 1890, or the subsequent date on which he may avail himself of the leave.

G. I.

## वऱ्हाड

रावसाहेब देवराव विनायक वकील यांच्या कुटुंबास ता. १० रोजी संध्याकाळी देवाज्ञा झाली. प्रथम थोडासा ताप आला व त्या तापातच प्रसुती झाल्यामुळे वायूचा विकार होऊन रावसाहेबावर हा असा कहर गुदरला. या शिवाय डिपुटी कमिशनरच्या आफिसातील एक बजरंग नावाचा कारकुन व शेगाव येथील स्पे. मा. च्या कारकुनाची बायको हेही ह्या तापानें (इन्फुएन्झानें) या आठवड्यांत मरण पावली पूर्वी ह्या तापाची माणसें दगावत नव्हती. परंतु हल्लीं दगावत असल्यामुळें लोक बरेंच अस्वस्थ होत चाललें आहेत.

---

रा. रा. श्रीकृष्ण नरहर यांनीं पेनशन घेतल्यामुळें रा. रा. देवराव जयकृष्ण यास तेथें त्यास बदलले. तरी सुटींत दीड महिना त्यांनीं अकोल्यास काम करावें असें ठरलें आहे.

---

रा. रा. गोपाळराव भिडे यांच्या मरणामुळें क्लार्क आफ दी कोर्ट व इतर क्लार्क लोकांत खालीं लिहिल्याप्रमाणें फेरफार झाल्याचें कळतें. मि. रामचंद्र नारायण देशपांडे यांस १५० वर आकोल्यास. मि. त्रिंबकराव परांजपे यास पूर्वीचेच पगारावर उमरावतीस. मि. हरीहर काशीनाथ यांस १२० वर बुलडाण्यास. मि. विठलराव कमिशनरच्या आफिसांतील ८० चे क्लार्क यांस १०० रुपयावर स्मॉ. का. को क्लार्क कायम करुन इलिचपुरास १२० रुपयावर अक्टींग नेमले. चांदेकर यांस ८० रुपयावर सैफुद्दीन यास ७० रा वर डी. क्ला. कायम करुन १०० रा वर आ. स्मॉ. क्लार्क उमरावतीस नेमले. मि. थोरीस यास ज्युडीशियल कमिशनर आफिसांत ७५ वर कायम करून यवतमाळास अ. क्लार्क आफ कोर्ट कृष्णाजी महादेव परत येईपर्यंत नेमले. मारुती हरी यास ७० रावर अ. क्लार्क नेमले. दामोदर नानाजी यांस १२५ रुपयावर स्मा. का. को. क्लार्क कायम केले.

---

मि. यासीनखान यानीं मागील आठवड्यांत येथील स्पे. अ. क. च्या जागेचा चार्ज घेतला.

---

काल रोजीं रा. रा. मोरो विश्वनाथ जोशी व रंगनाथ नरसिंह मुधोळकर यांस लायब्ररींत सकाळीं ७ वाजतां मोठी थाटाची सार्वजनिक पानसुपारी झाली व संध्याकाळीं क्लबमध्यें भोजन समारंभ झाला उमरावतीहून आणखी ही इतर मंडळी निमंत्रणावरून समारंभास आली होती.

---

कर्नल इ. गंथार्प उमरावती जिल्ह्याचे ऑफिशिएटींग पोलीस सुपरिन्टेंडेंन्ट २ क्लास यांना १ ल्या एप्रिल १८९० पासून अगर त्याना वाटेल त्या दिवसा पासून १ महिना १५ दिवसाची हक्काची रजा दिली आहे.

---

मि. एफ. टी. कुड आफिशिएटींग असिस्टंन्ट पोलीस सुपरिनटेंडेन्ट 2nd ग्रेट यास उमरावती जिल्ह्याचे क० गंथार्प यांच्या रजेंत पोलीस सुपरिनेंटेडन्ट नेमिले

---

क्रिमिनल प्रोसीजर कोड आक्ट १० १८८२ कलम १२ प्रमाणे रेसिडेन्ट साहेबांनीं क्या. डि. डब्यु. पर्डन अ. क. यांस त्यांनीं अर्ज केल्या वरून हैद्राबाद असाइन्ड डि. मध्यें थर्डक्लास म्याजिस्ट्रेट नेमले.

---

मि. आर. ए. सिंपसन यास हैद्राबाद असाइन्ड डिस्ट्रिक्ट मध्यें थर्डक्लास असिस्टंट कमिशनर नेमलें असून सध्यां त्यांना उमरावती जिल्ह्यांत काम करण्यास नेमलें आहे.

---

मि. कुड यांचे अ. पो. सु. जागेवर मि. एफ. एल. क्राफर्ड इन्स्पेक्टर आफ पोलीस यांना नेमिलें आहे.

---

क्रिमिनल प्रोसिजर कोड आक्ट नंबर १२ १८८२चा कलम १२ यावरून मि. सिंपसन यांनीं अ. क. चे जागेकरतां अर्ज केल्यावरून रेसिडेंट साहेबानीं त्यांना हैद्राबाद असाइन्ड डिस्ट्रीक्टमध्यें थर्ड क्लास माजिस्ट्रेट नेमले.

---

हैदराबाद असाइन्ड डिस्ट्रीक्टचे कोर्टाचे कायद्यांतील कलम ८ यावरून मि. सिंपसन यांचे उमरावती जिल्ह्यांतील असिस्टंट क. यांचें कोर्ट थर्ड क्लास अ. क. चे कोर्ट होईल असें रेसिडेंट साहेब प्रसिद्ध करतात.

---

होमडिपार्टमेंट नोटिफिकेशन नं. १२५ता. २४ फेब्रुवारी १८९० वरून आपॉथेकरी मि. डब्ल्यू. जे. मॉंटगोमरी जे बुलढाणें जि. चे सिनीयर आपॉथेकरी मि. कालेवानी यांचे मरणापासून सिविल सर्जन नेमले गेलें होते त्यानांच जे दिवसापासून ते सि. स. होतील त्या दिवसा पासून बुलडाण्याचें जेल सुपरिन्टेंडेंट नेमलें.

---

होम डिपार्टमेन्ट तारीख २६ डि. १८८९ नोटीफीकेशन न. ८०३ वरुन आपॉथेकरी डब्ल्यु मॉंट गोमरी यांस बुलडाण्या जिल्ह्याचे सि. स. व त्याचे जिल्ह्याचे जेल सु. ता. ११ डिसेंबर १८८९ पासून नेमलें असे.

---

मि. एच् गॉडवीन आफिशिएटींग असि. क. यांची बदली उमरावतीहून एलिचपूर येथें झाली.

---

हैद्राबाद असाइन्ड डिस्ट्रिक्ट कोर्ट लॉ १८८९ कलम ८ प्रमाणें रेसिडेंट साहेब असें प्रसिद्ध करीतात कीं क्यापटन डि. डब्ल्यू पर्डन यणी जि. अ. क. यांचें कोर्ट थर्डक्लास अ. क. चें कोर्ट होईल.

---

मि. अर्देसर दिनशाजी चेनाय ए. अ क. फिफ्थ क्लास यांस थर्ड क्लास ए. अ. क नमिलें.

---

मि. ए. एच. किंग ए. अ. क. फिफ्थ क्लास यांस फोर्थ क्लास, ए. अ. क नेमिले परंतु त्यांनीं ट्रेझरी आफिसरचें काम क्वेटास करावें.

---

रा. रा. गणपत बाबाजी सहस्त्रबुद्धे ए. अ. क. फिफ्थ क्लास फोर्थ क्लास ए. अ. क. नेमिले परंतु त्यांनीं रेसिडेंटच्या कचेरींत काम करावें.

---

रा. रा. अंबादास संतो ए. अ. क. फिफ्थ क्लास यांस फोर्थ क्लास ए. अ. क. नेमिले

---

रा. रा. गोविंदराज मुदालियार फर्स्टग्रेड तहासिलदार यांस ता. २१ दिसेंबर सन १८८९ इ. पासून ए. अ. क. नेमिलें.

---

येथील म्युनिसिपालिटीच्या तिसऱ्या वार्डच्या एका मेंबराची निवडणूक परवां रोजीं झाली. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी एम्. ए. हे निवडले गेले.

---

यंदाची वकिलीची परीक्षा तारीख ८ सपटेंबर रोजीं उमरावतीस सुरू होईल उमेदवारांनीं अर्ज तारीख १ जूनच्या पुर्वीं पाठविले पाहिजेत.

---

नोटीस.

हयातखा वल्द तयरखा बेद वस्ती अकोले यास खाली सही करणार याजकडून कळविण्यांत येते कीं तुमची ता० ८-४-९० ची नोटीस पावली आम्ही जें कृत्य केलें ते आपले हक्कानें आणि अम्हास ते कायदेशीर रीतीनें करतां येते यास तुम्हाकडून अडथळा येऊं शकत नाहीं तुम्ही विनाकारण दावा वगैरे केल्यास आमचे खर्चांबद्दल तुम्हास जवाबदार व्हावे लागेल. कळावें ता० १३-४-९०

(सही)

उमरखा दाउतखा सवदागर वस्ती ताजनापेठ अकोले दस्तुरखुद

---

नोटीस.

नोटीस बेशमी रतनसा सोनासा रंगारी व नारायण शामराव वस्ती पातुर्डी ता० जळगांव यांस नोटीस देणार कुकाजी वल्द भिकाजी झाडोकार वस्ती पातुर्डी कळवितो कीं आमचा पुतण्या नामे राघो वल्द भगवान झाडेकार वस्ती पातुर्डी यानें तुह्मास खुद्द पातुर्डे येथील आह्मास आमचे व त्याचे मालकीचे राहते घर व फक्त आमचे मालकीचा कोठा एकूण असें तुह्मास रुपये ३४० यांस गहाण लावून दिले आहे असें तुमचे गाहाणखताची आह्मी राजिस्टार पासून नक्कल घेतली त्यावरून समजतें. सदर्हु गहाणखत होण्यापूर्वीं तुह्मां उभयतांस मी तोंडीं नोटिशीनें कळविलें होतें कीं तुह्मी जी मिळकत गाहाण लिहून घेणार त्यांत राहते घरांत माझा वाडिलार्जीत निम्मे हिसा व गाहाणखतांत पारिग्राफ तीन यांत नमूद केलेला कोठा माझा स्वतःचे मालकीचा आहे परंतु ते बिलकुल न जुमानतां तुह्मी उभयतांना गाहाणाचा दस्तायवज ज्या जिनगीबद्दल राघोबास कोणत्याही प्रकारे हक्क नव्हता अशी मिळकत तुह्मी उभयतांनीं गहाण ठेवली करितां आतां या लेखी नोटिशीनें तुह्मांस कळवितो कीं आजपासून १५ दिवसाचे आंत तुमचा झालेला दस्तायवज रद्द करून फक्त राघो यांचे मालकीची जी जिनगी असेल त्याबद्दल आपले रुपया ऐवजीं तारण घ्यावें. या प्रमाणें न करील तर न्यायाच्या कोर्टामार्फत अह्मास योग्य तजवीज करणें भाग पडेल व या नोटिशीचे खर्चासह सर्व होणारा खर्च तुह्मांस द्यावा लागेल कळावें ता० ११ एप्रील सन १८९० इ०

(सही)

निशाणी कुकाजी वल्द भिकाजी झाडोकार.

---

नोटीस.

बापुजी वल्द मानसिंग मोडक रहाणार मोंड तालुके अकोट यांस नोटीस देणार अजान मर्द बापुजी मोडक नोटिशीनें असें कळवितें की तुझ्याशी माझें लग्न होऊं सुमारें १८ वर्षे होत आली. पहिल्यानें जाणती होईतो पर्यंत कसेंतरी सासर माहेर चाललें होते अलीकडे सहावर्षें झालीं तूं माझी कांहींच वास्तपुस करीत नाहींस या सहा वर्षांत मी तुझे नावावर कर्ज रु. ३०० काढून निर्वाह केला. आतां मला कोणी कर्ज देत नाहीं. व तूं घेऊन ही जात नाहींस. याज करितां तुला या नोटिशीनें असें कळवितें कीं नोटीस पावल्या पासून २० दिवसाचे आत सद्हुं रु. ३०० देऊन मजला व ४ जातभाई पंच यांची खात्री करून देऊन (चांगले रीतीनें वागवून मजला घेऊन घर प्रापंच करशील) वगैरे. असें न केलेंतर मी दुसरा घरठाव करीन व हीच तुझी सोडचिठी समजून सदर्हू खावटीचे रुपया बद्दल कोर्टांत काम चालवून अखेर निकाल होई पर्यंत या नोटिशीचे खर्चा सुद्धां जें नुकसान होईल ते तुजकडून भरून घेतले जाईल. व सदर्हू तूं मुदतींत मला न नेशील तर मजवर तुझा कोणता ही प्रकार हक्क रहाणार नाहीं. म्हणून दिली नोटीस सही ता० ११-४-९० इ०

(सही)

सहाची बांगडी अजानी मर्द बापुजी मोडक हस्ते अक्षर.

---

## वर्तमानसार.

मदुरा येथें पोलिस शिपायानीवर ३००० रुपयांची सरकारी रकम कोठेशी पाठवीत होते, परंतु सदर रकम त्या कान्स्टेबलांनीं चोरून जमिनींत पुरून ठेवली. त्यांतील एक शिपाई आतां कबूल झाला आहे त्यानें पुरून ठेवलेली जागा दाखवून तेथून सर्व रकम काढून दिली. हा खटला सेशनमध्यें नोंदला आहे.

उदेपूरच्या राण्यास १८२०००, जोधपूरच्या राण्यास ९८०००, जयपूरच्या राण्यास ४०००००, इतकी खंडणी हिंदुस्थान सरकारास द्यावी लागते. त्याचप्रमाणें कोट संस्थानास १८१०००, बुंदी संस्थानास १२००००, झालवाडा संस्थानास ८०००० रतलाम संस्थानास ६६०००, निजाम संस्थानास १८००००, मुंडी संस्थानास १०,०००, कपुरथला संस्थानास १३१०००, त्रावणकोर संस्थानास ७८३०००, हैसूर संस्थानास २४५००००, कोचीन संस्थानास ३९८०००, काठियावाड संस्थानास ५४५,०००, बडोदा संस्थानास ३९८००० इतकी खंडणी सरकारास द्यावी लागते.

घड्याळास एकदा किल्ली दिली ह्मणजे तें ४८० दिवसपर्यंत चालावें असें एक घड्याळ सुइसन ( कलकत्ता ) येथील एका मनुष्यानें शोधून काढलें आहे.

हरदा येथील गोरक्षणी सभेनें गाईंच्या निर्वाहाकरितां ७०० रु. त एक गांव विकत घेतला आहे. या योगानें आतां गाईंच्या दाणाचाऱ्यांची चांगली सोय होईल.

अट्टल चोर— डिकसाळ व पोमलवाडो या दोन स्टेशनामध्यें आगगाडी भरधाव चालली असतां फर्स्ट क्लासांतील एका हफिसराच्य' कोटांतील सोन्याचें घड्याळ चोरून एक चोर चालत्या गाडीतून बाहेर उडी घालून फरारी झाला ! केवढी छाती ही.

उदारबाई—कलकत्त्यांत गेल्या आठवड्यांत एक बाई आली होती ती रस्त्यांतून लोकांस चवल्या पावल्या वाटीत जात असे तिनें एकाला रस्त्यांत सोन्याचें घड्याळही दिलें. ही बाई कोठून आली वगैरे कोणासच कांहीं कळेना, ह्मणून तिजबद्दल लोकांस संशय आला. इतक्यांतच ती कलकत्त्यांतून अदृश्य ही झाली असें इं. मि. पत्रांत लिहिलें आहे.

निजाम सरकारच्या टांकसाळेंत तांब्याचें नाणें बाजवीपेक्षां जास्त पडलें गेल्यामुळें निजामसाहेबांनीं असा ठराव केला आहे कीं, ते नाणें पाडण्याचें आतां बंद करून त्याबद्दल आठ, चार आणि दोन आणे किंमतीचे रुप्याचे नाणें पाडावें आणि पन्नास रुपयेपर्यंत रुप्याचे आण्याचे नाणें जो कोणी खरेदी करील त्यास दोन आणे बटावाबद्दल द्यावे.

क० त०

हिंदुस्थानांत एकंदर जिल्हे दोनशे चोवीस, खेडीं चारलक्ष चत्र्याण्णव हजार एकंदर संस्थानिक लहान मोठे मिळून चारशें पन्नास. हिंदु प्रजा चौदा कोटी. चार कोट मुसलमान ख्रिस्ती दहा लक्ष.

साडे तीनशें कोट रुपयांच्या जमीन बागी व कांहींसा व्यापार यावर सरकार सत्तर कोट रुपये मिळविते. ह्मणजे सरासरींत शेंकडा वीस सरकार देणें पडलें.

एकंदर नांदती घरें या देशांत सदतीस कोट सव्वा सहा कोट पुरुष आहेत. त्यांत पावणे चार कोटी शेतकरी ऐंशी लक्ष मजूर पसतीस लाख व्यापारी आहेत. सरकारी नोकरी काय ती बारा लाख मंडळीलाच आहे अडीच लाख सराफी करणार साडे दहा लाख भिक्षेकरी आहेत.

हिंदुस्थानांत जमीन बागीचें उत्पन्न साडे तीनशें कोटी दरसाल होतें, म्हणजे यांत झाडझुडपें व शेतमळें मुद्दां आले. परदेशी भांडवल लार्ड डफरिन यांच्या म्हणण्याप्रमाणें २२० कोट आमच्या देशांत मुरलें आहे. मि. म्याक्लीन म्हणतात अडीचशें कोट तर रेलवेंत मुरलें गेलें आहे. पण हे सार एका वर्गातल्या उत्पन्नातून राहून मिटेल पण ते केव्हां?

हुंडीवाल्याचें पोटावर पाय—गतवर्षी १३ कोट रुपये मनीआर्डीनें सरकार मार्फत रवाना झाले. हुंडीवाल्यांचें केवढें नुकसान आहे.

पोष्टा कडील ब्यांक गत सालच्या हिशेबांत पोस्टल ब्यांकेनें पैसे ठेवणारे लोकांस वीस लाख रुपये व्याजा पित्यर्थ दिले व्यापाराचे केवढे नुकसान हें!

हायकोर्टाचा ठराव— हायकोर्टामध्यें जे खटले चालतात त्यांतल्या पुराव्याचें भाषांतर करण्याबद्दल एक रुपया फी घेण्याविषयीं मुंबई हायकोर्टानें ठराव केल्याचे समजतें.

न्या० सिं०

क्राफर्ड कमिशनांतील साक्षिदार मामलेदारांस दिलेलें वचन मोडणें वईट आहे अशा विषयीं स्टेटसेक्रेटरीकडे या इलाख्यांतील कांहीं सनदी साहेबांनीं तक्रार केली व त्यांस दिलेलीं वचनें पाळीत नसाल तर आम्हीही चाकरीचे राजीनामे देण्यास तयार नाहीं असें स्टेट सेक्रेटरीस कळविलें असें मागें प्रसिद्ध झालें असून त्यांचीं नावें आतां बाहेर आली आहेत. ते मेसर्स मूर. प्रार्पट, ओमाने व केशर हे आहेत. पैकीं मि. मुर हे त्यावेळी कमिशनर असून हल्लीं अकेंटग कौंसलदार आहेत, मि. प्रापर्ट त्यावेळीं कमिशनर होते मि. ओमानें प्रसिद्ध असून मि. केसर हे कलेक्टर आहेत. असल्या विश्वसघातक वर्तनानें आमच्या हाताखालील लोकांचा आमच्यावर विश्वास रहाणार नाहीं व त्यामुळें कामास मोठी हरकत होईल असें त्यांचें म्हणणें आहे, इतकेंच नव्हे तर या पुढें एखाद्या खात्यांत असल्या प्रकारचा नीच व्यापार सुरू झाल्यास तो बाहेर येण्यास कांहीं साधनच नाहींसें होईल. तक्रार करणाराची ही दोन्ही कारणें अगदीं खरी आहेत. हे कोणास ही कबूल करावें लागेल व त्याकरतांच या विश्वासघातानें हिंदुस्थानांतल्या आपल्या बड्या कामदारास लाच खाण्याची स्टेट सेक्रेटरीनीं आतां सनद दिली आहे असें आह्मी त्यावेळीं म्हटलें होतें स्टेट सेक्रेटरी अजून तरी त्याचा विचार करतील तर चांगलें आहे.

कितान दिल्याचा चांद आजपर्यंत सोन्याचा देण्यांत येत असे त्याच्याबदला यापुढें चांदीचा चांद करून त्यावर मुलामा करून तो देण्याचें ठरलें आहे असें सांगतात. असें करण्याचें कारण असें सांगण्यांत येतें कीं पूर्वीं जे सोन्याचे चांद देण्यांत येत होते ते, चांद वापरणारा मेल्यावर परत येत असत, पण अलीकडे तो प्रकार बंद होऊन चांद वापरणाराचे वंशज चांद वापरणारा मेल्यावर परत न करतां त्याचे टके करूं लागले व त्यामुळें खर्च फार होऊं लागला. कारण सयुक्तिक खरें! पदरास खार नको हा आपला मुद्दा.

मुनिसिपालिटीनें आक्ट्राई कर बसविला ह्मणून रत्नागिरीच्या व्यापाऱ्यांनी आपली दुकानें बंद केली आहेत.

एखादें पत्र किंवा पारसल १००० रुपयां पर्यंतचेंच घेतलें जाईल असा पोष्ट खात्यानें नियम केला आहे, अर्थात हे पत्र परदेशीं जाणार असलेंच पाहिजे.

रशिया हद्दींतील पोलंड जवळ शेतकऱ्यांनीं मोठें बंड मांडलें आहे रक्तपात झाला व होत आहे सर्व शेतकऱ्यांनीं एकदम शस्त्रें घेऊन उठावें असा जाहिरनामा प्रसिद्ध करण्यांत आला आहे.

ठा० अ०

राक्षसी तोफ— क्रान्स्ताद या किल्ल्यावर ठेवण्या साठीं जर्मनींतील प्रख्यात क्रप याच्या कारखान्यांत एक तोफ ठेविली आहे तिचें वजन १३५ टन आहे. या तोफेच्या नळीचा व्यास ६॥ फूट, व पल्ला १२ मैल आहे एका मिनिटांत हीतून दोन बार निघतात प्रत्येक बार काढण्यास ३००० रुपये खर्च येतो.

चालू महिन्याच्या १५ व्या तारखे पासून तीन महिनें पर्यंत मुंबईंतील गिरण्या दरमहा ८ दिवस बंद ठेवाव्या असा मुंबईंतील गिरण्याच्या मालकांनीं नुकताच ठराव केला आहे. कापडाच्या मंदी मुळें असा ठराव करावा लागला आहे.

शु० सू०

आपल्या इकडे नळानें पाणी पुरविण्याची ताखत नाहीं, पण अमेरिकेंत काय प्रकार चालला आहे तो पहा. घरोघर दूध पुरविण्या करितां शहरांत दुधाचे नळ फिरविण्याची एक कंपनी निघाली आहे. ही कंपनी चांगली चालली म्हणजे मद्याचे नळ फिरविणार म्हणतात! मग मद्यप्यानीं कलालांचे दुकानी सुद्धां जावयाला नको! तोटी फिरवून तोंड लाविलें कीं आगांत देवी आलीच!

बाटली कापणें-- एखाद्या बाटलीचें तोंड कापावयाचें असल्यास रॉक ऑईलमध्यें काप साची दोरी भिजवून ती त्या बाटली सभोंवती कापावयाचे जागी घट्ट गुंडाळावी आणि तीला पेटवून द्यावें म्हणजे खाडकन तुकडा पडतो. किंवा एखादी लोखंडी तार लाल तपवून ती घट्ट गुंडाळावी म्हणजे ही काम होतें. लवकर तुकडा न पडल्या त्या जागीं गार पाणी ओतावें म्हणजे तुकडा पडतो.

तंबाखूचा प्रथम शोध इ. स. १५१० मध्यें लागला असें म्हणतात.

कागदाचें घर— युरोपांत बर्लिन येथें नुकतेच एका गृहस्थानें कागदाचें घर तयार केलें आहे तें मोडून पाहिलें तर त्यें नेतां येतें त्याच्या भिंती कागदाच्या दुहेरी थरांनीं तयार केल्या असून त्याच्या आंतलि भागाला शिस्तव व बाहेरच्या भागाला पाणी कितीही लागलें तरी त्या पासून त्यांना कांहीं एक इजा होऊंनये अशी तजवीज केली आहे. कागद चौकटी मध्यें बसविला असून त्या चौकटी पाहिजे तेव्हां एकमेकाशी सांधतां येतात. हें गृहस्थ सुदाम हवा खाण्यासाठीं त्या हौशी गृहस्थानें तयार करविलें आहे, व त्यातील स्वयंपाकाची खोली ९० फूट लांबीची आहे.

वा० वृत्त०

मद्रा देशांतील कित्येक ब्राह्मण कामदारांत लठालठी सुरूं झाली आहे.

प्रत्येक लष्करी टोळींत तारायंत्र शिकलेले निदान सहा इसम तरी असावे असा कमांडर इनचीफ यांनी एक ठराव केला आहे असे ह्मणतात लढाईत खुद्या हलविण्याची गरज विशेष खरीच

## जाहिरात.

सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं आकोल्यास आठवड्यातून दोन बाजार भरावें असें फार दिवसा पासून घाटत होते त्याप्रमाणे बाजार ता. २ एप्रील सन १८९० इसवी रोजी बुधवार आहे त्या दिवसा पासून बाजार भरावित जावा असा आकोले म्युनसीपल कमेटीचा ठराव जाला आहे सदरहु बाजारा करितां जागा शहरचे पश्चीमेस सफीलीचे बाहेर तयार केली आहे करितां गावांतील व पेठेंतील सर्व दुकानदार लोकांनीं सदरहु तारखे पासून सदरहू जागीं बाजार भरवीण्याची तजवीज करावी ह्यापासून सर्व लोकांचा फायदा आहे. तुर्त बाजारा करितां जागा थोडी तयार केली आहे. बाजार जसजसा भरभराटीस येईल तसतसी जागा ज्यास्त तयार करण्यांत येईल रविवारचें बाजारास जशा सोई जाल्या आहेत तशा करून देण्यात येतील ह्या बाजारांत दुकानदारांस बाजार बैठकी बद्दल तुर्त कर द्यावा लागणार नाहीं कळावें ता० २१।३।९० इ०

Krishnaji Malhar.
Sceretary.
A. M. C.

## पाक.

सालंमिश्री पाक घेतला असतां धातुची मजबुती होऊन शक्ती वाढते दर दिवस ३ तोळे प्रमाणें ४५ दिवस घ्या.

बदाम पाक घेतला असता, मस्तकांतील उष्णता दूर होते डोळ्यास थंडावा येतो धातु पुष्ट होते बळ येते दरदिवस ३ तोळे प्रमाणें ३० दिवस घ्या.

गोखरूचा पाक घेतला असतां मूत्र मार्गात होणारी आग, तिडका, जुनापरमा, मेहरोग मूत्र पुष्कळ आणि गढूळ होते तो हे रोग दूर होऊन धातु शुद्ध होते बळ येते स्त्री संगाची इच्छा होते दर दिवस ३ तोळे प्रमाणें ६० दिवस घ्या.

कोहळे फळाचा पाक घेतला असतां डोळ्यास येणारी अंधारी भोंवळ पित्ताचे उपद्रव हे रोग दूर होऊन रक्तशुद्ध होते धातु पुष्ट होते बळयेतें दरादिवस ३ तोळे प्रमाणें ४६ दिवस घ्या.

वर लिहिलेले पाक मागविण्याची रीत

| तोळे | किंमत रुपये | पोष्टेज |
|---|---|---|
| १६ | १ | ८९ |
| ३२ | २ | ०१३ |
| ४८ | ३ | ०१३ |
| ६४ | ४ | १०१ |
| ८० एकशेर | ५ | पोष्टेज माफ. |

पत्ता गजानन बाळकृष्ण वैशंपायन पेठ सदाशिव पुणें.—

☞ हें पत्र अकोला येथें कै. वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सहामाही " ३ " ०८
सालअखेर " ७ " १०८
किरकोळ अंकास.....................०४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेंपेस ........०१

Per annum in arrears 7 "1Rs. 8 as
Six monthly...........3 " 8 as
Single copy.................................2as

# वऱ्हाडसमाचार.

Advertisements
Below 10 lines... 2Rs
per line over10...4 as
Repetition per line3as

THE BERAR SAMACHAR

VOLXXIV AKOLA MONDAY APRIL 21 1890 NO 15

वर्ष २४ अकोला सोमवार तारीख २१ माहे एप्रील सन १८९० इ० अंक १५

## पत्रव्यवहार.

ह्या सदरा खालील मजकूर पत्र कर्त्यांच्या मतास मिळूनच असेल असें समजूं नये.

परतवाडा १४।३।९०।इ०

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस

सा० न० वि० वि० खालील चार ओळीस येत्या अंकी आपण जागा द्याल अशी आशा आहे. उन्हाळा विशेष भासूं लागला आहे अजून तर उन्हाळ्याचे बरेच दिवस जावयाचे आहेत.

येथून पार्लमेंट सभेस एक अर्ज सुमारें६०० सह्यांचा गेला आहे व ५०० पाच पांचशे सह्यांचे अर्ज तयार झाले आहेत तेही लौकरच जातील. या जिल्ह्यांतून २००० हजार सह्या जातील असा अजमास आहे. वऱ्हाडांतून इतर ठिकाणाहून पार्लमेंट सभेस अर्ज गेल्याचें कोठेंच वाचण्यांत आलें नाहीं. तर याकडे देशहितेच्छु लोकांनीं लक्ष दिलें पाहिजे.

पत्रकर्तेराव अलिकडे शिक्षणक्रम ही बराच कठिण निघाला हें सांगायास नकोच परंतु शाळेंतील मुलांस वागविण्याचा क्रम ही फार चमत्कारिक झाला आहे. आम्हास दररोज असें आढळून येतें कीं शाळेतील ( कांहीं वर्गांतली ) मुलें ११ आकरा साडे अकरा वाजता सुटतात व तसेंच एक तास झाला नाहीं तोंच मुलें शाळेंत परत जातांना दिसतात. त्या मुलांचे पायांत जोडा नाहीं!! डोक्यावर छत्री नाहीं! तोंड घामानी डवडवलेंच! अशी त्यांची स्थिति पाहून कोणालाही द्रव येणार नाहीं असें नाहीं. आम्ही कांहीं मुलास इतके उन्हांत कोठे जाता असा प्रश्न केला असता आम्हांस मास्तर साहेबांनीं बारा वाजतां आलेंच पाहिजे म्हणून सांगितलें न गेलेतर चांगला ठोक मिळतो. आम्ही एक दिवस वर निर्दिष्ट वेळी शाळेंत गेलों होतों व पाहतों तों मुलें उन्हांत खेळतांना दिसलीं त्या वेळीं सुमार दोन वाजण्याचा सुमार होता. अशा रितीनें मुलांस किती त्रास होत असेल हें लिहून सांगता येत नाहीं मुलांला सुख व्हावें उन्हाचा त्रास न व्हावा म्हणून मार्च २० ते खे पासून जुन २० तारखे पर्यंत सकाळची शाळा करावी असा नियम करून ठेविला हें मास्तराला माहित नाहीं असें यावरून दिसतें. या गोष्टीकडे वरिष्ट अधिकाऱ्यानीं लक्ष द्यावें अशी विनय पूर्वक प्रार्थना आहे.

मेहेरबान रॅनिक साहेबयांनीं आपल्या डिपुटी कमिशनरच्या जागेचा च्यार्ज घेतला. व मेहरबान निकोलेट साहेब हे लौकर अकोल्या कडेस जाणार आहेत. पत्रविस्तार फार झाला याची माफी असावी हे विनंती.

आपला
X

रा. रा. वऱ्हाडसमाचार पत्र कर्ते यांस.

साष्टांग नमस्कार वि. वि. खालील चार ओळीस आपल्या पत्रीं जागा द्याल अशी आशा धरून लिहीत आहें.

आजकाल विद्येच्या संबंधानें लोकांचीं मतें बरीच विलक्षण झालेलीं दिसतात. बहुतेक लोकांचा स मज असा आहे कीं विद्या जी शिकावयाची ती केवळ पोट भरण्या करितां दुसरें कशाही करितां नाहीं. कल्याण व्हावें तर मोठेंच व्हावें पैसा मिळावा तर मलाच मिळावा; व दुसऱ्यास ज्यास्त मिळाला असतां त्यापासून उत्पन्न होणारी मत्सर बुद्धी इत्यादि कोत्या समजांचा संपूर्ण नाश व्हावा. आपण ज्या देशांत उत्पन्न झालों त्या जन्मभूमीचा यथायोग्य अभिमान मनांत धेऊन दुःखामध्यें असलेल्या आपल्या देश बांधवांचें दुःखाचें ओझें कमी व्हावें म्हणून त्या दुःख भारा पैकीं थोडा भार आपल्या मस्तकीं घेऊन त्यांचें दुःख हलकें करावें, व सावण्या सारखें असल्यास त्यांच्या दुःखशमनार्थ पुष्कळ कष्ट घेऊन त्यांना दुःखमुक्त करावें इत्यादि सद्गुण प्राप्त्यर्थ विद्या शिकावी हा मूळचा उद्देश तो अगदीं विसरल्या सारखा होऊन भलताच समज झाला आहे हें वर सांगितलेंच आहे या गोष्टीच्या प्रत्ययार्थ फार लांब जावयास नको सध्याचीच स्थिति घेऊं.

उदाहरणार्थं ही आपली राष्ट्रसभा. पत्र कर्तेराव, ही सभा किती महत्वाची आहे व या संबंधानें केवढी चळवळ चालली आहे हे लिहीणें नको. पण या आमच्या उमरावती शहरामध्यें विद्यामृताचे घुटक्यावर घुटके घेऊन तर्र झालेले व आपणास कृतकृत्य असे किती बरे लोक या राष्ट्र सभे संबंधी खटपट मनापसून करित असतील? मुंबईहून आल्या पासून या संबंधी मोठ्या कळकळीनें व मनःपूर्वक कोणी तरी विचार केला असेल काय? पार्लमेन्ट सभेपुढें सादर करावयाच्या अर्जावर सह्या घेण्या करितां कोणासतरी खेडोपाडी धाडून या सभे संबंधी विचार व या विनंती पत्राचा उद्देश लोकास कळविण्या संबंधी कांहीं तरी व्यवस्था झाली आहे कीं काय? इतके लांब कशाला या सभेसंबंधानें आमच्या या उमरावती शहरांतच किती व्याख्यानें झालीं व या सभेचा व विनंती पत्राची अवश्यकता व महत्व लोकांच्या मनांमध्यें भरवून देण्याचा कोणी कधीं तरी प्रयत्न केला काय? नाहीं मुळींच नाहीं. आतां सर्वच विद्यामृत पिऊन तर्र झालेले लोक या संबंधानें निष्काळजी व दुर्लक्ष करणार आहेत असें म्हटलें असतां मोठा प्रमाद होईल. या सगळ्या शहरांत खरें कळकळीनें काम करणारे सुमारे दोन किंवा तीन इसम असतील त्या पैकीं दोन इसम तर फारच काळजीनें व मोठ्या नेटानें काम करित आहेत ईश्वर. त्यांना यशस्वी करो व या त्यांच्या सद्बुद्धि बद्दल सत्कृत्यां बदल व स्वदेशसेवा तत्पर ते बद्दल त्यांस उत्तम बक्षिसें देऊन चिरायु करो हेच त्यास सविनय प्रार्थना आहे.

आयुष्याचा अर्धा भाग विद्यामृत प्राशनांत घालवून दासपणाच्या बंधनातून सुटून स्वतंत्र रूपी तरुण स्त्रियेशीं यथायोग्य समागम व्हावा म्हणुन रात्रंदिवस उरस् फोड मेहनत करून आपल्या हातामध्यें ज्यानीं लग्न कंकण बांधलें आहे अशा प्रकारच्या विद्वज्जनांची काय ही स्थिती? स्वतंत्रतारूपनिर्मल मनाच्या स्त्रीशीं यांना समागम आवडेनासा होऊन दासतारुप वेश्येबरोबर रममाण होण्यासाठीं एका पायावर तयार आहेत. यांचे नेहमींचे विचार म्हटलें म्हणजे पुष्कळ पैसा मिळवून आपल्या शरीरास सुखासतो व्हावी, व आपल्या ऐषारामा मध्यें व चैनी मध्यें तिळमात्र सुद्धा व्यत्यय येऊं नये म्हणून यांची केवढी तरी तत्परता शरीर प्रकृतीला पुढच्या काळामध्यें रोगोत्पत्ती होऊं नये म्हणून मौल्यवान व आधुनिक अशा सुवासिक व रुचकर औषधांचें सेवन करण्यामध्यें केवढी तरी दक्षता व वाजवी पेक्षां फाजील नियमितपणा खरोखर पाहिलें असतां ही यांची खरी स्थिति असून यांचा लोक हिता संबधानें व राष्ट्र सभे संबधानें केवढा तरी डौल. कोठें या संबंधानें सभा वगैरे झाल्या तर वाक् पांडित्य करण्यास तयार. वरीं आलें कीं, "पुराणांतली वांगीं पुराणांत" या म्हणी प्रमाणें सभे मधलें विचार सभे मध्यें राहून त्या संबधानें नुसता विचार सुद्धां ज्यांच्या मनांत येत नाहीं. बरें स्वतः या संबंधानें मेहनत होत नाहीं म्हणून लोकांनीं केलेल्या परिश्रमा बद्दल तरी यांनां मना पासून भूषण वाटतें कीं काय या संबधानें मोठाच संशय आहे. आमच्या उमरावती शहरांतून दोघे गृहस्थ स्वदेश सोडून परदेशाला नाना प्रकारचे हाल भोगून प्रकृतीकडे न पाहतां लोक हितार्थ जाणार त्यांच्या संबधानें तरी किती विलक्षण विचार—एक म्हणतो कायहो हे इंग्लंदला जाऊन काय + + मारणार कोणजाणे. यांची येथेंच तर बोलण्याच्या वेळेस काय हवेलंडी उडून जाते. दुसरा म्हणतो तुला काय माहीत आहेरे त्यांच्या मनांतला खरा उद्देश तो म्हटला म्हणजे तिकडील कांहीं मोठी शहरें पाहून देशपर्यटण करावें येवढाच आहे. अहाहा! काय हे पोक्त विचार व केवढा दूर दर्शीपणा! असे अशा विद्वज्जनांना काय म्हणावें? बरें एकी असावी म्हणून यांची केवढी वर्तमान पत्रांतून ओरड; उदाहरणार्थ सूक्ष्म व कोमल तंतू. लोक याच तंतूंचे मोठमोठे दोर करून उन्मत्त अशा सापाला व मदोन्मत्त अशा प्रचंड हत्तीला बांधीत नाहींत कीं काय? त्याच प्रमाणें आपल्या प्रांता मधून जाणारे विद्वज्जन रुप जे तंतू यांचा आपल्या हिंदुस्थानांतून दुसऱ्या प्रांता मधून जाणाऱ्या विद्वज्जन रुप इतर तंतूंशी समागम होऊन यांचा एकीरुप मोठा दोर होऊन तो सरकारच्या दुराग्रह रुपी गजाला वळणीवर आणणार नाहीं काय? आणिलच आणील पत्र कर्ते राव मग "हे तेथें जाऊन काय*+ मारणार" हें म्हणणें कितपत शहाणपणाचे व आमच्या विद्वज्जनाला शोभण्या सारखें आहे याचा आपणच विचार करावा. पत्र विस्तार फार झाला येतो आतां नमस्कार -

उमरावती तारीख १६ माहे एप्रिल सन १८९० { आपला स्वदेश हित चिंतक ( क्ष )

वऱ्हाडसमाचार.

मिती वैशाख शुद्ध २ शके १८१२

## आमच्या सामाजिक सुधारणेंत उणीव.

आपल्या ह्या देशांत पाश्चिमात्य विद्येचा प्रसार सुरूं झाल्यापासून बरीच सुधारणा होत चालली आहे ही गोष्ट नव्यानें सिद्ध करावयास पाहिजे असें नाहीं. आणि ती सुधारणा केवळ एकाच गोष्टीमध्यें होत चालली आहे असेंही नाहीं. इंग्रजी लोकांच्या हाता खालीं आपला व्यापार वाढला आहे. कला व कारखाने सुरूं झाले आहेत; लोकांतील धर्म वेड बरेंच निघून चाललें आहे. सामाजिक विषय व राष्ट्रीय विषय आपणां पैकीं पुष्कळांस जे पूर्वी मुळींच कळत नव्हते ते आतां कळूं लागले आहेत व त्यांत सुधारणा होत चालल्या आहेत. आपली स्थिती अशा रीतीनें बदलत चालली आहे ही एक मोठी आनंदाची गोष्ट होय. पण इतके सगळे असून देखील आह्मांस एक मोठें दुःख वाटत आहे तें इतकेंच कीं ह्या सर्व सुधारणा जितक्या जारीनें सुरूं व्हाव्या तितक्या जारीनें झाल्या नाहींत व होत नाहींत. आणि राष्ट्राच्या जितक्या लोकांत व्हावयास पाहिजे तितक्या झाल्या नाहींत. सकारण सर्व गोष्टी असतात. तेव्हां हे जे दोन दोष आपणांत दिसून येतात त्यांस कांहींच कारण नसेल काय? आणि तें जर कारण दिसून येईल तर ते नाहींसें करण्या कडे आपल्या लोकांचे लक्ष जावयांस नको कीं काय? आह्मांस असें वाटतें कीं सुधारणे पेक्षां ती सुरूं करण्याकडे लोकांची प्रवृत्ति करून देणें हें जास्त इष्ट आहे. आणि ही गोष्ट जास्त इष्ट असून आमच्या सुधारकांचें तिकडे लक्ष जात नाहीं या बद्दल आम्ही फार दिलगीर आहों.

आतां वरील दोन दोषांच्या कारणाकडे आपण लक्ष देऊं. असा एक मानवी धर्म आहे कीं ज्या गोष्टीनें मनुष्याचा आचार धर्म इ-

त किंवा इच्छा बदलत नाहींत अशी जर एखादी गोष्ट त्या पुढें ठेवून तिचें प्रतिपादन करून ती सिद्ध करून दाखविली तर तो सिद्धांत तो कबूल करितो. दोन आणि दोन याचा गुणाकार चार आहे कीं काय अशा बद्दल कोणास ही शंका येत नाहीं. त्याच प्रमाणें भूमितीच्या सिद्धांताची आणि गणित विषयाची गोष्ट आहे याचें कारण एवढेंच कीं मनुष्य त्या कबूल करितो तशी गोष्ट मानवी धर्मावलंबित गोष्टी संबंधी नाहीं. अशा गोष्टी जर मनुष्यास सिद्ध करून दाखविल्या तरी देखील तो त्या प्रमाणें वागत नाहीं पहा पुष्कळ मनुष्यें अशीं आहेत कीं सत्यभाषण हें हितावह असें कबूल करून देखील ते आपण स्वतः तसें वागत नाहींत किंबहुना असे ही आहेत कीं प्रामाणिक पणा चांगला असें म्हणतात मात्र पण त्या प्रमाणें वागत नाहींत. या उदाहरणा वरून जें आम्ही वर नेमलें आहे तें स्पष्ट होत आहे म्हणजे मानवी धर्मावर अवलंबून असलेल्या गोष्टींचा केवळ सत्यासत्य पणा दाखवून चालत नाहीं तर मनुष्याचे कल आणि इच्छा त्या गोष्टीकडे लावून दिल्या पाहिजेत सत्य बोलणें चांगलें हें प्रत्येक मनुष्य कबूल करील पण मी सत्या प्रमाणें कां वागावें ही त्याची खात्री होई तों पर्यंत तो खरें बोलण्यास प्रवृत्त होणार नाहीं. त्याची जेव्हां अशी खात्री होईल कीं असत्या पासून अनेक अनर्थ घडतात आणि त्या पासून आपणांस सुख आणि मोक्ष प्राप्त होत नाहींत असें जेव्हां त्यांस वाटू लागेल तेव्हां काय तो खरें बोलूं लागेल. सारांश मानवी धर्मावलंबित गोष्टी या केवळ सिद्ध करून दाखवून चालत नाहीं तर त्या गोष्टीपासून मनुष्यास सुख होईल व त्यावाचून अनर्थ होतील अशी जेव्हां त्यांची खात्री करून देतां येईल तेव्हांच काय तो मनुष्य त्या गोष्टी प्रमाणें वर्तन करील तर आतां आपल्या देशांत सुधारणा होत असून देखील त्या जारीनें होत नाहींत व त्याकडे लोकांची प्रवृत्ति होत नाहीं यांचीं कारणें कळणें हें मोठें सुगम आहे. आणि तें इतकें कीं हल्लीं मनुष्यास कोणते कोणते अनर्थ होत आहेत व त्यांस सुख कसें मिळत नाहीं व नवीन एखादी सुधारणा सुरू केली असतां अनर्थ कसे नाहींसे होतात अशा प्रकारची खात्री व अशा प्रकारचा समज आमच्या लोकांतील पुष्कळांस नाहीं. जे चांगले सुशिक्षित आहेत त्याची गोष्ट येथें आम्ही बोलत नाहीं कारण त्यांस सर्व गोष्टींचे अनर्थ आणि सुखदुःख कळालें असतें आणि आपल्यांत चांगलें कोणतें आणि वाईट कोणतें याबद्दल त्यांची खात्री झाली असते आणि म्हणूनच एखाद्या गोष्टीची सुधारणा आपल्या देशांत होऊं लागली आहे. परंतु आमचा म्हणण्याचा भाग इतकाच कीं अशा प्रकारची सुधारणा जरी पुढारी लोकांनीं सुरू केली तरी ती पुढारी लोकांत पुष्कळ दिवस राहते आणि पुष्कळ काळानें इतर लोकांत जाऊं लागते याचें कारण असें कीं पुढारी लोकांप्रमाणें इतर लोक सुशिक्षित नसतात व हल्लींच्या स्थितीपासून पुष्कळ अनर्थ होतात म्हणून ती त्याज्य आहे व पुढारी लोक जी सुधारणा करण्यास इच्छितात ती पासून फायदे आहेत अशी त्यांची खात्री होत नाहीं म्हणून वर सांगितलेले दोष आपणांत दिसतात. तेव्हां पुनः आम्ही असें म्हणतों कीं सुधारणा सुरू करण्यापूर्वीं लोकांची त्या सुधारणेकडे प्रवृत्ति करून देण्याकडे पुढारी लोकांचें लक्ष गेलें पाहिजे म्हणजे त्या सुधारणेपासून श्रेय मिळेल. सुधारणेचे फायदे समजून देण्यापूर्वीं हल्लींच्या स्थितीचे अनर्थ लोकांस समजून दिले पाहिजेत. लोकांपुढें त्यांच्या स्थितीचें चित्र ठेविलें पाहिजे. ही बाब सर्व सुधारणेस लागू आहे म्हणून ती आपला जो प्रस्तुत विषय सामाजिक सुधारणा यास ही लागू आहे आपला प्रस्तुत विषय आणि इतर सुधारणा या दोघांचें ही प्रतिपादन येथपर्यंत सारखेंच असल्यामुळें आम्ही सामाजिक सुधारणा या नांवानें तिचें वेगळें प्रतिपादन केलें नाहीं म्हणून आम्ही फिरून इतकेंच लिहितों कीं आमच्या सामाजिक सुधारणेस वरील प्रतिपादन लागू असून ती आतां आमच्या लोकांत कशी जारीनें सुरू करितां येईल याविषयीं आतां आपण विचार करूं.

( पुढें चालूं )

---

मुंबई युनिव्हरसिटीच्या 'आर्टस' शाखेकडील शिक्षणा संबंधानें फेर बदल करण्याचें आज दोन अडीच वर्षें घाटत होतें. नवीन पद्धतीच्या प्रकरणांत भवति न भवति होऊन गेल्या सोमवारीं सिनेट मध्यें या गोष्टीचा अखेर निर्णय ठरला. बी. ए. पदवीच्या परिक्षेस हा काल पर्यंत तीन वर्षें लागत होतीं त्या ऐवजी या पुढें चार वर्षें लागणार आहेत. पहिले, दुसरे आणि चवथे वर्षाचे अखेरीस मिळून पूर्वीं प्रमाणें परीक्षा तीनच कायम केल्या. इंग्रजी भाषेंत पी. इ. परीक्षेला आणि बी. ए. परीक्षेला एक एक प्रश्नाचा कागद होता त्या ठिकाणीं दोन दोन कागद ठेविले आहेत. अर्थात् सध्या इंग्रजी भाषेच्या शिक्षण क्रमांत फार मोठी भर पडणार आहे. पहिल्या वर्षाच्या परीक्षेतले सध्याचे दोन विषय म्हणजे तर्कशास्त्र व पदार्थ विज्ञानशास्त्र काढून दुसऱ्या वर्षी नेमले आहेत आणि त्यांच्या मोबदल्यांत दुसऱ्या वर्षाचे गणित बरेंच कमी केलें आहे. चवथ्या वर्षाचे परीक्षेसाठीं अर्थशास्त्र व इंग्लंड व इंडिया या दोन देशांचा इतिहास हे दोन विषय आवश्यक ठरवून बाकीचे विषय सध्यांप्रमाणें कायम केले आहेत. रा. रा. वामन अबाजी मोडक प्रिन्सिपल एलफिनस्टन हायस्कूल यांनीं देशी भाषा पाठशालांतून सुरू करण्याबद्दल सुचविलें होतें परंतु त्यांची सूचना बहुमतानें पसार झाली नाहीं. अर्थशास्त्र व तात्विकदृष्टी इतिहासज्ञान ह्या दोन गोष्टी आवश्यक विषयांत घातल्यापासून आमच्या मतें सध्यांशापेक्षां विद्यार्थ्यांस परीक्षेचा मार्ग फार बिकट होत आहे. एकंदरीनें इत्यर्थ हाच कीं पाठशाळांतील शिक्षण उत्तरोत्तर अवघड व फार खर्चाचें झालें आहे.

---

स्वदेश सेवेसाठीं ज्यांची 'ब्रह्मांडी लागली टाळी। मग देहातें कोण सांभाळी' असल्या प्रकारची स्थिती झाली आहे ते गृहस्थ लोकांस कितीतरी सन्माननीय असतात, लोक त्यांच्या सत्कृत्याबद्दल त्यांस किती मनोभावानें चहातात इत्यादि गोष्टी गेल्या एक दोन आठवड्यांत सर्व वऱ्हाडांत झालेल्या लोकांचे विचारक्रांती, आनंद प्रदर्शक पानसुपाऱ्या, मेजवान्या व सुशिक्षित विद्वान् मंडळींचीं व्याख्यानें वगैरे वरून सहजी कळून येतील. गेल्या बुधवारीं उमरावतीस वऱ्हाड सार्वजनिक तर्फे आमच्या प्रतिनिधीद्वयांस पान सुपारी झाली. त्या वेळीं कच्छी व गुजराथी व्यापाऱ्यांनीं मानपत्र दिलें. रा. रा. पांडुरंग गोविंद यांचें उर्दूत सुरस व आवेश युक्त भाषण झालें आणि त्यांस रा. रा. खापर्डे यांच्या मराठी भाषणानें विशेष पुष्टीकरण आलें.

---

**The Berar Samachar**

MONDAY APRIL 21, 1890.

## WESTWARD HO!

The above is the title of a very interesting novel by Mr. Richard Kingsley, detailing the adventures of the good ship Grace across the Atlantic, and in the new world generally. We borrow the title today to be able to refer to the work of the noble band selected at the last session of the Indian National Congress in Bombay, to press the views of the natives on the English public, and through them induce the Parliament to grant us certain concessions which we believe to be essential and indispensable to the permanency of the British Rule here. It is needless to say that the movement is loyal to the core and has the closer connection of England and India for its chief object. History teaches that no empire however extensive and strong can endure unless it has a firm hold on the affections of the people and we know that rulers when not of the same race or country as the ruled, often go astray purely through ignorance notwithstanding the unimpeached excellence of its intentions. Putting these two together and applying the general principles to the existing state of affairs in India it follows that every thing that tends to popularize the present Government, and spread the know ledge of India in England, must be and is a righteous measure and we think the Congress was very wise when it decided to entertain an English agency to propogate its views in the British isles. Mr. Digby one English agent has hitherto worked, so to say single handed, though assisted very materially by great and wise men at home by their advice. Now a number of able gentlemen have crossed the ocean not only to strengthen his hands but also to do a good deal of the work and we believe we are justified in saying that the Indian movement is concentrating its forces in London to do battle with ignorance and draw the attention of Parliament to the hitherto silently suffered wrongs and grievances of India. With that true magnanimity and disinterested zeal which is the characteristic of every true Englishman, Mr. Bradlaugh has accepted the role of the leader and opened the compaign by a series of lectures. He contributes an excellent article to the new Review and shows up the hollowness of the opposition started by some misguided and designing people. We shall pause to notice one and one argument only. It is said that the movement is confined to educated men. If so, replies Mr Bradlaugh, it carries its own recommendation, and may properly be made a boast of.

Sir William Wedderburn has taken the field as the coadjutor of Mr. Bradlaugh, and is assisted by the thrilling eloquence of Mr. Surrendranath Banerji. Mr. Umeshchandra is already there, and Rev. Mr. Evans will win all hearts by the pleasantness of his addresses. Our own province though small it be is not without its representatives in the band of the noble workers. Mr. Mudholkar and Mr Joshi left yesterday to sail by the P and O steamer on the 25th instant. Mr. Norton of Madras is their fellow passenger. Mr A. O. Hume who may very properly be called the father of the movement has already preceded them, and so far as far-seeing general ship is concerned, nothing, we are sure, will be wanting.

On the 13th instant the people of Akola entertained Messrs Joshi and Mudholkar to a Pansupari and the Native club invited them to a dinner. In one last number we have noticed both these events in our marathi columns. In this week the good people of Amraoti gave a Pansupari in the building of the Native club there. It was very tastefully decorated the band played merry airs, and the assemblage was very picturesque. The speeches made on the occasion were full of loyalty and enthusiasm and success was freely prophesied to the noble cause. A dinner was given in honor of the Delegates and it was a brilliant success. We are glad to see that the English custom of making after dinner speeches was adopted with necessary modifications, and the guests of the evening replied briefly. We join very heartily in wishing god speed to Messrs Mudholkar and Joshi and wish them success in their patriotic errand. We look forward with pleasant expectation to the day when they will return to tell us the story of their travel and toil and bring back with them a message of love and peace from our fellow subjects across the ocean.

## RAJA SIR MADHAV RAO ON NATIVE STATES.

Lord Cross's Bill, which disregards entirely the elective principle in the appointment of members to the several Indian Legislative Councils, has received strong support from the veteran statesman Sir Madhava Rao. He distinctly and without hesitation says that the system of nomination will best serve the interests of the country at large. According to his opinion all classes of the Indian community will be better represented by the system of nomination than by the elective system. On this score Sir Madhava Rao has come into ill grace of the Indian Press and of those who support the congress movement. We think that those who find fault with the Raja are in the wrong. They do not take into account that the Raja spent the whole time of his life in Native states. It is by his education, by the method of his administration and by his social position, that he is entirely separated from his countrymen whose education, avocations, and social position are quite different from his. He does not deserve the universal condemnation which has been showered upon him by the Indian Press in general. Man's usefulness is to be measured by the good he has done to the people amongst whom he lives.

Recently the Raja has made a very valuable contribution to the solution of the most important question in Indian politics. In his reply to Sir Lepel Griffin's lecture on native states the Raja has brought out 76 distinctive characteristics which make the native states agreeable to the natives of this country; and these distinctive virtues are conspicuously absent in British Indian administration. In British India there is every where system and method. Here the rich become more rich and the poor are reduced to poverty and beggary. In native states men and families remain in the same state of life for years together.

This reply of Sir Madhao Rao is worth the perusal of every statesman in India and in writing it the Raja has done immense service to the country There were 100 replies to Sir Lepel's address but not one answered the proud politician so completely as did that of Sir Madhav Rao. It is an important state document and if British Indian administrators consult the same when any question relating to a line of policy towards Native States arises, it would save them from many mistakes. A man of Sir Madhava Rao's experience only could write the thing. The Raja is most useful in the path of life which he has trod and when people tried to convert him to the doctrines of the Congress naturally the conversion happened to be temporary and transient and in this situation he did not shine as conspicuously as he does in things relating to Native Indian States. It was the mistake of the people to make Sir Madhava Rao a congress man and not the mistake of the Raja. The people have done great injustice by condemning Sir Madhava Rao for his outspokenness and honesty.

A few suggestions to Messrs Mudholkar and Joshi.

(1) The Delegates should well remember that they go to England with the view of inducing the British public both conservative and Liberal to secure in small measure the privilege of representative Govt.

(2) The Delegates should as far as lies within their reach, use only such means to secure this by which they will not make enemies either of conservatives or liberals.

(3) The Delegates should not enter into Enlish politics.

(4) The Delegates should remember that they go to England as representatives of a great and renowned nation on the continent of Asia.

(5) The Delegates should not join issue with any system of religious faith in England. They should neither make the sceptics their friends nor provoke any displeasure of the Orthodox.

(6) The Delegates as representatives of a great nation should preserve a high moral excellence in their mode of life in England.

(7) The Delegates should know that upon them lies a high sense of responsibility on account of the confidence which people have put in them. The work entrusted to them is noble and nobly should they discharge it.

Shaikh Yusuf Husain is appointed to be an Attache to the Resident at Hyderabad substantive pro tempore with effect from the date of joining and during the absence on leave without allowances of Mir Hashmat Ali Khan or until further orders.

Mir Mubarak Ali, Tahsildar of the 2nd Grade in the Hyderabad Assigned District is appointed to officiate as an E. A. C. of the 5th class with effect from the date of assuming charge and during the absence on leave of Mr. C. H. Price E. A. C. of the 3rd class, or until further orders.

Mirza Safdar Ali Beg, Tahsildar of the 2nd Grade in the H. A. D. is appointed to officiate as an E. A. C. of the 5th class, with effect from the date of assuming charge and during the absence on leave of Kesheo Rao Jeykrishna, E. A. C. of the 4th class, or until further orders.

In continuation of the notification of the Government of India in the Foreign Department No. 1426-1., dated the 21st December 1882, the Governor General in Council is pleased to declare that Act X of 1882 (The Code of Criminal Procedure 1882) shall in its application to the Cantonment of Secunderabad, be subject to the modification that a trial before the Court of Session may, in the discretion of the judge, be without jury or aid of assessors. G. I.

### पोंच

पिंपळगांव राजा —'क्ष'— पत्रें उशीरा पोचलीं. सबब तुमच्या पत्रांचा विचार पुढील खेपेस केला जाईल.

## वऱ्हाड.

हवामान— ऋतुमाना प्रमाणें उष्मा दिवसेंदिवस अधिकाधिक होऊं लागला आहे. पारा १०४ अंशा पर्यंत चढतो. मध्यंतरी गुरुवारीं सकाळीं गारांचा थोडा पाऊस पडला इन्फ्लुएन्झा— तापाची सांथ हळुहळु कमी होत असल्या मुळें लोक आनंदांत आहेत. हळदी कुंकांची ही सध्यां रेलचेल उडाली आहे.

मे. सी. ए. डब्ल्यु. डेव्हिस आफ. डेपुटी कमिशनर हे क्याप्टन मारिस यांच्या रजेंत वाशिमास डेपुटि कमिशनर झाल्या प्रमाणें आज आपले कामाचा चार्ज मे. निकोलेट साहेबांस देऊन नंतर लवकरच आपल्या नवीन जागीं रुजू होतील.

मे. डेव्हिस साहेब हे अकोला सोडून जात आहेत म्हणून त्यांच्या सन्मानार्थ सलामी दाखल येथील नेटिव जनरल लायब्ररी कडून काल सायंकाळीं पानसुपारी देण्यांत आली. साहेब बहादूर लायब्ररीचे सभासद होते आणि लोक ही त्यांस चहात असत.

गेल्या मंगळवारीं वऱ्हाड वतनदार लोकांच्या व्यवस्थापक मंडळाची सभा भरून ठराव झाले ते येणे प्रमाणें:--

१ सभेचें काम चालविण्या करितां नियम करण्या साठीं खालील गृहस्थ निवडण्यांत आले:— रा. रा. अमृतराव गोपाळ देशपांडे अध्यक्ष; रावसाहेब देवराव विनायक आणि रा. रा. पांडुरंग गोविंद—सेक्रेटरी; रा. रा. मुकुंदराव नंदाजी- मुंडगाव, रा. रा. नानोपंत गढीकर निसबत देशपांडे इलिचपूर, व रा. रा. गोविंदराव उगवेकर देशमुख.

२ प्रांतातील देशमुख देशपांडे लोकांच्या निरनिराळ्या वतना संबंधानें माहिती कशी असावी अशा बद्दल एका सदर पत्रकाचा नमुना तयार करून त्या प्रमाणें माहिती मिळण्या विषयीं व्यवस्था लाविली.

३ मुख्य समारंभास झालेला खर्च हिशोब ठिशोब पाहून पास करावयाचे काम पहिल्या ठरावांतील निर्दिष्ट पांच गृहस्थां कडे सोंपविलें आहे.

४ तारीख २३ मार्च रोजी सभेचा फंड उभारण्या साठीं पंधरा वर्षे पर्यंत रुपया उत्पन्ना मागें अर्धा आण्या प्रमाणें देण्याचा करार म्हणून जो दस्तऐवज सर्वानुमतें पसार झाला त्यावर सह्या घेण्याचे काम सर्वांनीं विनंती केल्या वरून खालील त्रिवर्ग गृहस्थांनीं पत्करिलें आहे:— रा. रा. रामचंद्र गोपाळ देशपांडे अडगांव, रा. रा. मुकुंदराव नंदाजी देशमुख मुंडगाव, व रा. रा. रामराव साधु निसबत देशमुख इलिचपूर. ही मंडळी गेल्या समारंभास वर्गणी ज्यांनीं अद्याप दिली नाहीं त्यांज कडून ती गोळा करण्याचें ही काम सहजी करणार आहेत. त्यांच्या फिरण्याचा खर्च सभेच्या फंडांतुन दिला जावा असें ठरलें आहे.

येथील ताजना पेठेंत मोमीन मशीदीजवळील दुमजली दोन दुकानें शनवार दोन प्रहरीं आग लागून जळलीं. नुकसान हजार बाराशेपर्यंत झालें. मुनसिपल व्यवस्था पाण्याची बरी होती व कानसरव्हन्सी इनस्पेक्टर रा. रा. सखाराम सिताराम यांनीं मोठ्या तत्परतेनें चांगली मदत दिल्यामुळें आग फैलावली नाहीं. परंतु मुनसिपल बंब निरुपयोगी ठरला व आसपासच्या घरवाल्या पाशीं पाण्याचा सांठा म्हणण्या सारखा चांगला नव्हता या दोन गोष्टीकडे लक्ष पुरवून नीट व्यवस्था करण्याकडे मुनसिपालिटीनें सक्त हुकूम फर्माविले पाहिजेत.

रेल तालुके अकोट येथील अबदुल्लाखा नांवच्या मुसलमानानें अकोल्याच्या व आसपासच्या मुसलमान मंडळीस बहिमनजी धर्मशाळेंत शनवार व आदितवार रोजीं बडाखाना दिला. अशा वेळीं इंग्रजी धर्तीवर सामाजिक व राजकीय विषयावर वादविवाद करण्याचा प्रघात पडल्यास फार उत्तम होईल.

वऱ्हाडांतुन दोन गृहस्थ राष्ट्रीय सभे तर्फे विलायतेस जात आहेत हें पाहून येथील मुल्ला मुत्सदी मंडळीनीं राष्ट्रीय सभे विरूद्ध आपले अभिप्राय प्रगट करण्यासाठीं विलायतेस एका मनुष्यास धाडण्याचा विचार केला आणि त्या प्रमाणें गेल्या आठवड्यांत जोरावरखांच्या मशिदींत सभा भरवून सर्वानुमतें तत्संबंधी व्यवस्था करण्याचें ठरलें आहे.

गेल्या गुरुवार रात्रौ शेट भगुलाल ताराचंद यांच्या घरीं अदमासें पंचवीस रुपयांची चोरी झाली. पोलिसांनीं अगोदर सावध राहणें विशेष आगत्याचें आहे.

येत्या शुक्रवारीं रा. रा. मोरो विश्वनाथ जोशी व रा. रा. रंगनाथ नरसिंव्ह मुधोळकर हे पी. ओ. कंपनीच्या आगबोटीनें मुंबईहून रवाना होणार आहेत. ते काल रोजीं वऱ्हाडांतून मुंबईस जाण्या साठीं चालले तेव्हां आप्त इष्ट मंडळी प्रस्तुत वियोगा मुळें व भावी आनंदाच्या लहरी मुळें सद्गदित होऊन अश्रु ढाळीत त्या वेळचा देखावा फार हृदयंगम होता.

---

पंजाब नादारी मुकदमा नंबर ३७ सन १८८९

नमुना ( जी )

विद्यमान नादारी कोर्टाचे ज्यडज्य जिल्हे आकोले यांचे कोर्टांत.

सवत्र लोकांस नोटीस देण्यांत येते कीं जगन्नाथ शिवदास मारवडी राहणार तेल्हारे जिल्हे आकोट नादारी आहे असा अर्ज तारीख ९ माहे नोवेंबर सन १८८९ ई॥ रोजी ठराव झाला आहे. आणि तारीख २० माहे जून सन १८९० हा दिवस नादारीचे सावकारांनीं नेमण्या करितां आणि सावकारांनीं आपल्या तर्फेचा असा ईनीं नेमुन देण्याकरितां व नादारानें आपल्या सुटके विषयीं दिलेल्य अर्जाचा निकाल करण्याकारतां नेमला आहे. नादाराच्या सुटके संबंधी ज्या सावकाराची तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं त्या बद्दल आठ आण्याच्या स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस. त्या नोटीशींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असल ते आणि त्याज बद्दल ज्या साक्षीस समंसे करण्याची इच्छा असेल त्या साक्षी दारांची नांवें नमुद करावी. ही नोटीस जमण्याकारतां नेमलल्या तारखच्या निदान तीन दिवस तरी पूर्वीं दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पहाण्या करितां नादारानें दाखल केलेल्या याद्दी उघड्या ठेविल्या आहेत.

ज्यास नादारावर दावे नोंदाविणें असतील त्यांनीं आठ आण्याच्या स्टांपकागदावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहुन द्यावी. व ते दावे खरे असल्या बद्दलचा प्रतिज्ञा लेख लिहून त्यांवर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दूरचे राहणारे असतील त्यांनीं आठ आण्याच्या स्टांपावर दाव्याची हकिकत लिहून एखाद्या जुडिशियल आफिसरा पुढें तिच्या खरेंपणाविषयीं शपत लिहावी आणि ती यादी टपालांतून कोर्टास पाठवावी म्हणजे ते दावे रजिष्टरी दाखल होतील. कळावे तारीख १८ ४ ९० इसवी.

Richard Macgill.

नादारी कोर्टाचे

जज्ज

---

पंजाब नादारी मुकदमा नंबर ४०

सन १८८९

नमुना ( जी )

विद्यमान नादारी कोर्टाचे जडज्य जिल्हे अकोले यांचे कोर्टांत

सर्वत्र लोकांस नोटीस देण्यांत येतें कीं अर्जदार नामदेव राजना मैयत वारस पुत्र कासन व शंकर व राजाराम आ. पा. मातोश्री सायमा मर्द नामदेव राहणार अकोलें हा नादार आहे. आणि तारीख ३ माहे जनेवारी सन १८९० इसवी रोजीं ठराव झाला आहे. आणि तारीख २९ माहे एप्रील सन १८९० इसवी हा दिवस नादाराच्या सावकारांनीं जमण्या करितां आणि सावकारानीं आपल्या तर्फेचा असाईनी नेमून देण्याकरितां व नादारानें आपल्या सुटके विषयीं दिलेल्या अर्जाचा विचार करितां नेमिला आहे.

नादाराच्या सुटके संबधीं ज्या सावकारांची तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं त्या बद्दल आठ आण्याच्या स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटिशींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असेल ते आधार आणि त्याज बद्दल ज्या साक्षीस समन्सें करण्याची इच्छा असेल, त्या साक्षीदारांचीं नमुद करावीं, ही नोटीस जमण्या करितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस तरी पुर्वीं दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पहाण्या करितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या ठेविल्या आहेत.

ज्यास नादारावर दावे नोंदविणें असतील त्यांनीं आठ आण्याच्या स्टांपकागदावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी व ते दावे खरे असल्या बद्दलचा प्रतिज्ञा लेख लिहून त्यावर अर्जदारानें सही केली असावी.

जे सावकार दुरचे रहाणारे असतील त्यांनीं आठ आण्याच्या स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशियल ऑफिसरा पुढे तिच्या खरेपणाविषयीं शपथ लिहावी आणि ती यादी टपालांतून कोर्टास पाठवावी म्हणजे ते दावे रजिष्टरीं दाखल होतील. कळावें तारीख १८ माहे येप्रील सन १८९० इसवी०

Richard Macgill

नादारी कोर्टाचे

जज्ज

---

वर्तमानसार

अद्भुत गुणकारी मणी—हा मणी मूळ हिंदुस्थानांत मुंबई येथें एका मनुष्या पाशीं होता. तो एका इंग्रज मनुष्यास मिळून त्याच्या कडून अमेरिकेस गेला आणि तेथें काळ्या दाढेंतून मनुष्यें सोडविण्याचें काम आज सुमारें १५० वर्षें तो करीत आहे. अशीं कितो रत्नें हिंदुस्थानांतून परदेशीं जाऊन हिंदुस्थान निस्तेज झाला असेल हे एक परमेश्वर जाणे.

अस्तु इ. स. १७४३ मध्यें हिंदुस्थानांतून एक जहाज उत्तर कारालिनास गेलें त्यांत एक प्रवाशी होता. तो आजारानें मरणोन्मुख झाला होता. त्यास मि. गिबसनच्या पणजानें आपल्या घरीं नेऊन औषध पाणी देऊन व त्याची खाण्यापिण्याची उस्तवारी ठेवून बरें केलें. बरा होऊन तो स्वदेशीं यावयास निघाला तेव्हां अंशतः तरी उपकार ऋण फेडण्या साठीं त्यानें तो गिबसन याच्या पणजास दिला आणि सांगितलें कीं, रक्त बिघडण्याच्या प्रत्येक रोगांत हा अत्यंत गुणकारी आहे ह्मणजे पिसाळलेलीं कुत्रीं मांजरें विषारी सर्प, विंचू वगैरे यांच्या दंशावर हा मणी हें रामबाण औषध आहे सबब हा जवळ ठेवून याचा तुह्मी उपयोग करावा. आपोआप देवी येतात त्यावर हीहा उत्तम गुणकारी आहे असें सांगून यजमानाचा निरोप घेऊन तो मनुष्य चालता झाला.

ह्या मण्याचा रंग काळसर जरा आहे. ह्या मण्याचे जे गुण सांगितले त्याची मालकानें निवळ थट्टा केली व तो मणी तसाच पडला होता. पुढें एके दिवशीं मि. गिबसन यांच्या कुटुंबा पैकीं एका मनुष्यास खुळखुळा साप चावला. त्याला वांचविण्यासाठीं शक्य तितके उपाय करून मंडळी थकली, व दंश जहालेला मनुष्य मरणार असें ठरलें. इतक्यांत त्या मण्याचा काय पराक्रम आहे तो पहा असें एक मूल ह्मणालें. तेव्हां दंश झालेल्या जागेवर एक लहानसें छिद्र पाडून तेथें तो मणी लावला. लावल्य बरोबर तो तेथें सपाटून चिकटला त्या बरोबर अजारी मनुष्यानें कुडींतून जीव जातो अशी एक मोठी किंकाळी ठोकली. मणी लावल्या पासून एका मिनिटाच्या आंत मण्याचा काळसर पणा नाहींसा होऊन तो हिरवा झाला. नंतर तो काढून स्वच्छ धुऊन पुन्हं लावला. या प्रमाणें दंशांतलें विष नाहींसें होई पर्यंत तो मणी जखेमस चिकट होता विष नाहींसें होण्या बरोबर तो चिकटेनासा झाला विष नाहींसें झाल्यावर थोडा वेळ त्या मनुष्यास गाढ निद्रा लागली. झोपेंतून जागा झाल्या बरोबर तो मनुष्य चांगला हुशार झाला. पुढें तो ३० वर्षें पर्यंत जगला होता या प्रमाणें या दगडाचें महत्त्व वाढलें.

पुढें हें कुटुंब कोलंबिया येथें रहावयास गेलें. तेथें लांब लांबून ह्या मण्याच्या गुणा साठीं लोक येतात. एकदां एका बाईस देवी काढल्या होत्या. ज्या गाईच्या लसीपासून देवी काढल्या ती गाय पिसाळलेली असल्य.-मुळें देवी काढलेली बाई ही पिसाळली तीस ही ह्या मण्यापासून उत्तम प्रकारचा गुण आला. पिसाळलेलीं कुत्रीं मांजरें चावलेली माणसें विषारी सर्पानें दंश केलेलीं माणसें, विंचवाच्या दंशानीं पिडित झालेलीं माणसें इत्यादिकांची यात्रा गिबसन यांच्या घरीं जमते दंश झालेल्या माणसाच्या अंगांत धुगधुगी असली आणि त्याची व मण्याची गांठ पडली ह्मणजे तो मनुष्य मरत नाहींच असा या मण्याचा अद्भुत प्रभाव आहे.

हा सगळा मजकूर अमेरिकेंतल्या एका प्रख्यांत पत्रांत छापलेली आहे. त्या पत्रानें या मण्याचा अत्यंत गौरव केला आहे तो त्य मण्याच्या अद्भुत गुणास अगदीं योग्य आहे. अमेरिकेतील अत्यंत सुधारलेल्या वैद्यकांस ही ह्या मण्याचा अद्भुत गुण पाहून वारंवार अत्यंत नवल वाटतें. "बहुरत्ना वसुंधरा" असें जें ह्मणतात तें यथायोग्य आहे असें ह्या हकीकतो वरून उघड दिसतें. हा मणी जात्याच पाषाण आहे किंवा तो कृतीनें तयार केला आहे याबद्दल कांहीं हकीगत या पत्रांत दिली नाहीं. ही मोठ्या दुःखाची गोष्ट होय. सुधारलेल्या अलीकडच्या वैद्यकास ज्या मण्याच्या गुणाबद्दल अद्भुत कौतुक वाटतें त्याच्या अंगीं असे अद्भुत गुण असक्या एका कारणानें आले असे तर्क बांधण्यास हा तें नवें वैद्यक समर्थ नाहीं असें अद्भुत रत्न हिंदुस्थानांत होते. त्या मण्याच्या आंगचा प्रभाव अत्यंत शोधकपणानें हिंदुलोकांनीं शोधून काढून त्यापासून मनुष्यांचे सुख वाढविण्याची सोय केली ही फारच मोठी गोष्ट होय. शु. सू.

इराणांत तंबाखू विकण्याचा मक्ता एका इंग्लिश कंपनीला मिळाला असें समजतें.

इश्कखान आफगाणिस्थानावर स्वारी करणार असें व्हियन्ना येथें समजलें आहे.

गेल्या ४० वर्षांत ज्या नामांकित लढाया झाल्यां त्यांचा एकंदर खर्च सुमारें ३ खर्व रुपये झाला असा अजमास आहे.

पारिसमध्यें एक स्विस मुलगी आहे तिला हात नसतांना ती पायांनीं फार सुरेख रीतीनें तसबिरी रंगविते.

न्यू साऊथवेल्स येथें एक सोन्याचा मोठा सबंध तुकडा सापडला त्याचें वजन ६०० रतल असून त्याची किंमत सुमारें ३ लक्ष रुपये आली. इतका मोठा सोन्याचा तुकडा कधीं ही सांपडला नव्हता. सु० प०

सन १७८० त पहिलें वर्तमान पत्र प्रसिद्ध झालें.

सन १८५४ त कलकत्त्यास टेलिग्राफ नेमलें

सन १५८९ त हिंदुस्थानांत तंबाखु आला.

सन १३३०त बंदुकीची दारू बनली.

सन १६६३ त इंग्लंडाहून कांच आली.

सन १००० त इंग्लंडात कागद बनले.

सन १४७८ त छापण्याचें यंत्र निघालें.

स्वीडन कडे दिनमान १८॥ तास पर्यंत वाढतें.

बेडूक पांच वर्षांचा झाला म्हणजे तारुण्यांत येतो.

एका फ्रेंच कारागिरानें कांहीं कृतीचे पक्षी तयार केले आहेत त्याचे पंख ३३ इंच लांबीचे असून, ते वर २५ फूटपर्यंत खऱ्या पक्ष्यां प्रमाणें विहार करीत असतात. फ्रेंच लोकांची तरी कसबाच्या कामांत कमालच आहे जें जें पाहवें व ऐकावें तें अधिकच! न्या० सिं०

पुनः नोकरीवर नेमण्याचा हुकूम झाला—काफडे प्रकरणांत बरतर्फ झालेले रा० यशवंत बल्लाळ तांबे बी. ए. यांस हिंदुस्थान सरकारच्या हुकुमावरून पुनः नोकरीवर नेमण्याचा ठराव झाला. बरतर्फ झालेल्या मामलेदारांनीं हिंदुस्थान सरकारास अर्ज केले होते त्याप्रमाणें रा० तांबे यानीं ही पुर्वीं अर्ज केला होता पण त्या अर्जांचा निकाल इतर अर्जदारांप्रमाणेंच नास्तीपक्षीं झाला होता. असें असून पुनः त्यांस नोकरीवर ठेवण्याचा हिंदुस्थान सरकारचा हुकूम कसा झाला याचें कित्येकांस कदाचित् आश्चर्य वाटेलें. परंतु रा० तांबे यांच्या संबंधानें हिंदुस्थान सरकाराकडे प्रथम जेव्हां मुंबई सरकारांतून प्रकरण गेलें तेव्हां आपण दिलेला अभिप्राय चुकीचा होता व तशी चुक अमुक अमुक कारणांनीं झाली असें मुंबई सरकारानें स्पष्टपणें कबूल करून तांबे यांस नोकरीवर ठेवण्याविषयीं हिंदुस्थान सरकारांस शिफारस केली व त्यावरून रा० यशवंत बल्लाळ तांबे यांस सरकार नोकरी देण्याचा ठराव हिंदुस्थान सरकारानें केला असें समजण्यांत आलें आहे.

मुंबई पोलिसानें कित्येक रशियन लोक कैद केल्यावरून रशियनपत्रें त्या पोलिसास दोष देत आहेत.

अफगाणिस्थानच्या राज्यावर वारसा सांगणारा इषाकखान यानें बुखाऱ्याच्या सरहद्दीवर अफाट सैन्य गोळा केलें असून तो लवकरच हल्लींच्या अबदुलरहमान अमिरावर स्वारी करणार आहे असें सांगतात.

## जाहिरात.

### पाक.

सालंमिश्री पाक घेतला असतां धातुची मजबुती होऊन शक्ती वाढते दर दिवस ३ तोळे प्रमाणें ४१ दिवस घ्या.

बदाम पाक घेतला असता, मस्तकांतील उष्णता दूर होते डोळ्यास थंडावा येतो धातु पुष्ट होते बळयेते दरदिवस ३ तोळे प्रमाणें ३० दिवस घ्या.

गोखरूचा पाक घेतला असतां मूत्र मार्गांत होणारी आग, तिडका, जुनापरमा, मेहरोग मूत्र पुष्कळ आणि गढूळ होते तो हे रोग दूर होऊन धातु शुद्ध होते बळ येतें स्त्री संगाची इच्छा होते दर दिवस ३ तोळे प्रमाणें ६० दिवस घ्या.

कोहळे फळाचा पाक घेतला असतां डोळ्यास येणारी अंधारी भोवळ पिताचे उपद्रव हे रोग दूर होऊन रक्तशुद्ध होते धातु पुष्ट होते बळयेतें दरदिवस ३ तोळे प्रमाणें ४१ दिवस घ्या.

वर लिहिलेले पाक मागविण्याची रीत

| तोळे | किंमत रुपये | पोष्टेज |
| --- | --- | --- |
| १६ | १ | ॰९ |
| ३२ | २ | ॰१३ |
| ४८ | ३ | ॰१३ |
| ६४ | ४ | १॰१ |
| ८० एकशेर | ५ | पोष्टेज माफ. |

पत्ता गजानन बाळकृष्ण वैशंपायन पेठ सदाशिव पुणें.

### नोटीस.

शापुरडा वल्लद हिरामण सोनार राहणार जयपूर ता० मलकापूर यांस नोटीस देणार भगवान वल्लद जयराम सोनार राहणार वाडेगांव, यांजकडून नोटिशीनें असें कळविलें जातें कीं आमचा पुतण्या नामे शिवराम वल्लद सोनाजी सोनार राहणार वाडेगांव हा आम्हापासून वेगळा निघून त्यानें आपली सर्व जिनगी वगैरे घेऊन तुम्ही त्याचे सासरे ह्मणून व तुह्मी त्यांस बोलाऊन नेऊन व त्याची सर्व जिनगी वगैरे आह्मापासूनं उभयतां घेऊन गेला व सदरहू शिवराम वल्लद सोनाजी याणें आमचे येथील बळीराम वल्लद विठोबा महाजन याचे देणें रुपये ८४॰८॰६ हे ते ह्मणून आह्मी ज्यावेळीं तुह्मी उभयतांनीं येथुन जिनगी वगैरे घेऊन गेला त्यावेळी तुह्मी आह्मास कागद पाटीलपांडे यांच्या समक्ष करून दिला आहे कीं सदरहू शिवराम वल्लद सोनाजी यानें ज्याचें देणें घेणें असेल त्याजबद्दल सर्व प्रकारानें जबाबदार आहो आह्मांकडे कांहीं संबंध नाहीं असें असून सदरील बळीराम वल्लद विठोबा महाजन यानीं आह्मांवर रुपये ८४॰८॰६चा हुकुमनामा मिळवून रुपये आमच्यापासून घेतले याजकरितां तुह्मास असें कळविलें जाते कीं सदरहू हुकुमनाम्याचे रुपये ८४॰८॰६ तुम्ही आम्हास नोटीस पावल्यापासून १५ दिवसांत आणून द्यावे असें केलें नाहीं तर तुम्हावर फिर्याद करून ह्या नोटिसाच्या खर्चासुद्धा अखेरनिकाल होईपर्यंत जें नुकसान होईल तें भरून घेतलें जाईल ह्मणून दिली नोटीस सही ता० १२ माहे एप्रील सन १८९० इ०

(सही)

भगवान वल्लद जयराम सोनार

दस्तुर खुद्द

### नोटीस.

नोटीस देवीदास परशराम सकदेव राहणार वाशीम यांस खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं मौजे गोंदेश्वर ज्यागीर येथील शेत सरवई नंबर ७१८ ची जमीन व विहिर तुमचे जवळ संभु व नागापा कानडा याणी गहाण ठेवली होती त्याबद्दल व्याजा सुद्धा रुपये ८०० आठशे सुकलाल मारवाडी याचे येथून तुम्हास दिले त्याबद्दल तुमची पावती सुकलाल जवळ आहे. तेव्हां तुमचा गाहणावर कांहीं एक हक्क राहिला नाहीं. असें असतां तुह्मी तेथील विहिरीचे पाणी पैसा घेऊन गिरणीस देता याबद्दल तुह्मास टपालमार्गें नोटीस केली तुह्मी न घेता परत केली यामुळें जगप्रसिद्धीनें तुह्मास कळविण्यांत येतें कीं सदरील विहिरीचें पाण्याबद्दल तुह्मी दिलेले तारखेपासून ह्मणजे तारीख १-२-९० पासून अखेर गिरणीचे काम बंद होईपर्यंत दररोज २ रुपये प्रमाणें द्यावे लागतील याप्रमाणें न दिल्यास नोटीस मान्य केली असें समजून कोर्टे मार्फत दावा करून पैसा घेतला जाईल व नोटिशीस जो खर्च लागल तो देणें पडेल. कळावें तारीख १९ माहे एप्रील सन १८९० इ०

(सही)

गणेश रघुनाथ व देवराव हनमंत जाहागिरदार मौजे गोंदेश्वर प० वाशीम दस्तुरखुद्द.

☞ हें पत्र अकोला येथें कै. वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सहामाही २ ०८
सालअखेर " ७ " १०८
किरकोळ अंकास........................०४

नोटीशीबद्दल.
ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस ..........०१

Six monthly..............
Single copy...........................4as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

Advertisements
Below 10 lines... 2R
per line over10...4 as
Repetition per line3as

VOLXXIV AKOLA MONDAY APRIL 28 1890 NO 16

वर्ष २४ अकोला सोमवार तारीख २८ माहे एप्रील सन १८९० इ० अंक १६



## जाहिरात.

### पाक.

साळंमिश्री पाक घेतला असतां धातुची मजबुती होऊन शक्ती वाढते दर दिवस २ तोळे प्रमाणें ४५ दिवस घ्या.

बदाम पाक घेतला असता, मस्तकांतील उष्णता दूर होते डोळ्यास थंडावा येतो धातु पुष्ट होते बळयेते दरदिवस २ तोळे प्रमाणें ३० दिवस घ्या.

गोखरूचा पाक घेतला असतां मूत्र मार्गात होणारी आग, तिडका, जुनापरमा, मेहरोग मूत्र पुष्कळ आणि गढूळ होते तो हे रोग दूर होऊन धातु शुद्ध होते बळ येते स्त्री संगाची इच्छा होते दर दिवस ३ तोळे प्रमाणें ६० दिवस घ्या.

कोहळे फळाचा पाक घेतला असतां डोळ्यास येणारी अंधारी भोवळ पिताचे उपद्रव हे रोग दूर होऊन रक्त शुद्ध होते धातु पुष्ट होते बळयेतें दरदिवस ३ तोळे प्रमाणें ४५ दिवस घ्या.

वर लिहीलेले पाक मागविण्याची रीत

| तोळे | किंमत रुपये | पोष्टेज |
|---|---|---|
| १६ | १ | ०९ |
| ३२ | २ | ०१३ |
| ४८ | ३ | ०१३ |
| ६४ | ४ | १०१ |
| ८० एकशेर | ५ | पोष्टेज माफ. |

पत्ता गजानन बाळकृष्ण वैशंपायन पेठ सदाशिव पुणें.

### स्वप्नप्राप्त

नेत्र रोगाची अव्यर्थ महौषध यांनी फूलो टेडर प्रभृति नेत्ररोग [illegible] दिवसांचे जुने असले तऱ्ही १० दिवसांत बरे होतील

मूल्य टपालसह २I.

पंडित दामोदर वैद्य
२५ बांसतला ष्ट्रीट बडा बजार
कलकत्ता


## पत्रव्यवहार

ह्या सदरा खालील मजकूर पत्र कर्त्यांच्या मतास मिळूनच असेल असें समजूं नये.

पिंपळगांव राजा १८-४-९०

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस

राव, सांप्रत आलेली नवीन तापाची सांथ फारच जारीनें सुरूं आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. दिवसा फार गर्मी होत असते व रात्री थोडा थंडावा भासतो. इतर रोगराई नेहमीं प्रमाणें आहेत. मधून मधुन अभ्रें ही येत आहेत. काल रात्रीं पिंपळगांव व नांदुरा या दोहोंचे मध्यंतरी चांगला गाराचा पाऊस पडला.

आमचे पहाण्यांत बहुतेक इं. म. स्कु. तर सुट्या मिळतात परंतु मराठी स्कुलाला नाहीं उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळें एकवेळ दोन प्रहरीं सुट्टी मिळते. आमचे गांवीं तापाची साथ जोरानें सुरूं आहे. शाळेंत एकंदर मुलाची संख्या सर्वोंशेपक्षां जास्त आहे आणि या उष्णतेमुळें व तापाचे अजारामुळें मुलें फारच फार कमी हजर असतात असें असून व याना सरकारातून एक वेळ सुटी देण्याची परवानगी असून येथील शाळेचे अधिकारी मुलाना सुटी कां देत नाहींत हे अह्मांस समजणें कठीणच आहे. कदाचित पिंपळगांव राजा येथील शाळेची सुधारणा व्हावी व त्यापासून आपलें कल्याण व्हावें या हेतुनें अभ्यास जोरानें चालवावा असा अंदाज करावा तर प्रत्येक वर्गांत मुलांची संख्या १८-२० व हजर ५-६ असा प्रकार. आमचे अधिकारी मास्तर साहेब याची सर्व मास्तरावर कडीच आहे. करितां आह्मी विनयपूर्वक ह्याच मारुजा करितो कीं आमचे अधिकारी मास्तर साहेब जर शाळेला एक वेळ सुट्टी देतील तर त्यापासून मुलाना व सर्वांना सुख होईल.

आमच्या दयाळू महाराणी साहेब यांचे राज्याखालीं आह्मी फार सुखी आहो. आह्माला फारचफार सुख आहे परंतु मध्यंतरी गावांत जे सरकारनीं अधिकारी नेमिले आहेत त्यांचे कडून तर आम्हांस बिलकूल सुख नसून उलटा त्रास मात्र आहे. कसा म्हणाल तर आमचे गावांत तापाची साथ जोरानें सुरू आहे तर गावांतील रोगराई जाण्या करिता गावांतील हवा स्वच्छ राहीली पाहिजे असें असून या गावांत इतकी दुर्गंधी आहे कीं गावातील वरांचे आसपास ज्या पडीत जागा आहेत त्या नेहमी अगदीं दुर्गंधीनें युक्त असतात गांवांतील रस्ते साफ ठेविण्या करितां तीन भंगी आहेत ते बहुत करून कांहीं दिवसांनीं केव्हां तरी सडका झाडतात. गावाचे नदीचें पाणी स्वछ असावें तर गांवपासून जवळच कोळशाची भट्टी अगदीं नजिक आहे त्या मुळें सकाळ पासून सायंकाळ पावेतो स्वच्छ हवेचा संस्कार व्हायचाच नको. नदींत हमेशा आंबाड्यानें व मासोळ्या मारण्याचे हेतुनें टाकलेल्या थोरानें व कोळसे विझविण्याचे योगानें झालेल्या काळ्या पाण्यानें व भट्टीवर टाकण्या करिता भिजत घातलेल्या सनानें अगदी युक्त असत या मुळें नदींत स्नान व मुखमार्जन केलें असतां आजार तावडतोब विलंब न लागता प्राप्त होतो आजार होऊं नये म्हणून येथें आफिसर, लोकल कमेटि, व चौकीदार हे सर्व इतकी मेहनत करित असतात कीं आज ५ आजारी झालेत उद्ईक दोन ज्यास्ती काय करावे गरिबाची दाद लागते कोठं? आपण होऊन एखादा गरीब मनुष्य म्हणायाला गेला तर गाव मोंगलाई थाटाचे शिव्या व मार खावा कोणी?

अशी ही वदंता उठली आहे कीं एथील पोष्ट मास्तर साहेब टप्पा आला म्हणजे लोकांचे पत्रांत काय मजकूर आहे हा वाचून पाहातात अशा बद्दल एका गृहस्थाची व मास्तर साहेब यांची चांगली चकमक झाली असें ही लोक बोलतात. हें खरें असेल तर तें मास्तर साहेब याना उचित नाहीं. क्षुल्लक गरिब मनुष्य असला म्हणजे कधीं कधीं निभाव होतो परंतु चांगल्याशी गांठ पडली म्हणजे परिणाम फार दुर्घट होत असतो हें समजूत दारास निराळें सांगणें नलगे.

आपला
"क्ष"

भर बाजारांत जुलूम

पिंपळगांव राजा. तारीख १९ माहे एप्रील सन १८९० —

रा. रा. वऱ्हाड समाचार कर्ते यांस

विनंति विशेष एका + + या नावाच्या गर्भ श्रीमान शेटला एका गरीब मुसलमान आंधळ्या मनुष्या कडे पांशेरी गुळाची किंम्मत घेणे होते त्याच्या मोबलांत शेठ साहेबांनीं त्या गरीबावर इतका जुलूम केला कीं त्याचें डोक्यावर अजमासे दहाबारा शेर वजनाचा धोंडा देऊन त्यांस सरासरी शंभर कदम पर्यंत इकडून तिकडे आर्धा तास डबल दिली. त्या वेळेस त्या आंधळ्याची स्थिती कशी झाली असेल हें सांगायास नको. मी आजपर्यंत बरेंच देश पर्यटन केलें परंतु असें मोंगलाइ थाटाचें कृत्य कोठेंच दिसण्यांत आलें नाहीं. अशा कल्पित गर्भ श्रीमान शेटचें इन्नज सरकारच राज्यांत केवढे धाडस व केवढा परोपकार पहा.

आपला
एक फिरस्ता

उमरावती ता० २३।४।९०

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस

सा. न. वि. वि. मी एके दिवशीं रात्रीं नित्य नेमा प्रमाणें ८-९ वाजतां जेवण आटोपून व नंतर नित्यनेमा प्रमाणें श्रीमद्भागवत वाचल्या नंतर सुमारें ११-११॥ वाजतां बिछान्यावर जाऊन पडलों. उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळें उष्मा फारच होत होता. चिलटांचा एक सारखा कर्णजप चाललाच होता म्हणून झोंप कांहीं केल्या येईना. शेवटीं बिछान्यावर उठून बसून जवळच आजकालच्या गोष्टींचें पुस्तक पडलें होतें तें घेऊन वाचीत बसलों. त्या मध्यें विनायकरावच्या भोळ्या व सुशील अशा स्वभावाचे दुष्ट गोविंद रावाच्या कुसंगती मुळें केवढे स्थित्यंतर झालें व व्यसनाची केवळ मूर्तीच कीं काय अशा मद्यासक्तते मुळें व रोगाची केवळ खाणीच कीं काय अशा वेश्यासंगामुळें बिचाऱ्या विनायक रावाच्या शरीराची शोचनीय अवस्था झाली इ० गोष्टींचा विचार करतांनां मनांत एकदम विचार उभा राहिला कीं आपले लोक मुद्धां या सुरादेवीच्या सेवेत तत्पर अहित तर यांची सुद्धां उतार वयामध्यें अशीच शोचनीय स्थिती होऊन मृत्युमुखीं पडणार अं! हरहर! देवा सोडीव या आमच्या देशाला या संकटांतून! या प्रकारच्या विचारांनीं मनास फारच वाईट वाटलें. असो असें करतां करतां सुमारें १-१॥ वाजण्याच्या सुमारास थोडासा डोळा लागला व निजावयाच्या वेळेस चित्त अस्वस्थ असल्या मुळें गाढ झोंप न लागता स्वभावत स्वप्नें पडूं लागलीं. त्या पैकीं एक स्वप्न चतुर्थ प्रहरीं पडलें तें फारच विलक्षण होतें

एक चट्टा पट्टा केलेली विधवा स्त्री— कारण तिच्या मस्तकी रत्नखचित मुगुट होता पण कपाळी कूंकू नव्हतें— एकदम मजजवळ येऊन मला म्हणाली कीं 'मुला तूं मला ओळखिलेंस काय? अरे मी महा प्रसिद्ध अशा सुधारक लोकांची देवी आहे. पहा माझे भक्त माझे सेवेंत रात्रं दिवस तत्पर असतात व माझ्या बांधवांचा ही ते अत्यादर करितात. मग मी विचारलें कीं 'आपलें नांव काय व आपलें बांधव कोण,? त्या नंतर ती ह्मणाली ते तुला पुढें समजेल. चमत्कार पहावयाचा असल्यास मजबरोबर चल' मला ही ती स्त्री कोण तिचे बांधव कोण हें पाहण्याची उत्कंटेच्छा प्राप्त झाल्या मुळें मी रुकार दिला. त्या सरसें तिनें मला एका हातानें वर उचलिलें व अंतरिक्ष मार्गानें घेऊन चालली. पत्रकर्ते महाराज, या वेळेस भयानें व आश्चर्यानें माझी काय स्थिती झाली असेल याची आपणच कल्पना करावी. मला वाटे कीं या बाईनें जर येथून सोडून दिलें तर भरली आज आपली पूरी शंभर वर्षें. परंतु निरुपाया मुळें स्वस्थ बसावें लागलें. असो. या प्रमाणें वायुवेगानें मार्ग क्रमीत असतां ती देवी खाली उतरली व मलाही तिनें उभें राहण्यास आज्ञा केली. तदंनतर ती ह्मणाली ' हें पाहिलेंस कां समोरचें शहर. याचें नांव अमरपुरी. या समोरच्या उपवनांत संचार कर ह्मणजे तुला मद्भक्ती परायण लोकांचीं मज विषयीची श्रद्धा दिसून येईल. माझ्या प्रभावा मुळें तूं कोणासही दिसणार नाहींस.' या प्रमाणें सांगून ती जगदंबा अदृश्य झाली तदंनतर तिच्या आज्ञे प्रमाणें मी आंत गेलों प्रवेश करण्या बरोबर जाई जुई बटमोगरा आदिकरून पुष्प वृक्षाच्या सुवासा मुळें मनाला अत्यंत समाधान वाटलें. कांहीं वेळ तेथें विश्रांती घेऊन स्वस्थ चित्त झाल्यावर दिवाणखान्याचा जिना चढून वर गेलों. तेथें जाऊन पहातों तो सुस्वर व चित्तवेधक असें मंजूल गायन चाललें होतें. दाराशी उभा राहून डोकावून पाहूं लागलों तों तेथें मंडळीचा समाज दिसला. कित्येकांच्या चर्ये वरून, पोशाखा वरून व ऐटीवरून हे महा विद्वज्जन असावेत असें वाटत होतें. कित्येकांच्या चर्ये वरून हे मध्यम शिक्षणाचे लोक असावेत असें दिसत होतें. व कित्येकांच्या लांब घेऱ्यावरून व वाजवी पेक्षां फाजील ऐटीवरून हे कोणी तरी प्रसिद्ध तमासे वाले किंवा असच कोणी लोक असावेत असें दिसत होतें. कांहीं वेळ गाणें झाल्यावर ' कोणास तहान

लागली असल्यास आंत जाऊन पाणी प्यावें व थोडासा फराळ ही करावा ' असें त्या पैकीं एकजण ह्मणाला. हा गृहस्थ दूर असल्यामुळें नीट दिसला नाहीं. असो या प्रमाणें एकेकजण उठून समोरच्या खोलींत पाणी पिण्यास जाऊं लागला. पत्रकर्तेराव, कर्मधर्मसंयोगानें मलाही याच वेळेस तृषा लागली व त्यांच्या त्या भव्य लावलेल्या आडव्या गंधा वरून हे ब्राह्मणच आहेत असा निश्चय करून मला ही पाणी पीण्यास जाण्याची इच्छा उत्पन्न झाली, व लागलीच कोणाच्या आगारी आंग न लावतां मीही आंत गेलो. आंत जाऊन पहातों तों येथें तांब्या पंचपात्री वगैरे कांहीं नसून त्याचे जागीं एक टेबल व त्यावर लाल पाण्यानें भरलेल्या शिश्या व काचेचे कांहीं प्याले एवढेंच कायतें सामान होतें. ती मंडळी शिशीचे बूच काढीत तेव्हां फट. असा अवाज होत असे व त्यांतील रक्त जल पेल्यात ओतून प्रत्येक जण पीत असे तो सर्व प्रकार पाहून माझ्या पोटांत धस्स झालें व मला घेरी येऊन मी पडणार इतक्यांत त्या दयाळू देवीनें मला उचललें व ती मजसह अंतरिक्षांत निघून गेली. तदनंतर मला एका सुंदर उपवनांत उतरवून कांहीं गोड फळें खावयास दिलीं व स्वच्छ वाहणाऱ्या ओढ्यांतलें पाणी प्राशनास दिलें. ती फळें खाऊन पाणी पिल्यावर मला बरीच हुषारी आली नंतर मी हात जोडून ह्मणालो ' हे जगज्जननी तुझ्या भक्तांची त्वत् सेवा तत्परता पाहिली परंतु तुझे बांधव ' कोण हें अद्याप समजलें नाहीं! इतकें ऐकून देवीनें किंचित हास्य वदन केलें व म्हणाली ' होय ' तेही दाखविते. चल, तदनंतर कांहीं एक वनस्पती मला हुंगावयास देऊन फेकून देण्यास सांगितलें, व पुनरपि अंतरिक्ष मार्गीनें घेऊन चालली. जातांजातां त्याच शहराच्या मोठ्या दरवाज्या पाशीं एका उंच घराच्या गच्चीवर मला ठेवलें, व ' पहा आतां चमत्कार ' असें बोलून अंतर्धान पावली मी तेथें पाहतों तों तेथें सुमारें १९-२० टेबलें नीट व्यवस्थेनें वर्तुळा कार मांडली होतीं व वर चिनी ताटां मधून चित्र विचित्र रंगाचें पदार्थ वाढले होते. व त्या टेबलावरच चमचे, सुऱ्या काटे + आदि करून पश्चिमात्य भोजनोपयोगी शस्त्रें पडलीं होतीं. त्या वरून मला असें वाटलें कीं हा कोणातरी युरोपियन अंमलदारा प्रीत्यर्थ केलेला भोजन समारंभ असावा. इतक्यांत जिन्यांत कर्कर असा बुटाचा आवाज ऐकूं आला त्या वरून मला वाटलें कीं ज्या अंमलदारां प्रीत्यर्थ हा समारंभ के[illegible]त आ[illegible] असावा परंतु हें सर्व अनु[illegible] खोटें ठरलें. व पाहातों तो कांहीं हिंदु [illegible] गृहस्थ एका मागून एक येऊ लागले. हे गृहस्थ माझ्या पाहाण्यांतले असावेत असें वाटल्या वरून निरखून पाहिलें तों पूर्वीच्या बंगल्यात पाहिलेली मंडळी दिसून पडली. नंतर सर्व पदार्थांचें परिसेवन झाल्यावर भोजनास आरंभ झाला. हा सर्व थाट पाश्चिमात्य होता. थोड्या वेळानें त्या मंडळींतून कोणी ' फाउल आणा ' कोणी ' ड्रायफिश आणा ' कोणी ' बीफ आणा ' असें ह्मणूं लागले. तदनंतर कांहीं वेळानें मंडळींतून कोणी व्हिस्की कोणी शांपेन कोणी कान्येक मागूं लागले. त्यांचा तिकडे पानसुपारीचा थाट होत आहे इतक्यांत ती जगदंबा दृश्य झाली. व तिनें एक वनस्पती हुंगावयास दिली. ती हुंगताच मला घेरी आली इतक्यांत " आतां उठावयाचें नाहींकां ! आठ वाजावयाची वेळ आली " असें शब्द कानीं पडलें. उठून पाहातों तो आमचे कुटुंब. उठून बसल्यावर रात्रीच्या स्वप्ना विषयीं सखेदाश्चर्य वाटून दुःस्वप्न सत्वता निरसनार्थ राम राम राम असा जप करून शौचमुखमार्जनादि विधी आटोपले. व प्रथम देवघरांत जाऊन ईशापाशी स्वप्न कथन केलें. व अशीं स्वप्नें पुन्हा न पडण्या विषयीं प्रार्थना केली. तदनंतर हें चमत्कारिक स्वप्न आपल्या वाचकांच्या नजरेस पडावें या हेतूनें आपणाकडे पाठविलें आहे. याचा आपण स्वीकार कराल अशी दृढ आशा बाळगून आपली रजा घेतों. कळावें लोभ असावा ही विनंती.

आपला

उमरावतीकर ' क्ष '

---

परतवाडा ता. २४।४।९०

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस.

सा. न. वि. वि. उन्हाळा कडक भासत आहे यंदा उन्हाळा विशेश दिसतो. पारा १०४।१०९ पर्यंत चढला आहे.

ता. १९ एप्रील रोजी शनिवारीं रात्रीं मेहरबान निकोलेट साहेबांस पानसुपारी झाली जागा बरीच चांगली सुशोभित केली होती मंडळीस आमंत्रण चिठ्या पूर्व दिवशींच दिल्या गेल्या असल्यामुळें ते दिवशी मंडळी सात वाजे पासून जमत चालली होती. मंडळीचा समाज २०० शेवर होता मेहेरबान निकोलेट साहेब समारंभाचे ठिकाणी नऊ वाजतां आले साहेबांनीं मंडळीचे सलाम घेतल्या नंतर राजमान्य राजश्री गणपतराव सहस्त्रबुद्धे वकील यांनीं सुरस व चटकदार अशा रितीनें थोडेसें भाषण करून समाज भरविण्याचा उद्देश कळविला. नंतर साहेब बाहादूरांनीं भाषण केलें त्यातील गोषवारा येणें प्रमाणें "मंडळीनीं मला जातांना भेट दिली या बद्दल मी आभारी आहे माझे स्वजातीयाशी जितकें मित्रत्व..आहे तितकेंच माझे मित्रत्व तुम्हाशी आहे व पुढें ही ठेवीन अशी खात्री आहे." नंतर पुष्पगुच्छः, हार तुरे, पानसुपारी अत्तर गुलाब होऊन समाज विसर्जित झाला. या वेळीं आम्हास निमंत्रण असल्यामुळें आम्ही ही येथें गेलो होतो परंतु एक चमत्कार आमचे दृष्टीस पडला कीं बहुधा सर्व मंडळींचीं मुख कमलें सूर्य विकासिनी कमला प्रमाणे प्रफुल्लीत दिसत होतीं. पसंगास जें उचित तेंच बरें दिसते. पत्रकर्तेराव आम्ही वऱ्हाडातील पत्रकर्त्यांचे फार आभारी आहों कीं त्यांनीं शाळेंतील मुलांस वागविण्या संबंधानें बरीच ओरड केल्या मुळें आमचे येथील शिक्षक लोक जागे झाले आहेत. आणि मुलांचा त्या योगें उन्हांत जाण्या येण्याचा त्रास चुकला.

रा. रा. सदाशिवराव दामले हेडमास्तर हे येथें येऊन दाखल झाले व ते कामाचा चार्ज ता. २८ रोजी घेणार आहेत ते लौकरच एक वर्षाची फर्लो रजा घेणार आहेत असे ऐकितों. पत्रकर्तेराव पत्र बिस्तार फार झाला या बद्दल माफी असावी हे विनंती.

आपला

(X)

---

# वऱ्हाडसमाचार.

मिती वैशाख शुद्ध ९ शके १८१२

राजकीय सभांत सरकारी नोकरांनीं जाऊं नये किंवा कोणत्याही प्रकारें त्यांना मदत देऊं नये अशा बद्दल व्हाईसराय साहेबांचें एक सरक्युलर निघालें आहे तें हल्लीं आमचे वऱ्हाडांत ही लागूं केलें आहे. सदर्हू सरक्यूलर वाईट आहे असें आमचें मुद्दलीच ह्मणणें नाहीं. परंतु त्याचा अर्थ मात्र भलता होऊं नये व विनाकारण त्या पासून लोकांना त्रास होऊं नये अशी आमची इच्छा आहे. हें सरक्युलर उत्पन्न होण्याचें मुख्य कारण राष्ट्रीय सभा होय हें कांहीं सांगणें नको. हें सरक्युलर काढण्याचा सरकारचा मुख्य हेतु राष्ट्रीय सभेचा पाडाव करावा किंवा राष्ट्रीय सभा सरकारास नको आहे असा नसून खरोखर हिंदुस्थानचें लोकमत काय आहे हें पाहण्याचा आहे. सरकारी अंमलदारांचे अंग अशा प्रकारच्या सभेंत असल्या मुळें कित्येक वेळा असें घडून येतें कीं इतर लोक सरकारी अंमलदार किंवा इतर नोकर ज्याच्यापाशीं त्यांचा संबंध असतो त्यांच्या भितीनें किंवा वजनानें जी गोष्ट त्यांना अनुकूल नाहीं तिलाही अनुमोदन देतात व त्यांच्या भिडेवर वाटेल तसे पैसे देतात; व अशा प्रकारची स्थिती आह्मी नेहमी पाहत आहों. राष्ट्रीय सभे सारख्या महत्वाच्या सभेला अशा प्रकारचें अनुमोदन असावें व तिचा उत्कर्ष अशा प्रकारच्या मदतीनें व्हावा असा तिच्या उत्पादकांचा व हितचिंतकांचा मुळींच हेतु नाहीं. व त्या मुळें हे सरकारचें करणें अगदी तिला मोठें हितावह आहे. तरी कित्येक अज्ञान मंडळी त्या सरक्युलरचा वाटेल तसा अर्थ लोकांस भासवून देतील व लोकांचे मनांत त्या बद्दल भलतेच ग्रह उत्पन्न करतील व कदाचित् असें करणें त्यांना इष्ट ही असेल कारण प्रत्येक मनुष्यास आपला हेतु तो बरा असो किंवा वाईट असो तो कसा तरी तडीस न्यावा असें वाटत असतें व त्या प्रमाणें तो खटपटही करीत असतो. परंतु त्याचा खरा प्रकार पाहण्याचें काम लोकांचें आहे. राष्ट्रीय सभा सरकारच्या विरुद्ध नाहीं ह्या बद्दल दुसरा कांहीं पुरावा देण्याची जरुर नाहीं. आज पांच वर्षें सरकारी अमलांत ती जीवंत राहून तिनें जीं जीं कृत्यें केलीं आहेत व मागण्या केल्या आहेत त्या कोणच्या प्रकारच्या आहेत, सरकार त्यांना किती मान देत आहे. विलायतेंत त्या संबंधानें किति चळवळ सुरु आहे. मोठमोठे विद्वानांचें त्या बद्दल काय मत आहे ह्या वरून सहज लक्ष्यांत येईल.

अशा प्रकारच्या सरक्यूलराचा भलताच अर्थ होऊन वाईट परिणाम होण्याचा किती संभव आहे हें हल्लीं अकोल्यास सुरू झालेल्या चळवळी वरून सहज लक्ष्यांत येईल. रा. रा. मुधोळकर व जोशी विलायतेस गेले आहेत व त्यांच्या सन्मानार्थ येथें नेटीव जनरल लायब्ररींत मोठा टॉलेजंग पान सुपारीचा समारंभ झाला होता. हें सर्वांस सुविहीतच आहे. सदर्हू समारंभास गांवांतील बरीच मंडळी सर्व जातीची व धंद्याची आली होती. त्यांत कांहीं सरकारी नौकर ही होते. समारंभ कांहीं प्रकारचे ठराव करण्या करितां होता असें मुद्दलीच नव्हेंत व लोक ही आले होते ते कांहीं एक विशेष प्रकारचें काम करावयाचें आहे म्हणून आले होते असें नाहीं. मि. मुधोळकर व जोशी हे वऱ्हाडांत बरेच दिवसा पासून आहेत व आपला धंदा ही तें इकडे आज ७।८ वर्षी पासून करित आहेत. त्यामुळें पुष्कळ लोकांशीं स्नेह असें नातें आहे कीं त्यांच्या सन्मानार्थ मुळें आनंद व वियोगा मुळें दुःख वाटणें त्यांना सहज आहे व यामुळें ते लोक त्या प्रसंगास आले म्हणून त्यांनीं राजकीय सभेला मदत केली असें मुद्दलीच होत नाहीं. सभेंत जीं भाषणें झालीं त्या पैकीं कांहीं तर त्यांच्या वियोगा मुळें त्यांच्या इष्ट मित्रास व आप्त वर्गास काय दुःख होईल व तसेंच त्यांच्या जाण्या मुळें सामाजिक सुधारणेला किती मदत होईल वैगेरे प्रकारची झालीं त्यांत कांहीं जणांनीं हें राष्ट्रीय सभेच्या कामाला जातात वैगेरे ही बोलून दाखविलें तरी तितक्या शब्दा वरून ती राजकीयच सभा झाली किंवा सामाजिकच झाली किंवा स्नेही व आप्तवर्ग यांचे दुःख प्रदर्शक सभा झाली असें कांहीं म्हणतां येणार नाहीं. केवळ हे लोक आपला मोठा हिय्या करून व आपल्या इतर सर्व महत्वाच्या गोष्टी एकी कडे ठेवून इतक्या लांब केवळ लोक कल्याणार्थ आपल्या पदरचा पैसा खर्चून जात आहेत म्हणून त्यांच्या ह्या सद्गुणा बद्दल व सत्कार्या बद्दल त्यांना कांहीं तरी मान देऊन त्यांचे उतराई होण्या करितां मंडळी जमली होती. दुसरें कांहीं नाहीं तरी तेथें आलेल्या सरकारी नौकरांचीं नांवें डिपुटी कमिशनरच्या आफिसांतील एका कारकुनानें टिपून घेऊन कळविलीं आहेत त्या मुळें प्रत्येक अंमलदार आपआपल्या हाता खालच्या लोकांना जबाब विचारांत आहेत. कांहीं मंडळींनीं खरें खरें जबाब आहेत ते दिले आहेत व कांहींजण पुढें देणार आहेत तरी वरिष्ठ अंमलदार लोक ही सभा कशी होती या बद्दल चांगली माहिती करून घेऊन मग काय ते करितील. नाहींतर केवळ हो खुदावंत म्हणणाऱ्या लोकांच्या म्हणण्यावर भरवंसा ठेऊन आपला भलतांच ग्रह होऊं देणार नाहींत अशी आमची त्यांना विनंती आहे.

---

कित्येक युरोपियन लोक नेटीव लोकांना अगदीं पशुवत् समजतात. व त्यांना फार निर्दयपणानें वागवितात ह्या बद्दलची अनेक वेळा उदाहरणें घडून आलीं आहेत व घडताहेत. हल्लीं नुकतेंच असें समजण्यांत आलें आहे कीं एक सुतार मि. लाईट साहेब अ. इंजिनियर यांच्या विहीरीवर पाणी पिण्यास गेला होता. ती विहीर ह्मणजे अगदीं त्यांच्या घरांत आहे असें नाहीं तरी साहेबांना त्याच्या ह्या कृत्याबद्दल अगदीं राग येऊन बिचाऱ्यावर प्रथम दिवशीं बरेंच गाळी प्रदान झडलें तरी तितक्यानें राग शांत न होता दुसरें दिवशीं सदरहू इसमास आफिस मध्यें बोलावून नेऊन दोन चार तास ऐन भर उन्हांत उभा केला. वरील प्रकार खरो खरच घडला असें लोक सांगतात. शिवाय त्यानें पाणी पिण्यांत काय अपराध केला होता हें अह्माला अगदींच सम

जत नाहीं व जरी केला असें जरी मानलें तरी अशी शिक्षा देण्या बद्दलचा अधिकार साहेब बहादुराला कोणत्या कायद्यानें आला होता हें कळत नाहीं. अशा जर परस्परें शिक्षा व्हावयास लागल्या तर प्रत्येकाच्या घरीं एक एक फौजदारी कोर्ट बनेल!


## The Berar Samachar

MONDAY APRIL 28, 1890.


The report of the fifth Indian National Congress is a noble record of the highest political aspirations of the Natives of this vast country and clearly exhibits the methods employed by them to accomplish their most cherished desires. It sets out with a very carefully considered introductory article from the pen of Mr A. O. Hume, and gives detailed history of the doings of the great assembly during its session at Bombay. Its form is handy, matter very valuable and general "get up" so excellent as to do credit to any the oldest publisher at home. As one goes through its pages the sense of bending over a printed book is lost and there rises to view a large continent, as India is properly called, peopled by a race of men mighty in the past, patient in the eventful present and destined to all the glories of peace and triumphs of civilization in the future. A truly liberal policy of education has done its work of bringing about an awakening of the populace and as a natural consequence a spirit of enquiry, as abroad, carrying in its train a desire for improvement. All these are strictly guided by true loyalty and the means adopted are strictly constitutional. If even a very small portion of the literary skill employed in bringing out this publication were expended on the many administration reports annually issued in this country regarding them would be a pleasure and not a task as it is now often felt to be.

The introductory article opens with an extract from the speech of our distinguished countryman Honorable Pandit Ajudhya Nath and shows the main characteristic of the Congress movement. All castes, creeds and classes are first brought together, next their differences are clearly brought into prominence and finally these differences are composed and set at rest for ever by convincing arguments. Thus all the resolutions are passed unanimously and they derive the force which adheres to all wisely conceived proposals put forth by the consonant voice of a whole nation. The proposals are moderate. Government has, from very early times consulted some influential and well informed gentlemen. All that the people want is that these gentlemen honored by the confidence of the Government should be chosen by the people themselves. They do not at present lay claim to the control exercised by the British Parliament. The objections raised on that score, therefore, fall to the ground. Rulers not belonging to the persuation of the ruled and not in touch with their feelings, however well-meaning often commit grave mistakes and cause pain most unnecessarily. This is so well known and self evident that no argument need be put forth or authority adduced to establish the position. Those, therefore, who wish to remove this almost chronic cause of complaint cannot possibly be called disloyal, nor can their endeavours be characterised as otherwise than very noble. This view appears now to have recommended itself, as being the only true one it was bound to do sooner or later, and for the first time we are very glad to read that the suspicious and the irreconcilables have been reduced to a "microscopic minority."

The movement is obviously daily gaining strength from the fact that the number of delegates has increased from 72 to 1889 in half a decade. An examination of the list of the names of the delegates given at the end of the report will show that the assembly is thoroughly and the resolutions given both in the body and at the end of the book show that the proposals though practicable from the very inception, are being now so moulded into shape and reduced to easily accessible form, as to bring them into the sphere of practical politics. We shall cite only two instances.

The proposal to reform the provincial and supreme legislative councils is to be found in the very first report of the Indian National Congress, but it goes no further, there, than a humble prayer. It emerges now in the shape of a draft act and though discussed in detail in propositional form, the back ground of well framed sections is abundantly clear. The discussion is conducted in all fairness and not a harsh word or unkind expression finds place any where. All the speeches are brimful of loyalty and great patience is shown by the assembly even when a very small minority takes the opposite view. The sincerity of the opponents is shown, by their admitting their view to be erroneous on the next day, and the desire manifested even by the unconvinced to loyally adopt and act upon the resolution come to by the majority.

To pass on to the other instance all resolutions had hitherto been passed and merely transmitted for the information of the powers that be. But now this is considered not to be enough. The necessity of taking action to bring home the righteousness of the cause is felt and an agency is provided. It requires funds and an appeal is made for them and no sooner is the demand made than the platform is literally stormed by donors and in less than an hour something like Rs. 65,405 are subscribed and and about Rs 9000 are realized on the spot. So the whole is not merely a display of eloquence as the quandam opponents said, but the result of real conviction and people are willing to pay to see their views being translated into action We heartily wish that the wise gentleman of the west who recently wrote an elaborate book to demonstrate that there was nothing like an Indian nation should carefully peruse this portion of the report and honestly admit his error.

For the first time this year the Congress formally passed a resolution about the work of an existing regime. The Government of Lord Reay displayed great courage in openly bringing to justice an offender of high position and the people assembled in the deliberative council of their choice gratefully acknowledged the merit and thanked the ex-governor of Bombay for his scrupulous care in preserving the purity of justice and showing practically that the high and the low Europeans and natives are governed by one rule.

The Natives of India guided by great and wise Englishmen have done theirs part of the work well and it now remains in the words of Mr. Hume "for the people of Great Britain to justify and strengthen by righteous deeds the high and loving estimation in which they are held by their Indian fellow subjects. 'We have great confidence' said Mr. Surrendra Nath Banarjee amidst the thunderous applause in the justice and generosity of the English people and above all we rely with abounding faith upon the liberty loving instincts of the greatest Representative assembly in the world,—the palladium of English Liberty, the sanctuary of the free and brave — the British House of Commons."

---

ENGLISH BUDGET.

---

Mr. Gosehen the Chancellor of the Exchequer in England has been able to show a large surplus in the budget of this year. To the public in England the Chancellor has announced many distinct gains. India shares in one of them. The abolition of duty on silver plate was long desired: and an act of injustice was being done every day to this country by the continuance of that duty on silver plate. The principle of free trade was loudly proclaimed; but its application was reserved whenever other countries imposed heavy duties on English goods. England, who sounded the bugle of free trade, kept to herself the privilege of imposing duties on goods imported from foreign countries; and for such purposes India was considered as a foreign country. Party politics on this matter has been so strong that even the just and noble Lord Ripon, our ex Viceroy was not able to continue the duties on English goods imported into their country, because party politics dictated to him that the principle of free trade was not recognised between India and England. It was indeed not recognised for the advantage of England. Therefore the then Viceroy was compelled to abolish the duties on English goods to the great disadvantage of the Indian Treasury. These duties having been removed by the Govt. of India, it was the bounden duty of the Govt. of England to remove duty on silver plate. This reform though long desired has now been effected and justice has been done though tardily to India.

Another gain has been of introduction of cheap postage between India and England. This will facilitate intercourse between the two countries.

The third gain to this country is the reduction of duty on tea. Indian tea ought to find a large market in England. Kangra Valley produces the best tea available, and this reduction of duty will help the introduction of the same in large quantities in the English Market. These have been the advantages secured to the Indian Public by the surplus in the Treasury of England.

---

## वऱ्हाड

हवामान— उन्हाळा प्रखर होऊं लागला होता परंतु गेल्या शुक्रवारीं पाऊस पडल्यामुळें हवेंत सध्या बराच गारवा आला आहे पाऊस चांगला जोरानें झाल्यामुळें नवीन रोग उद्भवण्याची भिती पुष्कळ अंशीं दूर झाली. तापाचा अजार व किरकोळ दुखणीं थोडी बहुत सर्वत्र आहेत.

मि. मीर मुबारकअली आकि. एक्स्ट्रा असि. कमिशनर वर्ग पांचवा यांस कै. एम. विश्वनाथम इद्दलियार यांच्या जागीं गेल्या महिन्याच्या सतवे तारखेपासून कायम करण्यांत आलें हें कळविण्यास मोठा संतोष वाटतो.

रा. रा. गिरराव रामचंद्र तहशीलदार इलिचपूर यांस गेल्या दहावे तारखे पासून तीन महिन्यांची हक्काची रजा देण्यांत येऊन त्यांच्या रजेंत दर्यापूरचे नायब तहशीलदार रा. रा. नारायणसिंग भावतसिंग यांस अकटींग तहशीलदार नेमिलें आहे.

मे. रेसिडेंट साहेबांस असा हुकूम फर्मावणें जरूर वाटला कीं सोळा वर्षांच्या किंवा सोळा वर्षांहून अधिक वयाच्या अपराध्यास फटक्याची शिक्षा देते वेळीं फटके त्याच्या कुल्यावर मारले जावे?

सन १८९० सालच्या डिस्ट्रीक्ट कोर्टाच्या कायद्यांतील नऊ कलमा अन्वयें आलिशान रेसिडेंट साहेबांनीं मि. महमद यासीन खान असि. कमिशनर यांस अकोला जिल्ह्यांत डेपुटी कमिशनरच्या कोडताचे अधिकार दिले आहेत.

रा. रा. कृष्णराव महादेव आकि. तहशीलदार अकोट यांस अकोला जिल्ह्यांत तिसरे वर्ग माजिस्ट्रेटचे अधिकार देण्यात आले आहेत.

मि. एच्. एफ. काटग्रेव्ह जिल्हा सुपरीटेंडेंट पोलीस यांस येत्या पंधरावे तारखेपासून एक वर्षाची फर्लो रजा मिळाली आहे.

मि. मिरझा सफदर अली बेग आकि. ए. अ. कमिशनर यांस पहिले वर्ग माजिस्ट्रेटचा व फौजदारी कायद्यांतील १३३ वे कलमांत येणाऱ्या अपराधांचा निकाल करण्याचा अधिकार मिळाला आहे. आणि त्यांचें कोडत ह्मणजे असि. कमिशनर वर्ग दोनचें कोडत समजलें जाईल.

रा. रा. अयोध्या प्रसाद ए. अ. कमि वर्ग २ रा यांस तारीख १५ एप्रिल पासून दोन महिन्यांची हक्काची रजा मिळाली आहे.

सुनवाल पिंपरीचे देशमुख रा. रा. नरसिंगराव यांस तिसरे वर्ग माजिस्टेट नेमिलें असून त्यांनीं पुसद मुक्कामीं स्पेशल माजिस्ट्रेटचे काम पहावें असें ठरलें आहे.

रा. रा. गोपाळ बळवंत आकि. तहशीदार मुर्तिजापूर यांस उमरावती जिल्ह्यांत माजिस्ट्रेट वर्ग २ नेमण्यांत आलें आहे.

रा. रा. सी शामराव रेसिडेंटचे अस्याची यांस मुलूख अमानी हैदराबाद मध्यें दुसरे वर्ग माजिस्ट्रेट नेमिलें आहे.

निजाम सरकारचे कामगार रा. रा. गोविंद नाईक यांस वऱ्हाडांतील राज्य कारभारात आनररी अस्याची नेमून इलिचपूर जिल्ह्यांत काम पहाण्यासाठीं धाडलें आहे. त्यांच्या कोर्टास दुसरे वर्ग तहशिलदारच्या कोर्टाचे अधिकार मिळाले आहेत.

पोंचः— वाशीम— नवीन 'क्ष' आपलें पत्र उशीरा मिळालें. बहुतेक मजकूर शिळा न होण्या सारखा असल्या कारणानें आपला पत्रव्यवहार पुढील खेपेस प्रसिद्ध केला जाईल.

'एक वेडेल मुकत्यार'— आपलें लांबलचक पत्र वेळेवर रवाना झालें नाहीं. रा. रा. जोशी व मुधोळकर यांच्या अनुपम देशसेवेबद्दल आपण त्यांचे ऋणी आहां त्याप्रमाणें सर्वजण आहेत. कांहीं सभ्य ह्मणून नावलेल्या गृहस्थांचे असभ्य वर्तनावरील आपली टिका व्यवस्थेशीर आहे परंतु आपला लेख आतां छापणें ह्मणजे वराती पाठीमागून घोडें अशांतला प्रकार होईल. राष्ट्रीय सभेच्या वर्तीनें लोकमत किती बलवत्तर आहे हें सर्वांस माहीत आहे तेव्हां विरुद्ध पक्षाच्या एखाद्या दुसऱ्याचें स्टेशनवरील वेडगळ वर्तन सांगून त्या त्या विशिष्ट व्यक्तीस महत्व देण्यांत कांहीं हांशील नाहीं.

---

## वर्तमानसार

अलाहाबादेस पटकी उठली आहे. या स्वारीचें हतक्यांत उत्थापन झालें कां! आतां या तिच्या नेमणूकींत किती लोकांस ती डिसमिस करते पहावें.

बापव्य प्रांतात बरेंच पीक बुडाल्या मुळें त्या प्रांतात सरकारानें कामें काढून त्या रयतेचें उपजीवन करावें असें तेथील ले. गव्हरनरांचें मत आहे.

टायग्रीस युफ्रेटीस नद्यांतून जहाजें जातां यावीं अशा प्रकारची सुधारणा करण्यांत येणार आहे.

पोर्तुगीज लष्करी मंगी पळटण तीफखा न्यासह आफ्रिकेंतून निघाली असून त्यांचा तेथील एका शहरावर हल्ला करण्याचा हेतु आहे असें ह्मणतात.

बुखाऱ्यास रशिया लवकरच आपला एक एजंट नेमणार आहे.

नागपुरास यंदा पाण्याचा दुष्काळ पडेल असें ह्मणतात.

हाय कोर्टाचा महत्वाचा ठरावः—वर्तमानपत्रांत नोटीस देण्या संबधानें पुढील ठराव हायकोर्टानें केला आहेः—

वर्तमानपत्रांतून नोटीसा देण्याची वहीवाट सर्वत्र आहे. व ज्या वर्तमानपत्रांत नोटिस छापली असेल ते वर्तमानपत्र ज्याला ती नोटिस द्यावयाची असेल त्याज कडे टपाल मार्गे पाठविण्यांत येते. परंतु येवढ्यानेंच नोटिस दिल्याचा कायदेशीर भाग होत नाहीं, असा अलीकडे हा० को० तून ठराव झाला आहे. ज्याला नोटीस द्यावयाची त्याजकडे नुस्तें वर्तमानपत्र पाठविल्यानें नोटिस दिली असें होत नाहीं; तर ज्या वर्तमानपत्रांतून त्या नोटीशीचा काप ( तुकडा ) काढून तो, ज्याला नोटिस द्यावयाची त्याजकडे पाठविला पाहिजे. वर्तमानपत्र पाठविल्यानें त्यांतील नोटिस त्या मनुष्याच्या दृष्टीस पडते किंवा पडलीच पाहिजे.। असें समजतां उपयोगीं नाहीं; आणि पाठविलेलें सर्व वर्तमानपत्र त्या मनुष्यानें वाचून पाहिलेंच पाहिजे असाही कांहीं त्याजवर कोणाचा जोर चालावयाचा नाहीं. या साठीं, वर्तमानपत्र न पाठवितां त्याच्या दृष्टीस त्याला दिलेली नोटिसच पडावी ह्मणून, वर लिहिल्या प्रमाणें. तिचा काप काढून तो त्याजकडे पाठवावा. आणि असें केलें तरच तरच त्या इसमास नोटिस दिली असें समजलें जाईल असें हा० को० नें ठरावेलें आहे. हा. कोर्टाच्या या ठरावाचा विचार सर्व नोटिसा देणारांनीं करावा.

ज्या बाजूवर पत्ता लिहावयाचा त्या कार्डाच्या डाव्या बाजूस एकाद्या पत्र लिहिणारानें पत्ता लिहिला असता चालेल किंवा नाहीं अशा बद्दल हल्लीं वाद चालू आहे.

झांझिबार येथें जर्मन व्यापारी मोठमोठाले पगार देऊन अडते ठेवीत आहेत या मुळें इंग्लिश व्यापाऱ्यांस अडते मिळेनासे झाले आहेत.

नव्या गव्हरनरच्या पत्नी लेडी हारील यास इम्पीरीयल आरडर आफ धी क्रौन आफ इंडीया असा किताब देण्यांत आला.

मुरघव नद्यासे रशियाची लढाऊ गलबतें जाऊं येऊं लागली.

नटायु — सर्व पृथ्वीवरील मनुष्यांस ह्यातारा असा मनुष्य हल्लीं सानसालव्हाडोर [ अमेरीका ] बेटांत बोगोटा येथें आहे. या मनुष्याचें नांव मिचेल सालिस असें आहे. हा आपलें वय १८० वर्षांचें आहे असें ह्मणतो परंतु शेजारचे लोक त्याही पेक्षां वयानें जास्त असावा असें ह्मणतात! कारण १७१२ सालांतल्या एका दस्तैवजावर त्याची साक्ष आढळून आली आहे. याच्या अंगाचें कातडें चामड्याच्या कागदासारखें गुळगुळीत आहे. डोक्यांवर रुपेरी रंगाचे केंस पुष्कळ आहेत. दृष्टी चांगलीच शाबूत आहे तो ह्मणतो कीं खाण्यापिण्यांत व वर्तनांत नेमस्तपणा व नियमितपणा यांच्या योगानें आपण इतके दिवस जगलों. हा गृहस्थ रोज फक्त एकदा खातो. तें अन्न पौष्टिक व लवकर पचणारें असें असतें. तो फक्त अर्धतास जेवण्याकडे लावितो. कारण तो ह्मणतो कीं चोविस तासांत पचेल एवढेंच अन्न खाण्यास जास्त जेवींत बसण्याचें कारण नाहीं प्रत्येक महीन्यांच्या पहिल्या व पंधराव्या तारखेस तो उपोषणें करितो. त्या दिवशीं तो पिववेल तितकें पाणीच फक्त पिऊन असतो हा. आपलें अन्न निवाल्या खेरीज तोंडांत घालीत नाहीं.

अरु०

भडोच येथील खटल्यांतले मि. बेमनजी अ. क. यांची सरकारनें खानदेशास बदली केली व दोन वर्षें बढती मिळूं नये असा ठराव केल्याचें समजतें.

आफ्रिकेमध्यें शायर नदीच्या आसपास पोर्तुगीझ सरकारची कांहीं फौज गेल्याचें लंडनच्या ता. १४ च्या तारेवरून समजतें.

गेल्या सालांत त्याच्या पूर्वीच्या वर्षापेक्षां ४ लक्ष मण अधीक मीठ खपलें असा आंकडा काढला आहे.

रशियांत युरल पर्वताच्या आसपास जगांत मोठें असें एक अरण्य नुसत्या बर्फावर बसलेलें आहे. व त्याच्या आसपास विहीर खणीत असतां सुमारें १३ फूट खोल पर्यंत जमीन बर्फानें थिजलेली आढळली.

इंग्लंड व हिंदुस्थान यांच्या दरम्यान पत्रांना २॥ पेन्साचीं टिकिटें लावावयाची.

सु० प०

बार्शी रोडपासून बार्शीपर्यंत नकिच्या साह्यानें ट्रामवे चालविण्याची परवानगी जी. आय. पी. रेलवेस हिंदुस्थान सरकारानें दिल्याचें समजतें.

कायदे कौन्सिलच्या सुधारणेबद्दल मि० क्रासचें बिल पसंत न करतां मि० ब्राडला यांचें बिल पसंत करावें ह्मणून मद्रास इलाख्यांतून ५०००० सह्यांचे अर्ज पार्लमेंटकडे गेले आहेत.

लांकडांतून अन्नोत्पत्ति— हाइडलबर्ग येथें नुक्तेच तत्ववेत्यानें व्याख्यान दिलें त्यांत त्यानें सिद्ध करून दाखविलें कीं लांकडाच्या आंत जे बारीक तंतु असतात, त्यापासून रसायणशास्त्ररित्या आपल्याला मनुष्याचें अन्न उत्पन्न करून घेतां येईल.

लष्करी शिक्षणाचे शाळे संबधाचा अर्ज मुंबई सरकारकडे पुणें येथून पोचतां झाला, व तेथून हिंदुस्थान सरकाराकडे शिफारस होऊन रवाना झाला.

क० त०

साहस— कानडा प्रांतांतील एका गृहस्थाची बायको फार सुरेख आणि देखणी होती; परंतु तिच्या आचरणाविषयीं ती नेहमीं साशंक असे. एके दिवशीं त्याला तिनें बाईंट काम केल्याचा संशय आला आणि त्या योगें तो अतिशय संतापला त्या भरांत त्यानें आपली बायको सासु आणि दोन मुलें यांचे शस्त्रानें तुकडे केले! त्यांचे हातपाय, बोटें, वगैरेचे सुद्धां त्यानें तुकडे केले! काय हें घोर कर्म! बिचाऱ्या मुलांनीं आणि सासूनें काय अपराध केला होता.

एका काल्पनिक पत्रकारानें स्त्रियांच्या आयुष्याचे सहा भाग करून प्रत्येकाची खाली लिहिल्या प्रमाणें तुलना केली आहे. बाल्वयांत त्या प्राण्याप्रमाणें असतात. १२ वर्षांपासून तो १५ वर्षां पर्यंत त्या लेमोनेड सारख्या असतात. १८ वर्षापासून २५ वर्षांपर्यंत शांपेन सारख्या असतात. २५ पासून ४० पर्यंत दारू प्रमाणें असतात. ४० पासून पन्नासपर्यंत पोर्ट सारख्या असतात व ५० शी उलटली ह्मणजे त्या व्हिनीगार होतात.

न्या० सि०

स्टेट सेक्रेटरीवर ८ लक्षांचा दावा—बल्लारी कृष्णा सरकारी रेलवेचे कंत्राटदार मि० डेरी यांणी दिलेलें कंत्राट सरकारानें परत घेतल्यामुळें आपलें नुकसान झालें म्हणून हिंदुस्थानच्या स्टेट सेक्रेटरीवर ८ लक्षांचा दावा मद्रास हायकोर्टांत लाविला आहे.

बुद्धिमान बंगाली बाबू—सर्की सिव्हिल एंजिनियरिंग कालेजाची नुकतीच परोक्षा झाली तींत बिपिन बिहारी चक्रवर्ती हे पहिले आले त्यामुळें इंडिया कौन्सिलचे १००० रुपयांचे टामसनचे २५० रु० चे गाणितांतील क्यांटलचे सोन्याचें पदक, आणि शिल्प विद्येतील उत्तम नमुन्याची बक्षिसें ही ह्या एकट्या स्वप्पी नेटिवानें उपटलीं.

आगगाड्याचा कायदा— आगगाड्याचा नवा कायदा मे महिन्यापासून अंमलांत येणार. त्यांत गाडींतून प्रवास करणाऱ्या उतारूंस सुखकर अशा कांहीं गोष्टी आहेत. गाडे चालू असतां गार्डाला किंवा ड्रायव्हरला बातमी देण्याची सोय केली जाईल. प्रत्येक गाडींत बायका करितां कित्येक कपार्टमेंटस मुद्दाम राखून ठेवलीं जातील. पडद्यांतील बायकांच्या सोईसाठीं एक डबा मुद्दाम राखून ठेवला जाईल. ही सोय गाडी ५० मैलावर जाणार असल्यास ठेवली जाईल. प्रत्येक डब्यांत जितके उतारू असावें असें ठरावेलें आहे त्यापेक्षां ज्यास्त उतारू जो रेल्वे नौकर आंत घेईल त्यास शिक्षा देण्याचें एक कलम नव्या अक्टांत घातलें आहे. खटला होऊन ज्या रेलवे नौकरावर अशी शाबिदी होईल तो २० रुपये दंडास पात्र होईल.

भाड्याचा दर कमी करणार— एकंदर सरकारी रेलवे वरील पहिल्या आणि दुसऱ्या क्लासाच्या उतारूंचें भाडें शेंकडा ३३ रुपये सरकार कमी करणार आहे. तिसऱ्या क्लासचे लोक श्रीमान असतात ह्मणून का सरकार त्या क्लासचें भाडें कमी करीत नाहीं.

शु० सू०

लोक ह्मणतात तितका कांहीं मनुष्य स्वभाव कृतघ्न नसतो. उपकार करणारा जो आहे तो आपण केलेल्या वास्तविक उपकाराचें प्रतिफळ उपकाराहून जास्त मिळविण्याची नेहमीं इच्छा करीत असल्यामुळें ही कुरकुर ऐकूं येत असते.

शिष्टाचारा विषयीं सूचना—१ ग्राम्य शब्दाचा उपयोग कधीं ही करू नये २ दुर्दैवी व व्यंग लोकाची कुचेष्टा करूं नये ३ क्षुद्र प्राण्यास त्रांस देऊं नये. ४ शिवी गाळ करू नये ५ जेथें तेथें थुंकणें, तोंड वासून खोकणें, दुसऱ्याच्या पुढें जांभया देणें किंवा शिंकणें, दुसरा लिहीत असल्यास तिकडे चोरून पाहणें, असल्या खोडी धरूं नये ६ वृद्ध गृहस्थाचा आधीं सन्मान राखावा ६ बसण्याच्या टेकण्याच्या किंवा निजण्याच्या जागेस सहसा पाय लावूं नये. ७ शरीर वस्त्र व पात्र ही नेहमीं स्वच्छ राखावी. ८ कोणांचे मनास लागेल असें कठोर भाषण करूं नये आणि १० वेडावणें चाहाड्या करणें कोणाची त्याच्या पाठीमागें निंदा करणें ह्या गोष्टी वर्ज कराव्या.

कु० शि०

श्री छत्रपती शिवाजी माहाराज यांच्या समाधिच्या जीर्णोद्धारा संबंधानें " कुटुंब शिक्षका" चा अभिप्राय प्रत्येक देशाभिमानी मनुष्यानें लक्ष्यांत वागविण्या सारखा आहे. राज पुरुषांच्या समाधी विषयी आदर बुद्धी नसणें हा मोठी दिलगिरीची गोष्ट होय 'न्यूटनचा दांत, शेक्स पियरचें टेबल, नेपालियन बोना पार्टीची टोपी" इत्यादि वस्तू वरून युरोपांतील लोक आपापल्या उदात्त वीर नायकाचे गुणगौरव करितात तेव्हां श्री छत्रपती शिवाजीच्या संबंधानें आपण निदान "सद्भावानें विचिन तियें मी तुला पर्णसद्म" अशी इच्छा धरू। आपल्या शिवछत्रपतीचे रायगडा वरील स्मारक उद्धरण्या विषया अहर्निश विसरता कामानये

नवीन आगगाडी—नागपूर कडून जबलपूर पर्यंत आगगाडी सुरू झाल्यास पुष्कळ फायदा होईल असा कित्येक वाकबगार लोकांचा तर्क होता तो कांहीं वर्षांत प्रत्यक्ष अनुभवास येईल असें म्हणण्यास किंचित् ही हरकत नाहीं. चिंचवाड्या पासून किंवा जबलपूरच्या आसमंतांतील गांवा पासून तो नागपूर पर्यंत किंवा बंगालचा नागपूर रेलवेच्या गोंद्या स्टेशन पर्यंत आगगाडीचा फांटा काढण्या संबंधानें तिकडील प्रांताचें निरीक्षण करण्यांत आलें आणि त्याचा निकाल हो लाट साहेब गव्हरनर जनरल यांस पसंत पडला. या पुढें या नव्या आगगाडीच्या सर्व लहान मोठ्या कामा संबंधी व्यवस्था मि. डब्ल्यू. एच्. पारकर यांजकडे सोंपविली आहे.

---

नोटीस.

सेखइमाम वल्द सेखचांद तासेवाले राहणार माहान तालुके अकोले यांस नोटिस देण्यांत येतें कीं माहान येथें मुसलमान लोकांचे बांगड्याचे दक्षणचे बाजुस अठवे असीन त्याचे उपयोगा करीता शेजारी जागा असलेली त्या जागेवर तुमची कांहीं एक मालकी व वहीवाट नसताना नवीन इमारत बांधण्यांचे योजिले आहे हें तुमचे करणें अन्यायाचे आहे करितां कळविलें आहे त्या जागेवर तुम्ही इमारत बांधुनये ती तुम्हास काढावी लागेल व त्याबद्दल सर्व खर्च व्यर्थ जाऊन आम्हास फिर्याद वगैरे करावी लागल्यास तो ही खर्च तुम्हास सोसावा लागेल कळावे ता० २३।४।९० अकोलें

( सही )

खाजे फखिरोद्दीन खान जाहगिरदार दस्तुर खुद्द

---

☞ हें पत्र अकोला येथें के. वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

## वऱ्हाड

पोंच—वाशिमकर आपला अपरचित 'क्ष' आपले पत्रांत असें म्हणतात कीं दिपवाळीच्या अगोदर एक दोन दिवस पाऊस पडून मोठा अनर्थ झाला. एका शास्त्रीबुवाची ८ वर्षाची मुलगी रस्त्यांतील पाण्यानें वाहून जाऊन प्राणास मुकली. आणखी हा बरांत मुलें वाहात चालली होती पण ती काढली गेलीं. येथें परभूजातीचे एक नवीन वकील आले आहेत. ते हुषार व शांत आहेत. यांनीं आपला धंदा काळजीनें करावा. येथील कुन मि० केळकर गेल्या पासून झोपीं जाऊ लागला आहे. कुनचे हितचिंतक कोठें गेले आहेत कोण जाणें बाबानो लकोंत आपलें हांसे करून घेऊ नका. हल्लीं गांवांत रात्रीं कंदील लावण्याची मुनसीपालिटीनें तजवीज केली आहे. व जुनेली टौनहालांत उत्तम प्रकारचा बाग केला आहे व स्वच्छताही उत्तम प्रकारची आहे. या सर्व कामाचें श्रय मि० नारायण परशराम कमेटीचे क्लार्क यांना आहे खानें सुमारीचें कामा बद्दल कुरकुर आहे वगैरे.

मे० नबाव यासिनखसाहेब स्पे० असिस्टंट कमिशनर यांची स्वारी गेल्या आठवड्यांत रजेवरून परत येऊन आपले कामावर रुजूं झाली.

टपाल लुटलें—गेले चे मागील शनवारी यहांटस डामरगांव स्टेशनहून यवतमाळचा टपालचा टांगा जात असतां लुटला गेला. त्यांत एक युरोपिअन व एक ब्राह्मण असे दोन उतारू होते त्यांना व कोचमनला लुटारू बदमाशांनी फार ठोकले. डामरगांवा पासून सुमारे मैल दोनें मैलाचे अंतरावर हा प्रकार घडला असें ह्मणतात! ! टपालांतील चुकें व कागद वगैरे टाकून देऊन बंग्या वगैरे माल लुटारु लोकांनीं लांबविला.

वाशिम जिल्ह्यांत मालेगांव येथें एक मोठा भयंकर दरोडा पडला. दरोडेखोर तर मशाली लावून आले होते असें सांगतात सुमारे १७ हजार रु० चा माल दरोडेखोरांचे हाता लागला आहे.

येत्या ता० २६ पासून येथें वऱ्हाड शाळा खात्याचें कान्फरन्स भरणार आहे.

मि० सुरजमल गोविंदराम यांना रा० रा० कृष्णाजी मल्हार यांचे खालीं झालेले जागेवर मुनसिपल मेंबर नेमलें.

लिहिण्यास फार दुःख वाटतें कीं रा. रा. त्र्यंबकरावजी केतकर जे पूर्वी ह्या आपल्या प्रांतांत पोष्टांत इन्स्पेक्टर व मध्यप्रदेशांत पोस्ट मास्तर असून आलीकडे दोन वर्षांपूर्वी मुंबईस रजेवर होते. त्याचा इहलोकीचा वास ता० १० मिनहु सोमवारी रात्रीं दाहा वाजतां संपला हे दुःखकारक वर्तमान त्याचे कुटुंबी आप्त इष्टमित्र आणि स्नेही ह्यांना कळविण्याचे आमचे नशीबी आले आहे रा. रा. त्र्यंबकरावजी ह्यांचे अकालिक मरण त्याचे कुटुंबांतील माणसास दुःख जाहलें आहे हें लिहिलें पाहिजे असें नाहीं. परंतु ते ज्याना ज्यांना माहीत होते त्या सर्वांनाही दुःख झाल्यावाचून राहणार नाहीं.

सन १८९० सप्टेंबरच्या पहिल्या दुसऱ्या व तिसऱ्या तारखेस उमरावती येथें झालेल्या हायर, लोअरच्या परीक्षें मध्यें पसार झालेल्या इसमांची नांवें व विषय खालीं दिल्या प्रमाणें.—

(हायर स्टान्डर्ड.)

नांवें. विषय

कॅप्टन आर. डी. सी. डेव्हिस. असिस्टंट कमिशनर. ....रेव्हेन्यु

मि० सैफउद्दीन खान जुडिशिअल कमिशनरचे डेपुटी क्लार्क. .... ''

मि० पांडुरंग सखाराम उमरावती स्माल काज कोर्टचे ऑफिसिएटिंग क्लार्क. ....रेव्हेन्यु ....आणि ....अकौंटस्

मि० महमद रहिमुद्दउल्ला. नायबतहशिलदार. ....अकौंटस्

मि० लक्ष्मण नारायण क्लार्क आफ कोर्ट यवतमाळ ....अकौंटस्

टीप—वरील ९ कामदार मागील परीक्षेमध्यें दुसरे सर्व विषयांत पसार झाल्यामुळें हायर स्टान्डर्ड मध्यें फुल पास आहेत.

मि० बेंधूजी जनार्दन एक्स्ट्राअसिस्टंन्ट कमिशनर. ....सिव्हिल आणि क्रिमिनललॉ आणि .... रेव्हेन्यु

मि० रुस्तुमजी फर्दुनजी असिस्टंट कमिशनर ....सिव्हिल आणि ....क्रिमिनल लॉ.

मि० हशमत अली अटॅचो ..क्रिमिनल आणि ....व्हरनॉक्युलर

मि० पी० थॉरिस क्लार्क आफ कोर्ट अकोला ....क्रिमिनल आणि .... रेव्हेन्यु.

मि० आर सिंपसन असिस्टंट कमिशनर. ....क्रिमिनल लॉ.

मि० एफ. सी काफर्ड.... '' ''

मि० मुनशी अजिझुद्दीन असिस्टंट कमिशनर. .... '' ''

मि० जे० ओ ग्रेडी. एक्स्ट्रा असिस्टंन्ट कमिशनर .... '' ''

मि० अनंत नारायण नायब तहशिलदार ... '' ''

मि० विनायक अपाजी नायब तहसिलदार .... '' ''

मि० नारायण गोविंद नायब तहशिलदार .... सिव्हिल लॉ.

मि० रामचंद्र भास्कर नायब तहसिलदार .... रेव्हेन्यु

मि० बळवंत बापूजी तहसिलदार .... '' ''

मि० महमद साहेब नायब तहशिलदार .... व्हरनाक्युलर

(लोअर स्टान्डर्ड)

मि० अबदुल कुदुस नायब तहशिलदार. ....क्रिमिनल आणि सिव्हिल लॉ, रेव्हेन्यु आणि अकौंटस.

मि० रामराव गोविंद नायब तहशिलदार. .... रेव्हेन्यु.

मि० गोविंद नारायण हेडमास्तर अ० व्ह० स्कू० नागपूर .... रेव्हेन्यु आणि अकौंटस्

मि० सय्यद महमूद नायब तहशिलदार .... ''

मि० सय्यद फरजहुसेन नायब तहशिलदार .... ''

मि० विनायक अप्पाजी नायब तहशिलदार .... रेव्हेन्यु

मि० अनंत नारायण नायब तहशिलदार .... अकौंटस्

टीप वरील सात कामदार मागील परीक्षेमध्यें दुसरें सर्व विषयांत पसार असल्यामुळें लोअर स्टांडर्डमध्यें फुल पास आहेत.

मि० रंगनाथ विष्णु आ० डे० क्लार्क आफ कोर्ट यवतमाळ सिव्हिल आणि क्रिमिनल लॉ रेव्हेन्यु व अकौंटस्

मि० शाहु दाजी पाटक आफ० नायब तहसिलदार.... ''

मि० लक्ष्मण गोपाळ नायब तहसिलदार. .... ''

मि० सी शामराव अप्पाची .... सिव्हिल ....आणि क्रिमिनल लॉ आणि अकौंटस्

मि० गोविंद नायक आनररी अप्पाची .... '' ''

मि० गणेश वासुदेव जु० कमिशनरचे ऑफिसातील क्लार्क.... '' ''

मि० मारुती हरी क्लार्क सेशन्स जजेस अफिस ....क्रिमिनल लॉ, रेव्हेन्यु व अकौंटसू

मि० यशवंत मोरेश्वर पोलिस कान्स्टेबल ....सिव्हिल क्रिमिनल लॉ व अकौंटस्

मि० शेख मुनीर परशियनरीडर. कमिशनर्स ऑफीस. ....सिव्हिल व क्रिमिनललॉ व ....अकौंटस्

मि० सय्यद मिर अल्लुप क्लार्क सेशन्स जजस ऑफीस ... क्रिमिनल लॉ ..रेव्हेन्यु,अकौंटस

मि० शिवराव रामकृष्ण. डेपुटी क्लार्क आफ कोर्ट वाशीम ....सिव्हील, क्रिमिनल लॉ व ....रेव्हेन्यु.

मि० रामराव बापूजी क्लार्क सेशन्स जजेस आ ....सिव्हिल लॉ व ....अकौंटस्.

मि० नारायण रावजी नायब तहसीलदार. .... क्रिमिनल लॉ व रेव्हेन्यु

मि० गणेश भिवराव क्लार्क डेपुटी कमिशनरचें ऑफीस इलिचपूर. ...क्रिमिनल लॉ व अकौंटस्

मि० लक्ष्मण महादेव नायब तहसिलदार ....क्रिमिनल लॉ व रेव्हेन्यु.

मि० एफ् प्रिडेक्स असिस्टंट कमिशनर. .. क्रिमिनल लॉ

मि० शामराव रामचंद्र नाझर स्मालकाज कोर्ट खामगांव .... '' ''

मि० महमद साहेब नायब तहसिलदार .... '' ''

मि० अर्जुन सिंग नायब तहसिलदार ....क्रिमिनल लॉ.

मि० गणेश राजाराम नायब तहसिलदार .... '' ''

मि० नारायण केशव आफिसिएटिंग तहसिलदार ... '' ''

मि० चिंतामण विष्णु कारकून डे० क० आफिस वाशिम ... '' ''

मि० नारायण रामराव कारकून डे० क० आफिस अकोला. ....अकौंटस.

मि० नारायण रामचंद्र ० क्लार्क आफ कोर्ट इलिचपूर .... रेव्हेन्यु.

मि०रुस्तुमजी फर्दुनजी असिस्टंट कमिशनर ....व्हरन्याक्युलर

मि० शेखहैदर .... '' ''

---

नमुना नंबर १४२

दिवाणी कोर्टास सूचना

अज्ञानाच्या माल मिळकतीच्या वहिवाटीचें सरटीफिकिट मिळण्याविषयीं अथवा अज्ञानांचे पालन व त्याच्या माल मिळकतीची काजा करण्या लायक मनुष्य नेमण्याविषयी सन १८५८ चा अक्ट ४० कलम ६ प्रमाणें

अर्जाचा नंबर. कि. क्लास नंबर १३

मि. नंबर ७ सन १८९०
स्पे० अ० कमिशनर साहेब जिल्हा
अकोला यांचे कोर्टांत.

अर्जदार कासीबाई मर्द हणवंती मैयत वारीस मुलगा रावजी वल्लद हनवंती जात कुणबी राहणार वडगांवपाटन तालुका जळगांव.

वरील (अज्ञान) रावजी बापाचें नांव हनवंता जात कुणबी राहणार वडगांवपाटन ता. जळगांव जिल्हा अकोला याचें पालन व माल मिळकतीचा कबजा करण्या लायक मनुष्य नेमला जावा ह्मणून अर्ज दिला आहे यास्तव मृत्युपत्राचे आधारें किंवा दस्तायवजावरून किंवा अगदीं जवळचे नातलगपणाचें कारणावरून किंवा इतर प्रकारें ज्या कोणी मनुष्यास सदरहु अज्ञानाचे मालमिळकतीवर संभाळ कर्ता या नात्यानें कबज्या करण्याचा हक्क सांगायाचा असेल त्या सर्वांस या लिखानें कळविण्यांत येत आहे कीं यांणी ता० ५ माहे दिसेंबर सन १८९० इसवी रोजीं वरील अर्जाची चौकशी होणार आहे ते वेळी या कोर्टांत हजर होऊन आपआपल्या हक्काची लेखी हकीकत दाखल करावी तारीख १७ माहे नोव्हेंबर सन १८९० इ०

Maniksha Rattanji
स्पे० अ० कमिशनर.

## जाहिरात

अकोलें म्युनासिपल कमेटीचे स्पेशाल सभेनें सन १८८६ चे वऱ्हाड म्युनासिपल कायद्यातील कलम ११६ ( १ ) इ व ११६(२) अन्वयें कसईखान्याचें योग्य व्यवस्थेकरितां व देखरेखीकरितां केलेले पुढील नियम आलिशान रेसिडेंट साहेब यांनीं सदरहू कायद्यातील कलम ११६ ( ३ ) वर हुकूम मंजूर केले आहेत. ता० १९ माहे दिसेंबर सन १८८८ चे रेसिडेंन्सी आरडर मधील नोटीफिकेशन नंबर २५६ यांत प्रसिद्ध केलेले नियमांतील नियम ४८ प्रमाणें कसई खान्याचे हे पुढील नियम सर्व लोकांचे माहितीकरितां प्रसिद्ध करण्यांत आले आहेत.

अकोलें ता० २० माहे नोव्हेंबर १८९०

Md. Husain
Secretary
Municipal Committee
Akola.

कसईखाना किंवा कत्तल यासंबंधीं
नियम.

१ वऱ्हाड म्युनिसिपल कायद्यांतील कलम ८९ अन्वये कमिटीनें मुकरर केलेले ठिकाणीं असलेल्या प्रत्येक कसईखान्यास आंत व बाहेर आंगण असलें पाहिजे व त्याची सफाई म्युनिसिपाल कमिटी वेळोवेळीं जसा हुकूम देईल त्याप्रमाणें ठेविली जाईल.

२ म्युनिसिपाल हद्दीमध्ये मनुष्यांचे खाण्याकरितां विकण्यास आणलेलीं सर्व गुरें मेंढें व बकरी म्युनिसिपल कमेटीनें नेमलेल्या वेळीं कसईखान्याचे बाहेरचे आंगणांत आणलीं पाहिजेत व तपासणीकरितां दाखल केलीं पाहिजेत.

३ म्युनिसिपाल कमिटीनें नेमलेल्या आगर ज्यास अधिकार दिला आहे अशा कामगाराकडून मारण्याकरितां आणलेले प्रत्येक जनावर तपासले जाईल व जें जनावर त्याला मनुष्याच्या खान्यालायक नाहीं असें वाटेल तें पास केलें जाणार नाहीं. याप्रमाणें इनकार केलेलें प्रत्येक जनावर मालकानें लागलेंच कसईखान्यातून काढून नेलें पाहिजे. इन्स्पेक्टरनें पास केलेल्या प्रत्येक जनावराला निशाणी केली जाईल.

कसईखाना कमिटीचा अमला हर टरविलेली फी दिल्यानंतर तें जनावर कसईखान्याचे आंतले आंगणांत मारण्या करितां नेलें जाईल परंतु कसईखान्यांत मांस विकण्यास किंवा विकण्या करितां ठेवण्यास परवानगी मिळणार नाहीं.

४ वर सांगितल्याप्रमाणें योग्य रीतीनें पास केलेले नमून निशाणी केले गेलें नसेल असें जनावर कसईखान्याचे आंतल्या आंगणांत जर कोणाजवळ आहे असें आढळेल तर ते जनावर कसईखान्यांतून लागलीच काढून दिले जाईल व त्या इसमावर माजिस्ट्रेटच्यापुढें मुकदमा होऊन पुराव्याअंती तो ५० रुपयांपर्यंत दंडाला पात्र होईल

५ म्युनिसिपाल कमिटी वेळोवेळीं जो वेळ मुकरर करतील त्या वेळांत प्रत्येक दिवशीं कसईखाना खुला राहिल व जर कसईखाना कमिटीचा अमला तर म्युनिसिपाल कमिटीनें नेमलेला आगर ज्यास अधिकार दिला आहे. असा इसम फी घेऊन पावत्या देण्याकरितां त्या वेळीं कसईखान्यांत हजर राहील व त्या पावत्या पुढें जोडलेल्या नमुन्या प्रमाणें दिल्या जातील.

नियम ५ यांत सांगितलेला नमुना

या पासून मनुष्यांचे खाण्यास लायक आहेत अशी इन्स्पेक्टर यांनीं पास केलेलीं पुढील जनावरें
मारल्या बद्दलचे फी बद्दल. घेऊन
भरून पावलो. ता. माहे सन १८९०

सेक्रेटरी म्युनिसिपाल कमिटी
शहर अकोला.

## जाहिरात.

अकोले म्युनसिपल कमिटीचे स्पेशल सभेनें सन १८८६ इसवीचे वऱ्हाड म्युनसिपल कायद्यांतील कलम ११६ [ १ ] ड अन्वयें केलेला पुढील नियम आलिशान रेसिडेंट साहेब यांणीं सदरहु कायद्यांतील कलम ११६ ( ३ ) बरहुकूम मंजूर केला आहे ता० १९ माहे दिसेंबर सन १८८८ इसवीचे रेसिडेन्सी आरडर मधील नोटिफिकेशन नंबर २५६ यांत प्रसिद्ध केलेले नियमांतील नियम ४८ प्रमाणें तो सर्व लोकांचे माहिता करितां प्रसिद्ध करण्यांत आला आहे.

ता० २०-११-९० } Md. Husain
Secretary Municipal Committee
Akola

ज्या मनुष्याला म्युनसिपल हद्दीचे आंत एखादा इमारत नवीन बांधावयाची असेल किंवा पडलेली पुन्हा बांधावयाची असेल त्यानें ती बांधण्यास आरंभ करण्यापूर्वीं अर्जाद्वारा हेतु कमेटीस अर्जानें कळविला पाहिजे.

खुलासा.

घर बांधणें या शद्बांत खालीं लिहिलेप्रमाणें समावेश होतो. नवीन पायावर इमारत वाढविण्याकरितां करण्याचें बांधकाम किंवा इमारतींत फेरफार करण्याकरितां करण्याचें बांधकाम, जुन्यापायावर नवीन इमला बांधणें किंवा जें घर पूर्वीं मनुष्य वस्तीकरितां बांधलें नसून हल्लीं राहण्याकरितां करणें किंवा एका पेक्षां जास्त राहतीं घरें करणें.

Md. Husain
Secretary A. M. C.

## जाहिरात.

मुलख अमानी हैद्राबाद यांतील अबकारी ( दारु, ताडी. आफू व गांजा ) विक्रीच्या तारखा सन १८९१-९२ सालाकरितां खालीं लिहिल्याप्रमाणें मुकरर करण्यांत आल्या आहेत:—

प्रत्येक हरास दिपुटी कमिशनर साहेबांचे कोर्टांत १२ वाजतां होईल.

उमरावती सोमवार ता. १९ जानुआरी १८९१
एलिचपूर सोमवार ता. २६ जानुआरी १८९१
अकोला सोमवार ता. २ फेब्रुआरी १८९१
बुलढाणा सोमवार ता. ९ फेब्रुआरी १८९१
वणी(यवत.)गुरुवार ता. १९ फेब्रुवारी १८९१
वाशीम सोमवार ता. २ मार्च १८९१

मक्त्याच्या व हरासांच्या शर्तींचे संबंधाची माहिती जिल्ह्याचे आफिसांत मिळू शकेल.

( सही ) टी. सी. हौडन,
कमिशनर,

मु० अ० हे०

## नोटीस.

रा० रा० रघु वल्लद भगवान आमले राहणार वडड ता० मलकापूर यांस

मंजी मर्द रघु आमले हल्लीं वस्ती मौजे वाडी तालुके मलकापूर हिजकडुन नोटीस करण्यांत येते कीं मी तुमची लग्नाची बायको आहे व मजकडुन काहीं अपराध जाला नसून तुह्मीं मला आज पांचवर्षें टाकून दिलें आहे. त्यामुळें मी आपले भावाचे घरीं सावकाराचें कर्ज काढून तुमचे नांवावर पोटभरून बसले आहे. तरी मला या पांचवर्षांत पोटा करितां मागले कर्ज रुपये २४० सावकाराचे देऊन मला आपले घरीं घेऊन जावें नाहीं पेक्षां मला दुसरा घरठाव करण्यास परवानगी द्यावी ही नोटीस तुह्मांस पावल्या पासून आठ दिवसाचे आंत माझे सावकाराचे कर्ज देऊन मला घेऊन जावें. अथवा मला दुसरा घरठाव करण्यास परवानगी द्यावी या दोहों पैकीं कांहीं एक न झाल्यास कायदेशीर आपली संमती मला दुसरा घरठाव करण्यास आहे. असें समजून मी दुसरा घरठाव करीन कळावें. तारिख २०-११-९० इसवी.

सही
मंजी मर्द रघुजी आमले निशानी हातची बांगडी. ०

## वर्तमानसार

हैदराबादेस मद्रासच्या जनरल पोस्ट आफिसाप्रमाणें एक जनरल पोस्ट आफिस बांधण्याचा निजामसरकारचा विचार आहे.

सोनचाफ्याचें फूल बिछान्यांत घेऊन निजले असतां ढेकणांचा त्रास होत नाहीं असें सांगतात. अनुभव पहावा.

सेंटपिटर्सबर्ग येथें एक ६२० फूट लांब व १२० फूट रुंदीचा दिवाणखाना आहे ह्या दिवाणखान्यास मध्यें खांब वगैरे कांहीं नसून त्याला एकच छपर आहे. अवघ्या जगांत इतका विस्तृत दिवाणखाना नाहीं.